# अर्थसंवाद

खंड ७ * अंक २ * जुलै – सप्टेंबर १९८३

इंग्रजी राज्याविषयीची लोकहितवादींची भूमिका

अर्थसिद्धान्त चुकीचे आणि/वा चकवे

उभयपक्षी मक्तेदारी बाजारपेठेतील वेतन–निश्चिती

टिपणे आणि चर्चा

नव्या आर्थिक क्रान्तीची चाहूल

चर्चासत्र अहवाल

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये । शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

# अर्थसंवाद

जुलै – सप्टेंबर १९८३
खंड ७ : अंक २

प्रमुख संपादक : आनंद नाडकर्णी

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता
आनंद नाडकर्णी
अ-३, प्रबोधन को-ऑप. हौसिंग सोसायटी
६१ अ/९–१०, एरंडवणा
पुणे ४११ ००४

व्यवस्थापकीय पत्ता
रवीन्द्र सबनीस
कार्यवाह
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर मुंबई ४०० ०१४

'मराठी अर्थशास्त्र परिषदे'च्या सभासदांना 'अर्थसंवाद' हक्काने मिळेल.

इतरांसाठी :
वार्षिक वर्गणी : रु. ४०/-

सल्लागार मंडळ

**वि. वि. बोरकर**

**स. ह. देशपांडे**

**रवीन्द्र दोशी**

**रमेश पानसे**

साहाय्यक संपादक

**संतोष दास्ताने**

**प्रमोद ठोम्बरे**

## आभार

( १ ) अर्थसंवाद प्रकाशनासाठी **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** आणि **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांच्याकडून अनुदान मिळाले आहे. आम्ही या दोन संस्थांचे आभारी आहोत.

( २ ) मुखपृष्ठावरील चित्र तयार करून दिल्याबद्दल तसेच एकूण सजावटीविषयी सल्ला दिल्याबद्दल **डॉ. अनिल अवचट** यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

## या अंकात

१. इंग्रजी राज्याविषयीची लोकहितवादींची भूमिका — ३१
**रमेश पानसे**

२. उभयपक्षी मक्तेदारी बाजारपेठेतील वेतन-निश्चिती — ३७
**जयकुमार फा. पाटील**

३. अर्थसिद्धान्त—चुकीचे आणि / वा चकवे-४ — ६१
**नी. वि. सोवनी**

४. नव्या आर्थिक क्रान्तीची चाहूल — ७६
**भा. रा. ढेकणे**

५. टिपणे व चर्चा — ८१
प्रा. सोवनी आणि विनिमयमूल्ये : प्रत्युत्तर
**मुकुंद कुळकर्णी**

६. चर्चासत्र अहवाल — ८६
केन्स जन्मशताब्दि परिसंवाद
**यशवंत रारावीकर**

# इंग्रजी राज्याविषयीची लोकहितवादींची भूमिका

रमेश पानसे

आयझॅक न्यूटन यांनी जगाला एक शास्त्रीय शोधपद्धती दिली. अॅडॅम स्मिथ यांनी, न्यूटन यांची ही शास्त्रीय शोधपद्धती कशी असते याचे वर्णन केले आहे. स्मिथ यांनी म्हटले आहे, "आपल्या दैनंदिन अनुभवातील एखाद्या मध्यवर्ती सत्य घटनेने (गुरुत्वाकर्षण) अनेक परस्पर संबंधित अशा महत्त्वाच्या आणि उच्च (sublime) सत्याच्या साखळीचा शोध घेणे हा आजपर्यंत मानवाने लावलेल्या शोधातील सगळ्यात उत्तुंग शोध आहे."[1] याच पद्धतीने अॅडॅम स्मिथ यांनी स्वत: तत्कालीन घटनांचा अर्थ लावण्याचा वा आर्थिक क्रियांचा परस्परसंबंध बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लोकहितवादींच्या उदंड लेखनातील विचारांचाही याच सूत्रपद्धतीने वेध घेता येईल. हिंदुस्थानचे भयाण दारिद्र्य ही लोकहितवादींच्या मनात सलत असलेली गोष्ट. त्यांनी इनाम कमिशनवर काम करताना आणि नोकरीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी वास्तव्य करून देशातील दारिद्र्य उघड्या डोळ्यांनी पाहिलेले होते आणि हे दारिद्र्य त्वरेने दूर झाले पाहिजे असे त्यांच्या विचारी मनास वाटल्यामुळे त्यांची आयुष्यातील स्वत: वागण्याची आणि त्यांच्या लेखनाची काही एक दिशा त्यातून ठरून गेली. त्यांच्या गोरगरिबांविषयी कळवळा दाखविण्याबद्दलच्या व त्यांची स्वत:हून सेवा करण्याचा उपक्रम करण्याबद्दलच्या अनेक आठवणी प्रसिद्ध आहेत. 'रस्त्यातले गोरगरीब हे तर दररोजच्या त्यांच्या भेटीतलं परब्रह्म होतं. ते त्यांच्या सवडीनं जेव्हा सकाळी किंवा दुपारी बाहेर पडत तेव्हा डाळचुरमुऱ्याचं पोतं आणि खारकांचं एक गाठोडं घेतलेला एक माणूस त्यांच्या बरोबर असायचा. इतकंच नाही तर मलमाचा एक मोठा डबा आणि थोडचाशा मलमपट्ट्याही असायच्या. रस्त्यात कुठेही आंधळापांगळा दिसला की त्याला थोडे चुरमुरे, एकदोन खारका द्यायच्या. तो दुखणेकरी असला तर आपल्या नावाचं, पत्त्याचं कार्ड त्याला देऊन आपल्या घरच्या दवाखान्यात त्याला यायला सांगायचं. महारोग्याच्या मलमपट्ट्याही ते फार सहजतेने करीत. रोगाची किळस अशी त्यांना येतच नसे... आयुर्वेदातली औषधं स्वत: अगर नेमलेल्या वैद्याकडून ते देत. त्यासाठी गावागावांहून ती मागवून घेत... गोरगरिबांच्या प्रत्यक्ष सेवेचा जो गोपाळरावांचा कार्यक्रम ते पुण्या-मुंबईकडे होते तेव्हा जसा चालायचा तसाच ते अहमदाबादला दहा-बारा वर्षे होते तिथेही चालायचा.'[2] याचप्रमाणे त्यांच्या लेखनातूनही त्यांनी देशाची विपन्नावस्था लोकांपुढे मांडून ती दूर करण्यासाठी कशा प्रकारच्या सामाजिक सुधारणा आपण घडवून आणल्या पाहिजेत याचीच शास्त्रीय चिकित्सा केली.

हिंदुस्थानातील दारिद्र्याची कारणे व उपाय यांची अत्यंत तपशीलवार चर्चा लोकहितवादींनी आपल्या अनेक ग्रंथांतून आणि पत्रांतून केलेली आहे. 'लक्ष्मीज्ञान' या आपल्या पहिल्याच प्रसिद्ध ग्रंथाच्या अखेरच्या पानावरील अखेरच्या परिच्छेदात त्यांनी म्हटले आहे, "लक्ष्मीज्ञान आम्ही मुळापासून संक्षेपाने निवेदन केलं हे

आपले देशाशी मिळऊन पाहिले म्हणजे दुर्दशेचें कारण व त्याचे उपाय समजतील." (पृ. ७१) ही दारिद्र्याची कारणे व उपाय यांचा एकत्रित बोध, त्यांना ॲडॅम स्मिथ यांच्या अर्थशास्त्रीय विवेचनातील एका महत्त्वाच्या सूत्रातून झाला. 'श्रमातून संपत्ती निर्माण होते' हे ते सूत्र होय. आयझॅक न्यूटन यांच्या शास्त्रीय शोधपद्धतीनुसार याचे वर्णन 'दैनंदिन अनुभवातील मध्यवर्ती सत्य घटना' असे करता येईल. 'लक्ष्मीज्ञान' या त्यांच्या १८४९ साली प्रसिद्ध झालेल्या पहिल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे,[३] "यास्तव लक्ष्मी या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, मनुष्याचा (च्या) उपजीविकार्थ व सुखार्थ जे जिन्नस पाहिजेत व असल्या ज्या जिनसांची किंमत होत्ये ते पदार्थ. तेव्हा या प्रकारची लक्ष्मी ईचा (च्या) शिवाय मनुष्याचे जीवन होणार नाही हा ईश्वरी नेम आहेच, व दुसरा ईश्वरी नेम आहे की, लक्ष्मीची प्राप्ती उद्योगाचे विना होणार नाही. तेव्हा उद्योगाशिवाय मनुष्याचे जीवन होत नाही हा निर्णय जाहला." त्याच प्रस्तावनेत पुढेही त्यांनी म्हटले आहे, 'तस्मात् लक्ष्मी मेहनतीनें उत्पन्न होत्ये हें सिद्ध होतें ' किंवा 'लक्ष्मीचा बाप उद्योग आहे आणि पुराणांत समुद्रमंथनापासून लक्ष्मी निघाली याचेंही तात्पर्य हेंच असेल कीं, सर्वांनी जेव्हां मेहनत केली तेव्हां लक्ष्मी प्राप्त जाहली. लक्ष्मी देशांत किती आहे याची बेरीज त्या देशांतील लोकांचें मेहनतीची बेरीज काढली म्हणजे त्याजवरून समजते. मेहनत हीच मूळ लक्ष्मी आहे, सोनेंरुपें ही लक्ष्मी नव्हे. जें सुख मनुष्यास होतें व जें मनुष्ये खातात, पितात, हें सर्व मेहनतीनें उत्पन्न होतें." अशा प्रकारे क्लीफ्ट यांच्या ग्रंथाधारे* लिहिलेला 'लक्ष्मीज्ञान' हा ग्रंथ म्हणजे ॲडॅम स्मिथप्रणीत अर्थशास्त्राचे लोकहितवादींना जाणवलेले सार होते व तेच त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मांडले आहे.

'श्रमातून संपत्ती निर्माण होते' या सूत्रातूनच लोकहितवादींच्या इतर विचारांचे पोषण कशा प्रकारे होत गेले हे पाहण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख या ठिकाणी करणे अगत्याचे आहे. देशातील लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने केवळ संपत्तीची निर्मिती विचारात घेऊन चालत नाही तर समाजातील तिच्या न्याय्य वाटणीचाही विचार व्हावा लागतो. ॲडॅम स्मिथप्रणीत अर्थशास्त्रात याची दखल घेतलेली आहे, आणि 'लक्ष्मीज्ञान'च्या प्रस्तावनेतही लोकहितवादींनी ही गोष्ट स्पष्टपणे मांडली आहे. 'मनुष्यास सुखी व्हावयास दोन गोष्टी पाहिजेत. एक लक्ष्मी पुष्कळ उत्पन्न केली पाहिजे आणि लक्ष्मीची वाटणी लोकांमध्ये बरोबर केली पाहिजे.' (पृ. ४८) किंवा 'जर त्यांस निर्वाहापुरते पदार्थ नसतील तर लोक वृध्दी पावत नाहीं किंवा पदार्थ असून त्यांची लोकांमध्यें चांगली वाटणी झाली नाहीं तरही लोक दरिद्री राहतात.' (पृ. ४८) अर्थात पाश्चात्त्य अर्थशास्त्रीय विकासात हा संपत्तीच्या वाटणीचा मुद्दा ॲडॅम स्मिथनंतर बराच काळ दुर्लक्षित राहिला तसाच तो लोकहितवादींच्या एकूण आर्थिक विचारातही दुर्लक्षित राहिलेला आहे. देशातील विषमतेच्या काही अप्रत्यक्ष उल्लेखाखेरीज हा विषय लोकहितवादींनी पुढे नेलेला दिसत नाही.

देशाचे दारिद्र्य दूर करणे म्हणजे अधिकाधिक संपत्तीची निर्मिती करणे आणि संपत्ती वाढविण्यासाठी समाजाने उद्योगाची कास धरली पाहिजे अशी लोकहितवादींच्या सर्व लेखनाला प्रेरणादायी अशी मूलभूत विचारधारा आहे. ही विचारधारा पक्की मनात बिंबली म्हणजे लोकहितवादींच्या इंग्रजांच्या राज्याविषयीच्या मतांचा पूर्णपणे उलगडा होतो. ' श्रमातून संपत्ती निर्माण होते ' या सूत्राच्या सत्यतेचा पडताळा त्यांना, इंग्रजी राज्याच्या आगमनानंतर येथील इंग्रजांच्या मेहनतीतून आला तसेच या मेहनतीतून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा प्रत्यय त्यांना इंग्लंड देशाच्या आपल्या डोळ्यादेखत वाढत असलेल्या श्रीमंतीतून, प्रत्यक्षपणे आला. इंग्रजांनी राज्य करायला सुरुवात केल्यावर जमिनीची व्यवस्था लावली, शाळा काढल्या, वेगवेगळ्या विषयांवर ग्रंथ लिहिले, व्यापार वाढवला— अशा अनेक गोष्टींवरुन लोकहितवादींच्या लक्षात आले की, 'इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षा अधिक काम करणारे, मेहनती, शहाणे, हुशार, खरे व प्रामाणिक आहेत.' (पत्र ३९) आणि इंग्रजांच्या श्रीमंतीचे रहस्यही त्यांना यातच आढळले. साहजिकच याच सर्व गोष्टी आपल्याशा करून आपल्यालाही देशाच्या दारिद्र्याचे निर्मूलन करता येईल हे लोकहितवादींनी जाणले. इंग्रजी राज्याचा त्यांनी केलेला गुणगौरव यासाठीच आहे.

हिंदुस्थान देशाचे स्वातंत्र्य बुडून देश पारतंत्र्यात पडला याची आणि देश ' इंग्रजां 'च्या ताब्यात गेला याचीही लोकहितवादींनी केलेली मीमांसा अर्थशास्त्रीय असून उपरोक्त विचारांचाच धागा त्यात स्पष्टपणे

दृग्गोचर होतो. देशाचे पारतंत्र्य आणि इंग्रजांचे राज्य येथे स्थापन होणे यात त्यांना 'ईश्वरी संकेत' दिसत होता त्याचीही हीच कारणमीमांसा आहे. 'लक्ष्मीज्ञानातील गोष्टी हिंदुस्थानास लावून पाहिल्या असता काय वाटते?' हे सांगताना लोकहितवादींनी म्हटले आहे, "लोकांच्या स्थिती वरचेवर बदलतात. बहुधा देशांतराचे इतिहासावरून पाहण्यांत आलें आहे कीं प्रथम लोक रानटी असतात. त्याजमध्यें कांही विशेष ज्ञान व बंदोबस्त नसतो. परंतु भोळसरपणा व प्रामाणिकपणा असतो. त्यास विलास ठाऊक नसतात व लक्ष्मी खर्च करून निरुपयोगी पदार्थावर प्रीती नसते असे असतात. परंतु नंतर अशा लोकांस द्रव्य किंवा शक्ती जर प्राप्त होईल तर त्यांस ओझें पडलेसें होतें, कारण कीं त्यांस माहिती नसतें. परंतु असे असतां असतां ते सुखाची ओळख पटतांच मनस्वी सुखास लुब्ध होतात आणि पहिला आपला सरळपणा वगैरे रानटी अवस्थेमध्यें जे गुण दर्शविले असतात ते सोडून भ्रष्ट, मारामारी करणारे व अन्याय करणारे होतात. त्यांचे चित्त विद्येवरून निघतें व निर्बळ व रोगी, असंपत्तीवान, असंततीवान, निःशौर्य, निस्तेज होतात. कलहास प्रवर्तक धैर्यभग्न होतात. हीं लक्षणें लोकांचे राज्य बुडण्याची आहेत व असे लोक जाहले म्हणजे त्यांजवर कोणीतरी येऊन पडून या बेवारशी लोकांवर सत्ता चालवितो....याप्रमाणे रूमचे लोक, ग्रीक देशाचे लोक व हिंदुस्थानचे लोक आहेत व त्यांची अशी दशा जाहली." (पृ. ७०)

याच विवेचनाचा पुढचा धागा लोकहितवादींच्या शतपत्रांतही सुरुवातीपासूनच आढळतो. 'हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा विचार' करणाऱ्या पत्रात (पत्र क्र. १२) लोकहितवादींनी लिहिले आहे, ".. ईश्वर स्वतः कोणास शहाणपणा शिकवीत नाही. एक भिकारी होतो. दुसरा मातबर होतो. तदवत् एका देशाची सुधारणा तो देश दुसऱ्या देशाचे अंमलांत गेल्याशिवाय होत नाहीं. असें तर चराचर चालत आलें आहे. पूर्वी हिंदू लोक शहाणे होते. त्यांचे शहाणपण मिश्र देशांत व यवन देशांत गेलें व ते देश रूमचे अंमलांत गेले तेव्हां रूमचे लोक शहाणे झाले. रूम टोपकर लोकांचे अंमलांत गेलें तेव्हां त्यांचें शहाणपण टोपकर लोकांस आलें, परंतु धालमेलींत मूळचें हिंदूंचें शहाणपण राहिलें नाहीं. तें मुद्दल. परंतु त्याची चक्रवाढ दर एक ठिकाणीं होतां होतां सांप्रत इंग्रज लोक हिंदु लोकांपेक्षा शंभरपट शहाणे झाले आहेत व तें शहाणपण हिंदु लोकांस प्राप्त व्हावें एतदर्थी ईश्वरानें हा मुलूख त्यांचे ताब्यांत दिला आहे. हें स्पष्ट दिसत आहे."

इंग्रजांचे वाढते शहाणपण व मेहनत हे त्यांच्या हिंदुस्थानातील साम्राज्यविस्तारास कारणीभूत ठरले तर हिंदुस्थानातील लोकांचे अज्ञान व आळशीपणा यामुळे त्यांनी आपले राज्य गमावले. हेच लोकहितवादींनी सूत्ररूपाने 'लक्ष्मीज्ञान'च्या अखेरच्या भागात एका वाक्यात सांगितले आहे. ते म्हणतात, "उद्योग व शहाणपणा याचा लोप जाहला म्हणजे तीच अवदशा व त्याची बुद्धी जाहली म्हणजे तीच लक्ष्मी.' (पृ. ७१) साहजिकच देशाची ही स्थिती बदलण्यासाठी, ज्या गुणांमुळे इंग्रज लोक वरचढ झाले त्याच गुणांची कांस धरून म्हणजे उद्योग व विद्या यांच्यात वाढ करून आपली उन्नती करवून घेतली पाहिजे. म्हणूनच लोकहितवादींनी येथील समाजाला या बाबतीत सदैव उपदेशामृत पाजले आहे. 'लक्ष्मीज्ञाना'च्या अखेरच्या परिशिष्टवजा मजकुरात लोकहितवादी लिहितात, 'हिंदु लोक मुख्यत्वेकरून मराठे लोक यांची सांप्रत अवस्था आहे त्याहून चांगली स्थिती होण्यास याणी शोध बहुत केले पाहिजेत व विद्या वाढवली पाहिजे व हल्लीच्या रीती व समजुती सोडल्या पाहिजेत. जोंपर्यंत या कायम आहेत तोंपर्यंत बरें होण्याचें चिन्ह नाहीं. जसें रोगी पथ्य करीत नाहीं तोंपर्यंत रोग जाणार नाही तद्वत् या देशाचे लोकांची अवस्था आहे. सर्वांस लक्ष्मी पाहिजे, परंतु तिला प्राप्त करण्याचे मार्ग थोडे लोकांस ठाऊक असतात. उद्योग, विद्या, सुनीती हे लक्ष्मीस आणणारे आहेत म्हणून यांची वृद्धी होईल ते यत्न करावे. खरेपणा वाढला पाहिजे, बुद्धी सुधारली पाहिजे, भाषा सुधारली पाहिजे. हीं जितकीं व्यंगे आहेत तितकीं नीट ज्या काळीं होतील त्या काळीं हे लोक लक्ष्मीवान होतील." (पृ. ७१).

लोकहितवादींनी इंग्रजी राज्याची जी स्तुती केली त्याचे एक अंग असे आहे की, त्यामुळे देशात नवीन सुधारणांचे वारे वाहू लागले. "आजकाल जो विद्याप्रसार होऊन तत्संबंधांच्या सुखास्वादनास आणि

ज्ञानप्राप्तिजन्य महानंदास लोक पावले आहेत हे सर्व यश दयाळू इंग्रज सरकारच्या साम्राज्यास असून मोठें भूषण आहे असें निःपक्षपातानें म्हणावें लागतें. त्यांनी अनेक विद्यांच्या शाळा घालून त्यांमधून मोजणीदार, पाहणीदार (सर्वेअर), शिल्पज्ञ (इंजिनिअर), वैद्य, शस्त्रवैद्य (डाक्तर, सर्जन), वकील, शिक्षक (मास्तर), मेस्त्री, न्यायाधीश (मुन्सफ, जज्ज), ग्रंथकार, योध्ये, लढाऊ लोक वगैरे हा सर्व उपयोगी विद्वत्समूह व शूर लोक हे उत्पन्न केले." (लोकहितवादी, स्वाध्याय पृ. १३२). इंग्रजांच्या त्यांनी केलेल्या स्तुतीचे दुसरे महत्त्वाचे अंग असे आहे की, जर इंग्रज या देशातून लागलीच निघून गेले तर देशाची उलट दुर्दशाच होईल. लोकहितवादींच्याच शब्दांत सांगायचे तर, "आमचे लोकांच्या रीती अगदीं बदलल्याशिवाय या देशाचें हित होणार नाहीं. व या लोकांस स्वतः राज्य चालविण्याचें सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशांतून गेले तरी उपयोग होणार नाहीं. पुन्हा गर्दी होईल व बेबंदी, अंदाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील, आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहणार नाहीं. जो जबरदस्त त्याचे हातीं सर्व जाईल. व जो निर्बल असेल तो उपाशी मरेल. सर्व त्याचें हरण होईल." (पत्र क्र. ८९) लोकहितवादींनी पुढे म्हटले आहे, "वास्तव सुज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करूं नये. याप्रमाणे सरकार व याप्रमाणें चांगले सुधारलेले लोक हिंदु लोकांस सोबतीस कदापि मिळणार नाहींत. इंग्रजांचे गुण पाहून हे लोक कांहीं तरी शिकतील..." (पत्र क्र. ८९). अर्थात इंग्रजी राज्याविषयीची लोकहितवादींची भूमिका अंधश्रद्धेची नव्हती तर अतिशय डोळस होती. कारण उपरोक्त शब्दांत 'इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करू नये' असे सांगताना पुढल्याच वाक्यात लोकहितवादी असेही म्हणतात की, "...परंतु याचे दरम्यान इंग्रज लोक हिंदु लोकांस अगदीं भिकारी करूं लागले तरी इंग्रज सरकाराशीं भांडून ज्या ज्या कायदेशीर तजविजी आहेत त्या करीत जाव्या" (पत्र क्र. ८९). म्हणजे इंग्रजी राज्याच्या हिंदुस्थानावरील अनुकूल परिणामाबरोबरच त्याच्या प्रतिकूल परिणामांविषयीही ते जागरूक आहेत. लोकहितवादींच्या मते जसे ईश्वरी इच्छेने इंग्रज सरकारचा उदय झालेला आहे तसेच, "जेव्हां हिंदु लोकांचा मूर्खपणा जाईल, तेव्हां ईश्वर इंग्रजांस या देशांतून जाण्याची आज्ञा करील" (पत्र क्र. ८९). इंग्रजांनी केव्हा जावे व ते केव्हा जातील याविषयीही लोकहितवादींनी स्पष्ट कल्पना दिलेली आहे. लोकहितवादी इंग्रज राज्यकर्त्यांनाच सांगतात की, "इंग्रज सरकारचा या देशात मोठा धर्म हाच आहे कीं, त्यांनी विद्या वाढवून या लोकांस शहाणे करावें आणि जेव्हां स्वदेशाचे राज्य करण्याचें व्यावहारिक ज्ञान यांस येईल आणि हे पृथ्वीवरची हकीकत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडतील तेव्हां हें राज्य त्यांनीं त्यांचें हवाली करावें." (पत्र क्र. ४६).

इंग्रजांमुळे येथे विविध विद्यांचा प्रसार होऊन सुधारणांच्या नव्या युगाला प्रारंभ झाल्याचे श्रेय इंग्रज राज्यकर्त्यांना देत असतानाच त्यांनी या देशातील लोकांच्यात असलेल्या सुधारणेच्या सुप्त क्षमतेलाही आवाहन केले आहे. इंग्रजांचे मुक्त कौतुक करतानाच त्यांनी लगेच असेही म्हणून ठेवले आहे की, "आतां असें म्हणण्यात आमचा असा केवळ उद्देश नाहीं कीं, ह्या देशांतील सर्वच लोक म्हणजे मूढ, मतिमंद, कर्तव्यशून्य आणि पराक्रमहीन आहेत. तर उलट तद्विरुद्ध गुणांनी ते मंडित आहेत. कारण कसाही कारागीर झाला तरी तो गारगोटीस हिरा करूं शकणार नाहीं, अथवा कसाही ज्ञानवान् पंडित शिक्षक झाला तरी तो निर्बुद्ध व गूढ विद्यार्थ्यास षडशास्त्री अथवा साधारण विद्वान करूं शकणार नाहीं. म्हणजे हे सर्व यश जरी आम्ही वर म्हटल्याप्रमाणें दयाळू राजास देतों तरी त्या यशाला आदिकारण जी बुद्धीची विपुलता तिचा रुजलेला अंकुर ह्या हिंदु लोकांत आहे, हेही लक्षांत वागविलें पाहिजे." (स्वाध्याय पृ. १३२). या आशावादापोटीच लोकहितवादींनी येथील समाजातील विविध वर्गांवर कडाडून टीका केली आहे. त्यांच्यात सुधारणेचे बीज आहे, म्हणूनच त्यांना सुधारण्यासाठी लोकहितवादींनी आयुष्यभराची खटपट आरंभली होती.

इंग्रज केव्हा जावेत याबरोबरच ते केव्हा जातील याविषयीही लोकहितवादींनी सविस्तर विचार मांडलेला दिसून येतो. ज्यासाठी आधुनिक विद्वानांनी लोकहितवादींना 'द्रष्टे' ठरविले आहे तो त्यांनी पुढे मांडलेला विचार त्यांच्या उपरोक्त अर्थशास्त्रीय ऐतिहासिक विवेचनाचाच या संदर्भातील अखेरचा टप्पा म्हणून सांगता येईल. लोकहितवादींनी लिहिले आहे,

" या लोकांच्या पायांतील शृंखला सुटतील. हे चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान होतील व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील तेव्हां सुखी होतील. लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील कीं, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. नंतर आपले लोक त्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हासारखे आम्हीं शहाणे आहों मग आम्हास अधिकार का नसावे ? मग हिंदु लोकांचे बहुत मत असें पडलें, म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करूं लागले, लांच खावयाचें सोडून दिले म्हणजे बहुतकरून मोगलीं कामें गवरनरीची-सुद्धा यांचें हातीं येतील, आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहतील. म्हणजे जसे हिंदुस्थानात प्रथम इंग्रज आले, त्या स्थितीवर येतील आणि आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील, राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांस महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशांशी देखील व्यापार करतील.

असे हे लोक प्रबळ झाले, म्हणजे इंग्रजांस कांहीं दिवसपर्यंत आभारी मानतील, कारण कीं त्यांचें योगानें हे ज्ञानी झाले, परंतु जा ( ज्या ) काळी इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बसवावयाचा आग्रह करतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्ही आपले देशास जावे. आतां आमचे देशाचा कारभार आम्हांस चांगला करतां येतो. तुमचे गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरतें इकडे येत जा. आमचे प्रजेचें जसें आम्ही रक्षण करितों, तद्वत् तुमचेंही करूं. परंतु तुमचे वर्चस्व नको. याप्रमाणे या देशाची गती होईल आणि नवीन राज्यस्थिती चांगले रीतीची होईल, पहिले अज्ञान अगदीं नाहींसे होईल. यांस दोनशे वर्षे तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत संशय नाहीं. असें मागले इतिहासावरून कल्पना होतें. आणि हें तथ्य आहे, अशी खातरजमा आहे." (पत्र क. ५४).

हिंदुस्थानातील देशी राजांचे राज्य का बुडाले, इंग्रजांचे पाय येथे का रोवले गेले, येथे प्रस्थापित झालेले इंग्रजांचे राज्य का टिकून राहावे, जर इंग्रज येथून निघून गेले तर देश परत दुर्दैवी अशा पूर्वस्थितीस कसा जाईल, इंग्रजांना आज ना उद्या हा देश सोडून जायचेच आहे पण त्यांनी केव्हा जाणे युक्त ठरेल आणि केव्हा त्यांना जावेच लागेल असा सर्वांगीण विचार कसा विशिष्ट सूत्रात बांधला गेलेला होता हे या ठिकाणी दिलेल्या लोकहितवादींच्याच लेखनातील विविध उद्धृतांवरून लक्षात येईल. लोकहितवादींच्या या इतिहास-मीमांसेचे वर्णनही मार्क्स यांच्या इतिहासमीमांसेच्या सिद्धांताप्रमाणेच, 'इतिहासाची भौतिकवादी मीमांसा' असेच करावे लागेल. अर्थात, मार्क्स यांनी मांडलेली मीमांसा ही प्रामुख्याने भांडवलशाहीचा उगम आणि तिच्या नाशाची शक्यता यांच्या संदर्भात मांडलेली होती तर लोकहितवादींची ही मीमांसा देशाच्या दारिद्र्यावस्थेशी संबंधित अशी आहे. मार्क्स यांनी हेगेल यांच्या तर्कपद्धतीचा वापर करून आपला विरोध–विकासाचा सिद्धान्त उभा केला. लोकहितवादींचा विचार हा साखळी पद्धतीचा असून तो हिंदू तत्त्वज्ञानातील चक्रनेमिक्रमाच्या पद्धतीने त्यांनी व्यक्त केला आहे. 'स्वाध्याय' मध्ये लोकहितवादींनी ही विकासाची भौतिक साखळी स्पष्ट शब्दांत सांगितली आहे :

" द्रव्यमदाचीं पटलें दरिद्रांजनानें दूर होतात असा सृष्टिनियम आहे. प्रथम दरिद्र, दरिद्रापासून उद्योग, उद्योगापासून लक्ष्मी, लक्ष्मीपासून मद आणि मदापासून पुनः दरिद्र ह्याप्रमाणें 'पुनर्दरिद्री पुनरेवयत्री' हें रहाटगाडगें चालू आहे. म्हणून सांप्रतचा विचार करून ज्यांस खऱ्या स्थितीचे ज्ञान झाले आहे त्यांनीं उत्तमावस्थेकडे प्रवृत्ति होईल अशा वळणाकडे लोकांस लावावें हें योग्य आहे .. पाश्चात्यांस कांहीं हजार हात नाहींत किंवा हजार डोळें नाहींत, तर तेही आमच्यासारखेच मानव आहेत. परंतु त्यांचे श्रेष्ठ्य उद्योगावर असून आमच्या लोकांचे श्रेष्ठ्य उद्योग नष्ट करणाऱ्या अनेक प्रकारच्या छंदफंदांत आहे. यामुळे येथील सर्वच प्रजा निरुपयोगी होऊन उद्योग व विद्या यांची दिशाभूल झाली. धनिक असतील त्यांनी भिकारी पोसावे, आणि भिकाऱ्यांनी भांग, अफू इत्यादि दुर्व्यसनांत मग्न राहावें असा उलट प्रकार सुरू होऊन विद्वानांची बूज व परामर्ष शून्यवत् झाला." (स्वाध्याय, परिशिष्ट १७, पृ. ३५७–५८).

मार्क्स यांच्या विरोध-विकासाची अखेर, भांडवलशाही नष्ट होऊन एक नवा वर्गविहीन असा समाज उभा करण्यात आहे. असा समाज (साम्यवादी) निर्माण झाला म्हणजे वर्गयुद्धाची शक्यता राहात नाही आणि मग 'thesis, antithesis आणि synthesis' चे चक्र तेथे थांबते असे तार्किकदृष्टया गृहीत धरले आहे. लोकहितवादींनी अर्थव्यवस्थेला 'उत्तमास्थे'कडे नेण्यातून ही दिशा दर्शविली आहे. चक्रनेमिक्रमाचा हा अर्थशास्त्रीय अवतार हा लोकहितवादींच्या विचारांचा महत्त्वाचा गाभा आहे.

श्रमातून संपत्ती निर्माण होते म्हणून श्रम केले पाहिजेत. त्यातूनच दारिद्र्य नष्ट होणार आहे हे सांगताना, दैववादातून बाहेर पडून लोकांनी काम करण्यावर लक्ष केंद्रित करावे, हे लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी ईश्वराचीच तशी इच्छा असल्याचे प्रतिपादन ते करतात. लोकहितवादींनी शतपत्रांत लिहिले आहे :

"...वास्तविक पाहिले तर ईश्वरइच्छा अशी आहे की, सर्वांनी उद्योग करावा. रामाने लंकेत जाण्याचा उद्योग केला की नाहीं ? मग वानराच्या हातून सिद्धी होऊ द्या, परंतु उद्योग करणे अवश्य आहे. मुळींच उद्योग सोडून राम अयोध्येत बसला असता तर रावणांस मारूं शकता काय ? ईश्वरइच्छा खरी, परंतु जसे तुम्ही त्यास प्रार्थाल तशी सिद्धी होईल. तुम्ही संसारात आहां, परंतु उद्योग केला तर मोक्षास जाल की नाही ? ईश्वरइच्छा तुमचे भावनेप्रमाणे व प्रार्थनेप्रमाणे आहे. ईश्वराची प्रार्थना करणे याचाच भाग उद्योग करणे आहे. उद्योग न करिता कोणी प्रार्थिल तर ईश्वराचे क्षोभास मात्र तो पात्र होईल. याजकरिता तुम्ही दैवावर भार देऊ नका. दैव पांगळे आहे." (पान १७०–१७१)–(पत्र नं. ६८).

---

**टीपा :**


१. Adam Smith, *Theory of Moral Sentiments ed. by* D. D. Raphael and A. L. Macfie, Glasgow (1976), cited in Phyllis Deane *: The Evolution of Economic Ideas*, Cambridge University Press, Cambridge, 1978. p. 7.

२. वैद्य, सरोजिनी, *गोपाळराव हरि*, सुपर्ण प्रकाशन, पुणे, पृ. २३–२४.

३. लोकहितवादी, *लक्ष्मीज्ञान*, दि. के. बेडेकर संपा. 'चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ', गोखले अर्थशास्त्र-संस्था, पुणे, पृ. ४७.

४. Horace William Clift, *Elements of Political Economy*, Printed at the Baptist Mission Press, Calcutta 1835.


■ ■

---

## लेखक परिचय


**रमेश पानसे :** प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

**जयकुमार फा. पाटील :** प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**नी. वि. सोवनी :** कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.

**भा. रा. ढेकणे :** सेवानिवृत्त प्राध्यापक आणि प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**मुकुंद कुलकर्णी :** टीचर फेलो, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

**यशवंत रारावीकर :** प्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग, बिटको महाविद्यालय, नाशिक रोड.

# उभयपक्षी मक्तेदारी बाजारपेठेतील वेतन-निश्चिती*

जयकुमार फा. पाटील

## १.१ प्रास्ताविक

या निबंधाचे उद्देश दोन आहेत

१. उभयपक्षी मक्तेदारी बाजारपेठेत वेतन-निश्चिती कशी होते यासंबंधीच्या काही सिद्धांतांचा चिकित्सक आढावा घेणे, व


२. या चिकित्सक आढाव्यातून स्पष्ट होणाऱ्या प्रश्नचिन्हांच्या अनुरोधाने निर्माण होणाऱ्या प्रतिक्रिया व्यक्त करणे.

## १.२ स्पर्धात्मक बाजारपेठ व वेतनदर

स्पर्धात्मक श्रमबाजारपेठ पुढील गृहीतांवर आधारित आहे: (१) असंख्य कामगार (२) रोजगार वेतनदर यासंबंधी संपूर्ण माहिती (३) कामगारांचा एकजिनसीपणा (४) त्यांची तर्कसंगत वर्तणूक (५) त्यांची संपूर्ण गतिशीलता (६) संघटनेचा अभाव (७) तर्कसंगत वर्तणुकीचे असंख्य नियोक्ते इ.

अशा स्पर्धात्मक श्रमबाजारपेठेत दीर्घकालीन समतोल अवस्थेसाठी, सीमांत प्राप्ती उत्पादकता, सरासरी प्राप्ती उत्पादकता, वेतनदर, सरासरी वेतन-खर्च व सीमांत वेतनखर्च एकमेकांशी समान असतात. या ठिकाणी एकूण उद्योगाच्या पातळीवर कामगारांसाठी व्यवसायसंस्थांच्या असणाऱ्या एकूण मागणीमुळे व विविध वेतन-दरांवर संबंधित कामगारांच्या एकूण पुरवठ्यामुळे वेतनदर ठरतो व तो त्या उद्योगातील प्रत्येक व्यवसायसंस्थेस स्वीकारावा लागतो हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजेच एका व्यवसायसंस्थेच्या दृष्टीने वेतनदर गृहीत आहे. व्यवसायसंस्थेला या वेतनदरास किती कामगारांना रोजगार द्यायचा एवढ्याच बाबतीत निर्णय-स्वातंत्र्य राहते.

आकृती १.




* या निबंधाच्या लेखनात केलेल्या अनेक मौलिक सूचनांबद्दल लेखक प्रा. आनंद नाडकर्णी यांचा कृतज्ञ आहे.

आकृती १ प्रमाणे, P या समतोल अवस्थेत,

OW = PM

येथे OW = वेतनदर.

PM = सीमांत प्राप्ती उत्पादकता
= सरासरी प्राप्ती उत्पादकता.
= सीमांत वेतन खर्च (MW)
= सरासरी वेतन खर्च (AW)


म्हणजेच OW = ARP = MRP = AW = MW व समतोल अवस्थेत व्यवसायसंस्थेची रोजगार पातळी = OM. या आकृतीत MRP हा वक्र वेगवेगळ्या संख्येने कामगारांना रोजगार दिल्यास व्यवसायसंस्थेस मिळणारी सीमांत प्राप्ती उत्पादकता दाखवितो. ARP हा वक्र संबंधित रोजगारपातळीची सरासरी प्राप्ती उत्पादकता दाखवितो. व्यवसायसंस्थेने स्वीकारलेले उत्पादनतंत्र लक्षात घेता, त्या त्या रोजगारपातळीस सरासरी प्राप्ती उत्पादकतेची कमाल शक्य मर्यादाही ARP वक्रामुळे स्पष्ट होते. सरासरी वेतन खर्च व व सीमांत वेतन खर्च OX अक्षाशी समांतर असणाऱ्या एकाच वक्राने दाखविले आहेत. कारण स्पर्धात्मक श्रमबाजारपेठेत व्यवसायसंस्थेच्या दृष्टीने वेतनदर स्वीकृत व स्थिर असतो. एका व्यवसायसंस्थेच्या रोजगारपातळीत होणारे बदल वेतनदरावर प्रभाव टाकू शकत नाहीत.

अल्पकाळात वेतनदर OW पेक्षा कमी किंवा अधिक असू शकेल परंतु त्या वेळी निर्माण होणारा समतोल अस्थिर असणार. कामगारांच्या पुरवठ्यात व कामगारांसाठी असणाऱ्या मागणीत चढउतार होऊन P ही दीर्घकालीन समतोलाची अवस्था निर्माण होईल. अल्प तसेच दीर्घकाळात या समतोलाची आणखी एक अट आहे, ती अशी की त्या रोजगारपातळीस वेतनदर वक्रास (AW=MW) सीमांत प्राप्तिवक्र (MRP) वरून खाली छेदणारा असला पाहिजे.

घटक बाजारपेठ (factor-market) व वस्तुबाजारपेठ (product market) पूर्ण स्पर्धात्मक असणे व्यवहारात घडत नाही. विशेषतः कामगारांच्या संघटना तसेच नियोक्त्यांच्या संघटना ही आजची वस्तुस्थिती आहे. ती लक्षात घेऊन वेतनदरनिश्चितीच्या संदर्भात अधिक वास्तवता आणण्यासाठी वरील प्रतिमानात पुढीलप्रमाणे सुधारणा केली जाते.

### १.३.१. एकक्रयाधिकार नियोक्ता व पूर्ण स्पर्धात्मक वस्तु-बाजारपेठ

अशा बाजारपेठेत श्रमाचा ग्राहक एकच परंतु असंख्य असंघटित कामगार असे गृहीत धरले जाते. नियोक्त्यांची श्रमखरेदीची पूर्वमंजूर अशी एकच व्यवस्था आहे किंवा अनेक नियोक्त्यांपैकी एकच नियोक्ता फार मोठ्या प्रमाणात श्रम खरेदी करतो, असे असल्यास हा प्रकार घडतो असे मानता येईल. अशा बाजारपेठेत कामगारांची भौगोलिक चलता शून्य आहे असे गृहीत धरणे आवश्यक ठरते.




आकृती २ मध्ये सरासरी प्राप्ती उत्पादकता वक्र (ARP) व सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र (MRP) प्रसामान्य आकाराचे आहेत. वस्तु-बाजारात पूर्ण स्पर्धा असल्याने सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र (MRP) व सीमांत उत्पादन मूल्य वक्र (VMP) एकच असणार. परंतु श्रमाचा पुरवठा व्यक्त करणारा

सरासरी वेतन खर्च वक्र (AW) मात्र डावीकडून उजवीकडे वर जाणारा आहे. परिणामतः सीमांत वेतन खर्च वक्र (MW) हा सरासरी वेतन खर्च वक्राच्या वरती असणार, कारण सीमांत वेतन खर्च सरासरी वेतन खर्चापेक्षा अधिक असणार. अशा श्रमबाजारात अधिक कामगार मिळविण्यासाठी अधिक वेतनदर द्यावा लागतो. समतोल प्राप्त करण्यासाठी नियोक्ता अशा पातळीपर्यंत रोजगार वाढवीत जाईल की ज्या ठिकाणी सीमांत वेतन खर्च व सीमांत प्राप्ती उत्पादकता समान होतील. OM या रोजगारपातळीस हे घडते. या रोजगार-पातळीस नियोक्ता MQ हा वेतनदर देणार, म्हणजेच या ठिकाणी कामगाराला त्याच्या सीमांत प्राप्ती उत्पादकतेपेक्षा (ME) कमी वेतनदर मिळणार. यालाच एकक्रयाधिकारातून निर्माण होणारे शोषण म्हणतात. आकृती २ मध्ये शोषणाचे हे प्रमाण EQ या अंतराने दाखविले जाते. या प्रकारच्या बाजारात व्यवसायसंस्थेच्या समतोलाची अट थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

$$VMP = MRP = MW > AW.$$

वरील विवेचनाच्या संदर्भात तार्किकदृष्ट्या एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो, तो प्रश्न असा: वस्तु-बाजारात पूर्ण स्पर्धा असताना, म्हणजेच एकजिनसी वस्तूची विक्री करणारे असंख्य उत्पादक हेच नियोक्ते असताना श्रम–खरेदी या एकाच निर्णयाच्या बाबतीत त्यांच्या धोरणात एकसूत्रीपणा का असावा ?

**१.३.२ एकक्रयाधिकार नियोक्ता व वस्तुबाजारपेठ एकाधिकाराची किंवा अपूर्ण स्पर्धेची**


अशा बाजारपेठेत श्रमाची खरेदी करणारा एकच नियोक्ता आहे व वस्तूच्या बाजारातही एकच विक्रेता आहे असे मानले जाते. सैद्धांतिक पातळीवर अशी अवस्था पूर्णपणे केंद्रीय आर्थिक नियोजन करणाऱ्या अर्थव्यवस्थेत संभवनीय आहे. भांडवलशाही किंवा मिश्र अर्थव्यवस्थेत ही दुहेरी परिस्थिती निर्माण होणे कठीण आहे.

अतिरंजित स्वरूपात असे गृहीत धरता येईल की कोणत्या तरी एका उद्योगात सर्व व्यवसायसंस्था श्रमखरेदी व वस्तु-विक्री या दोन्ही बाबतीत संयुक्त धोरण आखतात.

अधिक व्यवहारी पातळीवर ओढाताण करून असे म्हणता येईल की, एकाच उद्योगात, विशेषतः ज्यांच्या उत्पादनखर्चात वेतन-खर्चाचे प्रमाण फार मोठे आहे, अशा उद्योगातील व्यवसायसंस्था श्रमखरेदीच्या संदर्भात सामाईक धोरण स्वीकारतात. परंतु वस्तु-विक्रीच्या बाबतीत इतर काही कारणांमुळे (वस्तु-विभेद, कार्यक्षमतेतील फरक, उत्पादनतंत्रातील फरक इ.) कमी-अधिक प्रमाणात स्पर्धा करतात. अर्थात विश्लेषणाच्या दृष्टीने अशा परिस्थितीत एकच महत्त्वाचा बदल लक्षात घ्यावा लागेल. तो म्हणजे या प्रकारच्या बाजारात सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र व सीमांत उत्पादनमूल्य वक्र वेगवेगळे होतात. म्हणजेच VMP > MRP, अशी स्थिती निर्माण होते.

याही बाबतीत व्यवसायसंस्थेच्या समतोलाची प्राथमिक अट पूर्वीसारखीच आहे. म्हणजे MRP = MW किंवा सीमांत प्राप्ती उत्पादकता व सीमांत वेतनखर्च यांची समानता. आकृती ३ मध्ये या परिस्थितीचे स्वरूप दाखविले आहे.

आकृती ३




आकृती ३ मध्ये E या बिंदूत MRP=MW ही अट पूर्ण होते. म्हणजेच कमाल नफा मिळविण्यासाठी, समतोल अवस्था गाठण्यासाठी व्यवसायसंस्था OM इतके कामगार कामावर घेणार. वेतनदर QM = ON इतका असणार. याही ठिकाणी

$MRP = MW > AW$

परंतु $MRP = MW < VMP$

आणि $VMP > AW$

किंवा $VMP > MRP = MW > AW$

कारण $RM > EM > QM$.

आकृती २ मधील वेतनदर QM व सीमांत प्राप्ती उत्पादकता EM यांच्यातील अंतर EQ हे श्रमबाजारातील एकक्रयाधिकारामुळे निर्माण होते. शोषणाच्या या प्रकारास एकक्रयाधिकार शोषण ( monopsonistic exploitation ) असे नाव दिले जाते. तसेच सीमांत उत्पादन मूल्य (RM) व सीमांत प्राप्ती उत्पादकता (EM) यांतील फरकास "एकाधिकार शोषण" ( monopolistic exploitation ) असे नाव दिले जाते. कारण कामगारांच्या या शोषणास वस्तु-बाजारातील मक्तेदारी किंवा अपूर्ण स्पर्धेची परिस्थिती हा घटक कारणीभूत ठरतो.

## २.१ उभयपक्षी मक्तेदारी बाजारपेठ व वेतनदर

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की श्रमबाजार व वस्तु-बाजारात पूर्ण स्पर्धेची अवस्था गृहीत धरून केलेले वेतनविश्लेषण प्रत्यक्ष व्यवहारात केव्हाच लागू होणार नाही. श्रमबाजारात एकक्रयाधिकार व पूर्ण स्पर्धेचा वस्तुबाजार ही सैद्धांतिक अवस्था देखील तार्किक तसेच व्यावहारिक निकषावर वास्तववादी वाटत नाही. श्रमबाजारात एकक्रयाधिकार व वस्तुबाजारात एकाधिकार हा प्रकारही आत्यंतिक गृहीतावर आधारित अशा पूर्ण केंद्रीय नियोजन असणाऱ्या अर्थव्यवस्थेतच शक्य आहे व अशा अर्थव्यवस्थेत वेतनदरनिश्चितीचे धोरण फक्त आर्थिक निकषावरच आधारलेले असेल याची हमी देता येणार नाही.

आधुनिक अर्थव्यवस्थेत (भांडवलशाही किंवा मिश्रस्वरूपी) कोणतीही बाजारपेठ पूर्ण स्पर्धेची नसते. बाजारपेठेत अपूर्ण स्पर्धा निर्माण करणारे अनेक घटक वास्तवात असतात व ही गोष्ट वस्तुबाजारपेठ व घटक बाजारपेठ या दोन्ही बाबतीत खरी आहे. वस्तुबाजारातील एकाधिकाराचे वाढते प्रमाण, वस्तुभेद, विक्री-खर्चातील फरक किंवा व्यवसायसंस्थांचे उघड किंवा अव्यक्त संगनमत यामुळे वस्तुबाजार केव्हाही पूर्ण स्पर्धेचा राहात नाही. तसेच कामगारांच्या गतिशीलतेवर विविध मर्यादा, कामगारसंघटनांची वाढती संख्या व त्यांच्यातील एकीच्या भावनेची (संघटनांतर्गत व आंतर-संघटना) वाढती तीव्रता यांसारख्या कारणांमुळे श्रमबाजार एकाधिकाराकडे किंवा एकाधिकारयुक्त स्पर्धेकडे झुकू लागतो.

म्हणजेच प्रत्यक्ष व्यवहारात, श्रमबाजार व वस्तुबाजार या दोन्ही क्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात एकाधिकाराची स्थिती निर्माण होते. या परिस्थितीत :

१. वस्तुबाजारात एकाधिकाराचा अंश असणार

२. श्रम खरेदी करणाऱ्या नियोक्त्यांच्या बाबतीत एकक्रयाधिकाराचा अंश असणार.


३. महत्त्वाचे म्हणजे श्रमाच्या विक्रीच्या बाबतीत, श्रमपुरवठ्याच्या बाबतीतही एकाधिकाराचा अंश असणार.

या तिन्ही निकषांची एकाच वेळी एकाच प्रमाणात पूर्तता करणारी बाजार-अवस्था प्रत्यक्षात निर्माण होणे कठीण. किंवा एकाच वेळी एकाधिकाराचा वस्तुबाजार, एकक्रयाधिकाराचा घटकबाजार व एकाधिकाराचा श्रमपुरवठा अशी अवस्था असणे संभवनीय वाटत नाही. परंतु सैद्धांतिक विवेचनासाठी अशा प्रकारच्या बाजारपेठेस 'उभयपक्षी मक्तेदारी' या संज्ञेने ओळखले जाते. प्रत्यक्षात वेतनदर कसा ठरत असेल याच्या स्पष्टीकरणासाठी या प्रतिमानाचा वापर करता येईल व तसा वापर झालेला आहे. त्या प्रयत्नांचा आढावा घेणे हाच या निबंधाचा प्रमुख हेतू आहे.

## २.१.१ कामगार संघटना वेतनदरात वाढ करू शकतील का ?

वेतनदरासंबंधीचे सीमांत उत्पादकता विश्लेषण लक्षात घेता संघटनेच्या जोरावर (१) रोजगारी कायम ठेवून कामगार वेतनदर वाढवू शकणार नाहीत म्हणजेच वेतनदर वाढविण्यासाठी काही कामगारांची बेकारी त्यांना पत्करावी लागेल असा निष्कर्ष मांडला जातो.


आकृती ४




आकृती ४ पाहा. पूर्ण स्पर्धेच्या बाजारात ON या वेतनदरास, MRP हा सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र लक्षात घेता OM इतके कामगार रोजगारावर असतील. संघटित कामगारांनी $ON_1$ हा उच्चतर वेतनदर मिळविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यापैकी $M_1M$ इतक्या कामगारांना बेकार व्हावे लागेल. अर्थात असेही मत मांडले जाते की अशी बेकारी निर्माण होण्याचे कारण नाही. कारण वाढलेल्या वेतनदरामुळे कामगारांचा सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र (MRP) उजवीकडे वर सरकल्यास पुन्हा पूर्वीइतक्याच प्रमाणात रोजगार निर्माण होईल.

म्हणजेच आकृती ५ प्रमाणे MRP हा सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र असताना ON या वेतनदरावर OM इतके कामगार कामावर होते. संघटितपणे प्रयत्न करून वेतनदर $ON_1$ पर्यंत वाढविला व MRP पूर्वीचाच राहिला तर $M_1M$ इतके कामगार बेकार होणार. परंतु $MRP_1$ हा उजवीकडे असणारा सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र निर्माण झाल्यास (वेतनदरवाढीमुळे) या कामगारांना पुन्हा रोजगार मिळू शकतो. म्हणजेच मूळच्या MRP वक्रावर E पासून $E_1$ या बिंदूपर्यंत झालेले स्थानांतर नंतर $E_1$ वरून $E_2$ या उजवीकडील उच्चतर $MRP_1$ या वक्रावरील बिंदूपर्यंत होते. या विवेचनाच्या संदर्भात पुढील महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात:–

आकृती ५




(१) वेतनदराच्या वाढीमुळे सीमांत प्राप्ती उत्पादकता वाढते का सीमांत प्राप्ती उत्पादकतेच्या वाढीमुळे वेतनदर वाढविणे शक्य होते हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. म्हणजेच सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्राचे उजवीकडे होणारे स्थानांतर हा वेतनदरवाढीचा परिणाम का कारण हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

(२) दुसरा प्रश्न कामगारांच्या प्रवृत्तीशी संबंधित आहे. मूळ विवेचन असे ध्वनित करते की संघटित कामगार वेतनवाढीला प्रतिसाद म्हणून आपल्या उत्पादकतेत वाढ करतील हे गृहीत आहे, हे शंकास्पद वाटते. काही वेळेस असे सूचित केले जाते की अधिक वेतनदरामुळे अधिक व चांगले सेवन होऊ शकल्याने कार्यक्षमता वाढते व त्याचा उत्पादकतेवर स्वाभाविकपणे परिणाम होईल. परंतु हे जरी मान्य केले तरी,


(३) पुढचा प्रश्न असा निर्माण होतो की MRP वक्राचे होणारे हे उजवीकडील स्थानांतर वेतनदर-

वाढीबरोबर तात्काळ होते का ? त्यास काही कालावधी लागत असल्यास तेवढ्या काळात $M_1M$ इतक्या बेकार कामगारांचा प्रश्न संघटना कसा सोडविते ?

यांपैकी तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर मोघम पद्धतीने देण्याचा प्रयत्न प्रा. रॉथशिल्ड[1] यांनी केला आहे. वेतनदरातील वाढीमुळे प्रारंभी काही बेकारी निर्माण होईल. परंतु या वेतनदरवाढीमुळे वेतनदर-रोजगाराचे नियमन करणाऱ्या घटकांमध्ये असे काही बदल घडतील की ज्यामुळे ही बेकारी नष्ट होईल व वाढलेला वेतनदर हाच समतोल वेतनदर ठरेल. म्हणजेच वेतनदरवाढीमुळे प्रारंभीच्या बेकारीचा मुद्दा यात मान्य झालेला दिसतो. पण हा "प्रारंभा"चा कालखंड किती हे स्पष्ट होत नाही. तसेच संघटित सामर्थ्याच्या जोरावर वेतनदर वाढवून घेताना ही "प्रारंभीची बेकारी" कामगार संघटना मान्य करतात असे गृहीत पुन्हा ध्वनित केले जाते.

### २.१.२ श्रमाचा पश्चातरित (backward sloping) पुरवठावक्र व संघटित कामगारांनी मिळविलेली वेतनदरवाढ

कामगारांनी संघटितपणे सामुदायिक सौद्याने वेतनदर वाढविण्यात यश मिळविल्यास श्रमपुरवठा वक्राच्या पश्चातरित स्वरूपामुळे खऱ्या बेकारीचा (involuntary unemployment) प्रश्नच निर्माण होत नाही अशीही एक शक्यता मांडली जाते. कारण अशी वेतनदरवाढ झाल्यास श्रमाचा पुरवठा कमी होईल. (अधिक उत्पन्न मिळविणाऱ्या कामगारांच्या बायका काम सोडतील. मुलांना अधिक काळ उच्चतर शिक्षणाची संधी देता येईल किंवा कामगार स्वतःच कमी तास किंवा कमी दिवस काम करतील इ.). साहजिकच वाढलेला वेतनदर हाच समतोल वेतनदर ठरेल. आकृती ६ मध्ये ही शक्यता स्पष्ट केली आहे.




या आकृतीत DD हा श्रम-मागणी वक्र आहे. SS हा तथाकथित पश्चातरित श्रम-पुरवठा वक्र आहे. प्रारंभी ON हा वेतनदर होता. OM इतका श्रमपुरवठा होता. सामुदायिक सौद्याने हा वेतनदर $ON_1$ इतका वाढला. आता श्रम-पुरवठा $OM_1$ इतका आहे. म्हणजेच तो कमी झाला. परंतु $M_1M$ ला बेकारी म्हणता येणार नाही. कारण ती स्वेच्छेने पत्करलेली आहे. अर्थात याही विवेचनात काही प्रश्नचिन्हे आहेत.

१. एखाद्या विशिष्ट व्यवसायसंस्थेच्या किंवा उद्योगाच्या दृष्टीने वरील विवेचन व त्याचा निष्कर्ष शक्य व योग्य आहे का ? उत्पादित वस्तूचे स्वरूप, त्यासाठी वापरले जाणारे उत्पादनतंत्र व बाजारातील इतर परिस्थिती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत उद्योग किंवा व्यवसायसंस्था यांना आपल्या उत्पादनात वापरावे लागणारे श्रमाचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे का ?

२. दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा की $E_1$ या बिंदूमुळे व्यक्त होणारी अवस्था स्थिर समतोलाची मानता येईल का ? मूल्यसिद्धांताच्या मूलभूत विश्लेषणाप्रमाणे पुरवठावक्र मागणीवक्रास जेव्हा खालून वर छेदतो तेव्हाच स्थिर समतोलाची अवस्था निर्माण होते. $E_1$ या बिंदूत पुरवठावक्र मागणीवक्रास वरून खाली छेदतो.

३. संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करता पश्चातरित श्रम-पुरवठा वक्राची संकल्पना कितपत योग्य ठरते हाही महत्त्वाचा प्रश्न ठरू शकेल. कारण स्त्रियांनी श्रमबाजारातून बाहेर पडणे, मुलांचा शिक्षणकालावधी वाढणे व प्रौढ कामगारांचे कामाचे तास किंवा दिवस कमी होणे, हे सर्व बदल दीर्घकाळात होणारे आहेत. तसेच या काळाच्या ओघात अनेक अल्पावधी असे येतील की त्यामध्ये स्वेच्छेच्या बेकारीपेक्षा खरी बेकारीच

अधिक होण्याचीच शक्यता अधिक आहे. तसेच वाढत्या राहणीमानाच्या संदर्भात, ज्या वेतनदराच्या वर, श्रम-पुरवठ्याचे पश्चांतरित स्वरूप सुरू होते, तो पुरवठावक्रावरील बिंदू (EO)– यालाच पश्चांतरित श्रमपुरवठा वक्राचा क्रांतिबिंदू ( Critical Point ) असे नाव देता येईल– हा बिंदू वरवर पुढे पुढे सरकत जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

४. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा असा की पश्चांतरित श्रमपुरवठा वक्र सातत्याने (मंदपणाने का होईना) मागे जात राहील का ? प्रत्यक्षात असेही घडू शकेल की एका विशिष्ट वेतनदरपातळीनंतर हा वक्र OY अक्षास समांतर होईल. कारण मोकळा वेळ ( leisure ) वाढत गेल्यास त्यांचा अर्थपूर्ण वापर करण्यासाठी वाढत्या उत्पन्नाची गरज भासेल. किंवा मोकळ्या वेळेची उपयोगिता घटत जाईल. अशा वेळी कमी वेतनदरावर किंवा मोफत देखील समाधान देणारे काम करणे अधिक श्रेयस्कर मानले जाऊ शकेल.

## २.१.३ वस्तुबाजारपेठ पूर्ण स्पर्धेची व एकक्रयाधिकारी नियोक्ता

आपण पुन्हा एकदा आकृती २ लक्षात घेऊ. आकृतीवरून हे स्पष्ट आहे की संबंधित प्रकारच्या बाजारात ठरणारा वेतनदर MQ < EM असा आहे. म्हणजेच वेतनदर सीमांत प्राप्ती उत्पादकतेपेक्षा कमी आहे. आता आपण असे समजू की या परिस्थितीत कामगार संघटित झाले, व त्यांनी ON च्या ऐवजी $ON_1$ हा उच्चतर वेतनदर मागितला. आता कामगार संघटित झाल्यामुळे व्यवसायसंस्थेस होणारा सर्व श्रमपुरवठा त्या संघटनेच्या नियंत्रणाखाली आला असे म्हणता येईल. त्यामुळे ती संघटना असेही म्हणू शकेल की $ON_1$ हा वेतनदर मिळाल्यास व्यवसाय-संस्थेस वाटेल तितका श्रमपुरवठा होऊ शकेल व तसे न झाल्यास श्रमाचा पुरवठाच होणार नाही. याचाच अर्थ असा होतो की, अपेक्षित वेतनदरास संघटित कामगारांचा श्रमपुरवठा पूर्णतः लवचिक होतो व तेथे MW = AW (सीमांत वेतन खर्च = सरासरी वेतन खर्च) अशी अवस्था निर्माण होते. तसे झाल्यास $ON_1$ या वेतनदरास म्हणजेच पूर्वीपेक्षा अधिक वेतनदरास, पूर्वीपेक्षा अधिक रोजगार मिळू शकेल ( $MM_1$ इतका अधिक). किंवा याहीपेक्षा पुढे जाऊन असे म्हणता येईल की अत्यंत समर्थ ( म्हणजे आक्रमक किंवा हिंसक असा अर्थ घ्यायचा का ? ) अशी संघटना रोजगारपातळी OM टिकवून वेतनदर $ON_2$ = EM या पातळीपर्यंत वाढवू शकेल. म्हणजेच वेतनदर सीमांत प्राप्ती उत्पादकतेपर्यंत वाढवू शकेल.

या बाबतीत एक महत्त्वाचा प्रश्न असा निर्माण होतो की या ठिकाणी कामगार संघटनेची व्याप्ती काय असणार ? व्यवसायसंस्थेतील सर्व कामगारांची संघटना ? तशा उद्योगात काम करणाऱ्या सर्व कामगारांची संघटना ? संस्थांतर्गत किंवा उद्योगांतर्गत सर्व कामगार समावेशक अशी एकच संघटना असू शकते का ? वास्तवात एकाच व्यवसायसंस्थेत किंवा एकाच उद्योगात अनेक कामगार संघटना काम करीत असतात. अशी कामगार संघटना असलीच तर ती आहे त्या रोजगारावर MT या वेतनदराचीही मागणी करु शकेल.


## २.१.४ कामगार संघटना (मक्तेदार) व एकक्रयाधिकार नियोक्त्याने केलेला मूल्यभेद

जेव्हा श्रमाची मागणी करणारा एकच ग्राहक असतो म्हणजे एकक्रयाधिकारी नियोक्ता ही परिस्थिती असते तेव्हा हा एकक्रयाधिकारी नियोक्ता वेगवेगळ्या कामगारांना त्याच कामासाठी वेगवेगळा वेतनदर देऊ शकेल. असे घडल्यास त्या प्रकारास एकक्रयाधिकारी मूल्यभेद (monopsonistic discrimination) असे नाव दिले जाते. असा प्रकार घडत असल्यास जुन्या कामगारापेक्षा नव्या कामगारास अधिक वेतन दिले जाईल. (हा प्रकार पूर्वीच्या विवेचनात आपण दुर्लक्षित केला होता व असे गृहीत धरले होते की जादा कामगार आकर्षित करण्यासाठी फक्त नव्याच नव्हे तर पूर्वीच्या सर्व कामगारांना अधिक वेतन द्यावे लागते. त्यामुळेच सीमांत वेतनखर्चवक्र सरासरी वेतनखर्चवक्राच्या वरील बाजूस असतो.) या नवीन परिस्थितीत सीमांत वेतनखर्च हा नव्याने घेतलेल्या कामगाराच्या वेतना एवढाच असतो, त्याहून अधिक नसतो. परिणामी कामगारांचे होणारे एकूण शोषण किंवा व्यवसायसंस्थेला होणारा अवाजवी फायदा पूर्वीपेक्षा अधिक असणार.

अर्थात अशा प्रकारचा मूल्यभेद (वेतनदरभेद) कामगार असंघटित असतील तरच शक्य आहे. कामगार संघटित झाल्यास किमान हे अतिरिक्त शोषण टाळणे शक्य होईल व सर्वच कामगारांना एकत्र वेतनदर मिळू शकेल. वरील प्रकारचा मूल्यभेद प्रत्येक कामगाराच्या बाबतीत होत असेल तर त्याला "पूर्ण एकक्रयाधिकारी मूल्यभेद" (perfect monopsonistic discrimination) असे नाव दिले जाते. आजकालच्या श्रमबाजारात अशा प्रकारचा मूल्यभेद फारसा दिसत नाही. परंतु गटवार-मूल्यभेद (group discrimination) आढळते. पुरुष कामगारापेक्षा स्त्रियांना कमी वेतनदर देणे किंवा मुलांना प्रौढ कामगारापेक्षा कमी वेतन देणे ही त्याची उदाहरणे आहेत. याही बाबतीत कमी वेतनदर मिळणाऱ्या गटातील कामगारांनी संघटना केल्यास असा वेतनदर-भेद टाळणे शक्य आहे. अर्थात त्यासाठी, केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप सर्वसाधारणपणे सारखेच असले पाहिजे.

**२.१.५ संघटित कामगार व नियोक्त्यांचे संगनमत**

काही वेळेस एखाद्या उद्योगातील कामगार असंघटित असतात. परंतु विभाग १.३.२ मध्ये सूचित केल्याप्रमाणे त्या उद्योगातील व्यवसायसंस्था किमान श्रमधोरणाच्या बाबतीत संगनमत करतात. विशेषतः एकूण उत्पादनखर्चात वेतनखर्चाचे प्रमाण मोठे असणे किंवा संबंधित कौशल्य असणाऱ्या कामगारांचा पुरवठा मर्यादित असणे अशा कारणामुळे नियोक्ते किंवा व्यवसायसंस्था श्रमधोरणासंबंधी संगनमत करून विशिष्ट वेतनदरापेक्षा अधिक वेतनदर कोणीही द्यावयाचा नाही असे ठरवितात. (कारण एखाद्याने अधिक कामगार आकर्षित करण्यासाठी अधिक वेतनदर दिल्यास तसे करणे सर्वच नियोक्त्यांना भाग पडते.) अशा परिस्थितीत, सीमांत प्राप्ती उत्पादकता वाढली असतानाही वेतनदर मात्र पूर्वीच्याच खालच्या पातळीवर राहील. MRP = MW ही किमान अट देखील पूर्ण केली जाणार नाही. अशा वेळी कामगार संघटित झाल्यास ते आपला वेतनदर वाढलेल्या उत्पादकतेच्या दिशेने MRP = MW या पातळीपर्यंत वाढवू शकतील. आकृती ७ मध्ये ही परिस्थिती दाखविली आहे.




आकृती ७ मध्ये सर्व नियोक्त्यांनी संगनमताने ठरविलेला वेतनदर ON = EM हा आहे. त्या वेळी व्यवसायसंस्था OM इतके कामगार रोजगारावर घेते. व्यवसायसंस्थेचा मागणीवक्र DD म्हणजेच MRP वक्र आहे. समजा हा मागणीवक्र $D_1D_1$ असा उजवीकडे उच्चतर पातळीवर सरकला म्हणजेच कामगारांचा सीमांत प्राप्ती उत्पादकतावक्र उजवीकडे सरकला. आता OM इतका रोजगार असल्यास कामगारांची सीमांत प्राप्ती उत्पादकता EM ऐवजी $E_2M$ इतकी होते. म्हणजेच कामगारांना $ON_2 = E_2M$ इतका वेतनदर मिळाला पाहिजे. परंतु त्या परिस्थितीत कामगार असंघटित असल्याने व नियोक्त्यांनी संगनमत केले असल्याने ON हाच वेतनदर चालू राहील. म्हणजेच कामगारांना त्यांच्या वाढलेल्या सीमांत प्राप्ती उत्पादकते ($E_2M$) पेक्षा $EE_2$ इतके कमी वेतन दिले जाते. अर्थात प्रारंभीची परिस्थिती लक्षात घेता NES हा श्रमपुरवठा वक्र म्हणजे AW वक्र आहे, परंतु नियोक्त्यावर वेतनदराविषयीचे बंधन नसल्यास तो वेतनदर वाढवून ($ON_1$) अधिक कामगारांना ($MM_1$) रोजगार देईल. कारण नव्या परिस्थितीत सीमांत प्राप्ती उत्पादकता बरोबर सीमांत वेतन खर्च ही समतोलाची अवस्था $E_1$ या बिंदूत मिळते. परंतु वेतनदरासंबंधी संगनमत असल्याने ON हाच वेतनदर दिला जाणार. या अवस्थेत $N_2E_2$ हा श्रम-पुरवठा


वक्र मानावा लागेल. परंतु अशा वेळी OM हे कामगार पूर्णत: संघटित झाले तर कोणालाही बेकार न करता ते $E_2M$ इतका वेतनदर मिळवू शकतील.

वरील विवेचनाच्या संदर्भात व्यावहारिकदृष्ट्या पुढील प्रश्न निर्माण होतात :

(१) वरील परिस्थितीत संबंधित कामगार मूलत: असंघटितच असतील असे गृहीत धरणे कितपत वास्तव आहे ?

(२) नियोक्त्यांमध्ये संगनमत असते याची कामगारांना जाणीव होणार नाही का ?

(३) जर नियोक्ते संगनमताने वागत असतील आणि कामगारांची सीमांत प्राप्ती उत्पादकता वाढली – (ती का वाढली ? संबंधित वस्तूसाठी मागणी वाढली म्हणून ? नियोक्त्यांनी वस्तु-विक्रीच्या बाबतीतही संगनमत केले व किंमत वाढविली म्हणून ? का उत्पादनतंत्र व व्यवस्थापनात सुधारणा झाली म्हणून ? का संबंधित उत्पादनाची किंमत वाढली म्हणून ? का त्या वस्तूच्या मागणीच्या लवचिकतेत घट झाली म्हणून ? )– तर नफ्याचे कमालीकरण करण्यासाठी खरोखरच OM ऐवजी $OM_1$ इतके कामगार कामावर घेणे अधिक तर्कसंगत ठरते. कारण उत्पादनाची किंमत वाढल्यास सर्वच व्यवसायसंस्थांना $E_3M_1$ या उच्चतर वेतनावर अधिक रोजगार निर्माण करणे शक्य नाही का ? कारण अशा वेतनदरवाढीमुळे व वस्तूची किंमत वाढली असे मानल्यास इतर उद्योगांतून काही कामगार या उद्योगाकडे आकर्षित होतील. अर्थात याला काही कालावधी लागेल. (कदाचित नव्या श्रमपुरवठ्यात या उद्योगास आवश्यक असणाऱ्या कौशल्याचा अधिक पुरवठा असू शकेल.) अर्थात आहेत त्या कामगारांना संघटित होऊन देखील दोन पर्यायांतून निवड करावी लागेल. एकतर ते OM इतका रोजगार व $E_2M$ इतका वेतनदर यांचा एकत्रित स्वीकार करू शकतील. किंवा $OM_1$ इतका रोजगार व $E_3M_1$ इतका वेतनदर प्राप्त करू शकतील. म्हणजेच आहे त्याच रोजगारावर $E_2E$ इतकी वेतनदर-वाढ त्यांना मिळू शकेल. किंवा $MM_1$ इतकी रोजगारवाढ व $EE_4$ इतकी वेतनदरवाढ असा पर्याय त्यांना लक्षात घ्यावा लागेल. या दोन पर्यायांतून संघटित कामगार काय निवडतील हा यक्षप्रश्न ठरेल.




### २.१.६ अल्पाधिकारी वस्तुबाजारपेठ (oligopoly) कामगार संघटना व वेतनदरवाढ

वस्तुबाजारपेठेत अल्पाधिकारी स्वरूपाची स्पर्धा असेल तर त्या परिस्थितीत बेकारीचा परिणाम टाळून कामगार संघटना वेतनदरवाढ मिळवू शकतात. कारण अशा बाजारपेठेत वस्तूसाठी असणाऱ्या मागणीवक्रात (AR) प्रचलित किंमतीच्या ठिकाणी बाक (kink) असतो. परिणामत: संबंधित सीमांत प्राप्तिवक्र (MR) त्या बाकाखाली काही भागात खंडित होतो. आकृती ८ मध्ये ही स्थिती दाखविली आहे.

या आकृतीत AEAR हा व्यवसायसंस्थेचा सरासरी प्राप्तिवक्र आहे. $ME_1E_2MR$ हा सीमांत प्राप्ति-वक्र आहे. सरासरी प्राप्तिवक्रात E या बिंदूत बाक आहे. त्याच्या बरोबर खाली $E_1E_2$ एवढ्या अंतरात सीमांत प्राप्तिवक्र खंडित आहे. वस्तूची प्रचलित किंमत $EM_1$ इतकी आहे. या किंमतीला $OM_1$ इतके उत्पादन होते. त्या उत्पादनपातळीस (उत्पादन-तंत्राच्या मर्यादा लक्षात घेता) विशिष्ट संख्येने कामगार

लागणार. $OM_1$ या उत्पादनपातळीस व्यवसायसंस्था समतोलित होण्यासाठी सीमांत खर्चाचा वक्र $E_1$ ते $E_2$ या मर्यादेत कोठेही असू शकेल. तो समजा MC असा आहे, असे मानल्यास, कामगार संघटना वेतनदर वाढवू शकतील. तसे झाल्यास पूर्वीचाच रोजगार ($OM_1$ या उत्पादनाशी संबंधित) राहून सीमांत वेतनखर्च वक्र मात्र $MC_1$ असा वर सरकू शकेल. व तसा तो वर सरकणे $E_1$ या बिंदूपर्यंत शक्य आहे. अर्थात यासाठी कामगार संघटित असणे आवश्यक आहे. म्हणजेच अल्पाधिकार वस्तुबाजारात कामगार संघटना काही प्रमाणात, रोजगारपातळीवर प्रतिकूल परिणाम न होऊ देता, वेतनदर वाढवू शकतील. म्हणजेच या परिस्थितीत रोजगार स्थिर राहून वेतनदराची कमाल वाढ ही सीमांत खर्चात $E_1 E_2$ एवढी (वाढ घडवून आणण्यापुरती मर्यादित) राहील. या विवेचनातही काही प्रश्नचिन्हे निर्माण होतात. (१) $E_1$ ते $E_2$ या सीमांत प्राप्तिवक्राच्या खंडित भागात नेमके कोणत्या ठिकाणी MC वक्र असेल हे सांगता येत नाही. (२) वस्तुबाजारात अल्पाधिकार असताना त्या उद्योगातील कामगार प्रारंभापासूनच संघटित असण्याची जास्त शक्यता आहे व जो कोणता सीमांत खर्च वक्र निर्माण होत असेल त्यामध्ये संघटित कामगारांना मिळालेल्या उच्चतम वेतनदराचा समावेश असेल म्हणजेच उत्पादनाच्या इतर निविष्टींच्या बाबतीत कदाचित एकक्रयाधिकारामुळे थोडीफार कमी किंमत दिली जात असेल. अशा वेळी संघटित कामगारांनी आणखी वेतनदर-वाढ मागितल्यास घटक पर्यायीकरणाचा (म्हणजेच भांडवलप्रधान प्रगत तंत्राचा) वापर होण्याची शक्यता आहे.

### ३.१ उभयपक्षी मक्तेदारी व वेतननिश्चिती

वस्तुबाजार किंवा घटकबाजार यांपैकी कोणताच बाजार वास्तवात पूर्ण स्पर्धात्मक केव्हाही असत नाहीत. उलट या दोन्ही बाजारांत एकाधिकाराचा प्रभाव वाढत गेलेला दिसतो. व्यवसायसंस्थांच्या मालकीचे केंद्रीकरण, सार्वजनिक मालकीच्या उद्योगांचे वाढते प्रमाण, कामगार संघटनांचे वाढते प्रमाण व अशा संघटनांचा संघर्षात्मक कार्यावर असणारा भर ही आजच्या बहुसंख्य बाजारपेठांची वास्तवता आहे. त्यामुळे पूर्ण स्पर्धात्मक बाजारपेठ किंवा वर २.१.६ पर्यंत मांडलेल्या इतर बाजारपेठांची प्रतिमाने वास्तवतेशी फार विसंगत आहेत. परंतु त्याचबरोबर हेही स्पष्ट होते की, सीमांत उत्पादकता संकल्पनेवर आधारित विश्लेषण सर्व प्रकारच्या बाजारपेठेचे विश्लेषण करण्यासाठी अर्थपूर्ण पद्धतीने वापरता येऊ शकते. त्या दृष्टीने विचार करता दुहेरी स्पर्धेच्या बाजारपेठ-प्रतिमानापेक्षा दुहेरी एकाधिकार बाजारपेठ किंवा उभयपक्षी मक्तेदारी बाजारपेठेचे प्रतिमान वास्तवतेशी अधिक जवळचे व सुसंगत वाटते. हे लक्षात घेऊन वेतनदरनिश्चितीसंबंधी जे विवेचन झाले आहे त्याचा अधिक काळजीपूर्वक व चिकित्सक अभ्यास करणे धोरणात्मकदृष्ट्या अधिक उपयुक्त ठरते. या ठिकाणी या संबंधातील तीन प्रमुख प्रयत्नांचा विचार केलेला आहे.

#### ३.१.१ उभयपक्षी मक्तेदारीचा श्रम-बाजार–अर्थ

आधुनिक औद्योगिक रचनेत कोणत्याही सर्वसाधारण प्रगत, सुसंघटित व यांत्रिक पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर करणाऱ्या उद्योगातील श्रम-बाजार उभयपक्षी मक्तेदारीचा असतो. एका बाजूस श्रमासाठी मागणी व्यक्त करणाऱ्या काही मोठ्या व अनेक लहान व्यवसायसंस्था प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने श्रमसंबंधात धोरण आखण्यासाठी एकत्रित निर्णय घेतात किंवा काही मोठ्या व्यवसायसंस्थांचे श्रमविषयक धोरण इतर लहान व्यवसाय-संस्थांना पत्करणे भाग पडते. म्हणजेच एका अर्थाने श्रमासाठी मागणी व्यक्त करणाऱ्यांचा एकक्रयाधिकार (monopsony) निर्माण होतो. दुसऱ्या बाजूस त्या उद्योगात काम करणाऱ्या व तशा प्रकारचे विशिष्ट कौशल्य असणाऱ्या कामगारांच्या व्यवसायसंस्था पातळीवर छोट्याछोट्या संघटना तयार होतात. अशा सर्व संघटनांचा एक महासंघ (federation) निर्माण होतो. हा महासंघ सर्व सभासद कामगारांच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवतो. म्हणजेच हा कामगार संघटना महासंघ त्या उद्योगास श्रमपुरवठा करणारा एकाधिकार (monopolist) ठरतो. परिणामतः अशा प्रकारची श्रमबाजारपेठ ही उभयपक्षी मक्तेदारीचे स्वरूप धारण करते.

अशा प्रकारच्या उभयपक्षी मक्तेदारी श्रमबाजारात श्रमाची किंमत म्हणजेच वेतनदर कसा ठरतो या संदर्भात तीन प्रमुख प्रतिमानांचा यानंतरच्या विभागात आपण विचार करणार आहोत.

ही प्रतिमाने पुढीलप्रमाणे : (१) डनलॉप प्रतिमान (२) फेलनर प्रतिमान (३) कार्टर प्रतिमान

### ३.१.२. प्रा. जे. टी. डनलॉप यांचे प्रतिमान


उभयपक्षी मक्तेदारीच्या श्रमबाजारात वेतनदर कसा ठरू शकेल यासंबंधी प्रा. जे. टी. डनलॉप[२] यांनी केलेले विवेचन पुढीलप्रमाणे मांडता येईल. वेतनदरनिश्चितीच्या प्रक्रियेचा भाग म्हणून कामगार संघटनेच्या धोरणासंबंधी काही स्पष्ट अशी गृहीते प्रा. डनलॉप यांनी मांडली आहेत. ती पुढीलप्रमाणे.

(१) कामगार संघटना सर्व सभासद-कामगार रोजगारावर राहतील असा प्रयत्न करते. किंवा

(२) कामगार संघटना सर्व सभासद-कामगाराचे एकूण उत्पन्न (वेतनापासून मिळणारे) कमाल करण्याचा प्रयत्न करते. किंवा

(३) कामगार संघटना वेतनदर कमाल करण्याचा प्रयत्न करते पण त्याच वेळी संघटनेचे सातत्याने सभासदत्व टिकविणाऱ्या केंद्रीय किंवा महत्त्वाच्या (core) सभासदांचा रोजगार टिकेल असा प्रयत्न करते. म्हणजेच काही दुय्यम महत्त्वाच्या सभासदांची बेकारी पत्करण्याची तिची तयारी असते.

प्रा. डनलॉप यांच्या मते कामगार संघटना या उद्दिष्टांपैकी कोणत्या तरी एका उद्दिष्टाची प्राप्ती करण्याचा प्रयत्न करते. ही सर्वच उद्दिष्टे एकाच वेळी साध्य करणे अशक्य आहे कारण ती परस्परविरोधी आहेत हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. आकृती ९ च्या आधारे हे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.




आकृती ९ मध्ये $D_1D_1$ हा वक्र उद्योगांतर्गत सर्व व्यवसायसंस्थांच्या श्रममागणी वक्रांची समस्तरीय बेरीज दाखविते. म्हणजेच तो एकूण उद्योगाचा श्रममागणी वक्र (ARP) आहे. संबंधित सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र (MRP) $D_1 M_2$ हा आहे.[३]

(अ) समजा कामगार संघटनेचे एकूण सभासद $OM_1$ इतके आहेत. त्या सर्वांना रोजगार देणे हे जर संघटनेचे उद्दिष्ट असेल तर संघटनेला $OW_1$ हा वेतनदर मान्य करावा लागेल.

(ब) परंतु आहे त्या परिस्थितीत कामगारांना कमाल वेतन रक्कम मिळवून देणे हे संघटनेचे उद्दिष्ट असल्यास, संघटना $OW_2$ हा वेतनदर मान्य करील. परिणामी $OM_2$ इतक्याच कामगारांना रोजगार देता येईल. म्हणजेच संघटनेला $M_2M_1$ इतक्या कामगारांची बेकारी मान्य करावी लागेल. ($E_2$ या ठिकाणी $D_1$ $D_1$ या श्रममागणी वक्राची लवचिकता एक आहे.) $OM_2$ या रोजगारपातळीस सीमांत प्राप्ती उत्पादकता शून्य आहे. $OW_2$ या वेतनदरापेक्षा कमी किंवा अधिक वेतनदरास मिळणारी एकूण वेतनरक्कम रोजगाराचे प्रमाण कमी-जास्त होऊन देखील, कमीच होणार. कारण $OW_2 E_2 M_2$ हा $OD_1D_1$ या क्षेत्रात बसणारा कमाल क्षेत्रफळाचा चौकोन आहे.

प्रा. डनलॉप यांनी असेही स्पष्ट केले आहे की $M_2 M_1$ या बेकार होणाऱ्या सभासद-कामगारामुळे संघटनांतर्गत प्रश्न व दबाव निर्माण होतील. ते सोडविण्यासाठी एकतर संघटनेने $OM_2$ या रोजगारावर असणाऱ्या सभासद-कामगारांकडून वर्गणी घेऊन $M_2 M_1$ या बेकार कामगारांसाठी बेकारी भत्त्याची तरतूद केली पाहिजे. किंवा सामाजिक सुरक्षेच्या माध्यमातून बेकारी भत्त्याची व्यवस्था मिळविली पाहिजे.

(क) समजा $OM_3$ हे संघटनेचे कायमचे, महत्त्वाचे, केंद्रीय (Core) सभासद आहेत. त्यांच्यासाठी

कमाल वेतनदर मिळविणे हे संघटनेचे उद्दिष्ट असल्यास संघटना $OW_3$ या वेतनदराचा आग्रह धरेल. त्या वेतनदरास $OM_3$ एवढ्याच महत्त्वाच्या सभासद-कामगारांना रोजगार मिळेल. प्रा. डनलॉप यांच्या मते असे घडण्यासाठी $M_3 M_1$ इतक्या प्रमाणात हंगामी कामगारभरतीस उद्योगाची तयारी पाहिजे. तसेच $M_3 M_1$ हे हंगामी कामगार व त्यांचे आर्थिक कल्याण ही संघटनेची स्वीकृत जबाबदारी नाही असे कायम महत्त्वाच्या केंद्रीय सभासदांना वाटले पाहिजे.

प्रा. डनलॉप यांच्या प्रतिमानासंबंधी काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. ते पुढीलप्रमाणे मांडता येतील.

(१) संघटनेच्या तीन पर्यायी उद्दिष्टांपैकी, सर्व सभासद कामगारांना रोजगार मिळविणे हे उद्दिष्ट मूलभूत महत्त्वाचे मानावे लागेल. कारण कोणत्याही एका सभासदाच्या दृष्टीने, बेकार असण्यापेक्षा थोड्या कमी वेतनदरावर रोजगार मिळणे अधिक श्रेयस्कर मानले जाणे मानसशास्त्रीयदृष्ट्या अधिक तर्कसंगत वाटते. कमी वेतनदर व संघटनेकडून किंवा समाजाकडून मिळणारी बेकारी-मदत यांपैकी व्यक्ती काय निवडेल याचे उत्तर स्पष्ट आहे. विशेषतः अधिक वेतनदर मिळवून कमी संख्येने रोजगारावर असणाऱ्या सभासद कामगाराकडून बेकार कामगारांना, एका बाजूस कमी वेतनदर व रोजगार आणि दुसऱ्या बाजूस बेकारीभत्ता व बेकारी यांच्यात निवडीच्या दृष्टीने तटस्थता निर्माण करता येईल इतक्या प्रमाणात बेकारीभत्ता देता येईल असे वाटत नाही. प्रा. पी. एन्. चोप्रा[४] यांनी ते शक्य होईल असे मत मांडले आहे. पण त्याची सिद्धता त्यांनी दिलेली नाही.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की कामगार संघटनेचे मूलभूत व्यावहारिक उद्दिष्ट संघटनेची सभासद-संख्या वाढविणे किंवा किमान आहे ती टिकविणे – म्हणजेच सभासदांची बांधिलकी कमाल करणे हे मानता येईल. यालाच प्रा. डनलॉप वेतनदर-सभासदत्व फल ( wage membership function ) असे नाव देतात. कामगार संघटनेची सौदाशक्ती गुणात्मकदृष्ट्या सभासदांच्या बांधिलकीच्या व संख्यात्मकदृष्ट्या सभासद-संख्येच्या सरळ प्रमाणात असणार हे स्पष्ट आहे. विशेषतः दीर्घकाळाचा विचार करता वाढती सभासदसंख्या हा महत्त्वाचा विचार ठरतो. त्याकडे दुर्लक्ष केल्यास पर्यायी कामगार संघटना व उद्दिष्टांची वेगळी संरचना निर्माण होईल व उद्योगाची सौदाशक्ती त्या प्रमाणात वाढेल. परिणामतः परस्परांला स्पर्धक असणाऱ्या अनेक संघटना व कमी वेतनदर असा दुहेरी तोटा होण्याची शक्यता आहे. याच कारणामुळे केंद्रीय सभासदांना कमाल शक्य असणाऱ्या वेतनदरावर रोजगार देण्याचे उद्दिष्ट अयोग्य व अडचणीचे वाटते.

याच बाबतीत आणखीही एक अस्वस्थ करणारा प्रश्न निर्माण होतो. प्रा. डनलॉप यांच्या विवेचनात असे सूचित होते की संघटित कामगारांचे नेतृत्व करणारी व्यक्ती किंवा लहानसा व्यक्तिगट, रोजगार-प्रमाण, वेतनदर तसेच वेतन सभासदत्व फल या तीन फलसंबंधांचे नेमके आकलन करू शकतो व फक्त तेवढ्याच निकषावर निर्णय घेतो. प्रत्यक्षात कामगारनेत्याजवळ अशी आकलनशक्ती असणे दुर्लभ आहे. तसेच त्याच्या निर्णयावर वरील निकषांखेरीज इतरही घटकांचा प्रभाव पडू शकतो हा नेहमीचा अनुभव आहे.

(२) प्रा. डनलॉप यांनी श्रमासाठी असणाऱ्या मागणीसंबंधी फारसे विवेचन केलेले नाही. उत्पादनाचे तंत्र, इतर उत्पादनघटकांच्या तुलनात्मक किमती व उत्पादित वस्तूंची किंमत इत्यादी घटकांचा त्यांनी उल्लेख केला आहे. परंतु या गोष्टी लक्षात घेऊन उद्योग किंवा व्यवसायसंस्था फायद्याचे कमालीकरण एवढ्या एकाच निकषावर वेतनदरासंबंधी निर्णय घेतात असे गृहीत त्यांनी अव्यक्त स्वरूपात स्वीकारलेले दिसते. उद्योगासाठी कामगारांची बांधिलकी, समाधानी कामगारवर्ग, औद्योगिक शांतता, अखंडित उत्पादन, कर टाळण्यासाठी पर्यायी मार्ग, काही प्रमाणात अतिरिक्त कामगारसंख्येची आवश्यकता व कामगार नेत्याला निष्प्रभ करणे यांसारख्या अनेक घटकांचा या ठिकाणी विचार होणे आवश्यक आहे.


### ३.१.३. प्रा. फेलनर यांचे प्रतिमान

प्रा. फेलनर[५] यांनी उभयपक्षी मक्तेदारी श्रम-बाजारातील वेतननिश्चितीचे वेगळ्या पद्धतीने विश्लेषण केले आहे. प्रा. फेलनर यांच्या विवेचनाचा मूळ आधार "कामगार संघटना नेहमी वेतनदर व रोजगार

यांच्या एकत्रित पर्याप्त पातळीवर पोहोचण्याचा प्रयत्न करतात" हे गृहीतक आहे. प्रत्यक्ष कोणता वेतनदर + कोणती रोजगारपातळी यांची संयुक्तपणे निवड केली जाईल हे समजून घेण्यासाठी प्रा. फेलनर यांनी वेतनदर व रोजगारपातळी या संबंधात कामगार संघटनेसमोर समवृत्ती वक्रांचा नकाशा असतो अशी कल्पना केली आहे. या वक्रांच्या आकारावरून श्रमपुरवठा व्यक्त होतो, तर व्यवसायसंस्थेच्या (किंवा उद्योगाच्या) दृष्टीने सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र श्रमासाठी मागणी व्यक्त करतो. या संकल्पनांच्या आधारे प्रा. फेलनर दोन शक्यता लक्षात घेतात.

### ३.१.३ – अ – वेतनदर रोजगार समवृत्ती वक्र OX अक्षाला समांतर

प्रा. फेलनर प्रथम असे गृहीत धरतात की कामगार संघटना फक्त वेतनदर कमाल करण्याचा प्रयत्न करतात. त्याचा रोजगारावर काय परिणाम होणार आहे याचा विचार मात्र संघटना करीत नाही. अशा वेळी आकृती १० मध्ये दाखविल्याप्रमाणे संघटनेसमोरील वेतनदर-रोजगार समवृत्ती वक्र सरळ रेषात्मक व OX अक्षाला समांतर असतील.




ARP हा एकक्रयाधिकार नियोक्त्याचा सरासरी प्राप्तीवक्र आहे. MRP हा त्याचा सीमांत प्राप्ती वक्र आहे. $W_1I_1$ ते $W_6I_6$ हे कामगार संघटनेचे वेतनदर-रोजगार समवृत्ती वक्र आहेत. यांपैकी प्रत्येक उच्चतर समवृत्ती वक्र अधिक वेतनदर दाखवितो. प्रत्येक समवृत्ती वक्र अशा पद्धतीने काढला आहे की त्यामुळे कामगार संघटनेच्या समाधानात होणारी वाढ पूर्वीइतकीच आहे. परिणामतः वेतनदरातील वाढ होत असताना, तेवढ्याच समाधानवाढीसाठी पूर्वीपेक्षा अधिक वेतन-वाढ प्रत्येक वरच्या वेतनदरावर आवश्यक ठरणार ($W_1W_2 < W_2W_3 < W_3W_4 < W_4W_5 < W_5W_6$) जास्तीत-जास्त वेतनदर मिळविण्यासाठी आवश्यक ते सामर्थ्य कामगार संघटनेकडे आहे असे गृहीत धरल्यास व त्या प्रक्रियेत मिळेल तेवढाच रोजगार स्वीकारण्याची संघटनेची तयारी आहे असे मानल्यास आकृती १० प्रमाणे $OW_5$ = EM हा कमाल वेतनदर मिळवेल व त्या वेळी रोजगार-प्रमाण OM इतके असेल. समतोलाचा E बिंदू असा आहे की त्या ठिकाणी वेतन-रोजगार समवृत्ती वक्र (जो OX अक्षाला समांतर आहे) तो ARP वक्रास स्पर्शीय आहे. त्याच बिंदूत MRP वक्र ARP ला वरून खाली छेदतो. म्हणजेच या ठिकाणी कामगार संघटना जो वेतनदर मिळविते तो OM एवढ्या रोजगाराच्या सीमांत प्राप्ती उत्पादकतेइतका आहे. म्हणजेच या ठिकाणी रोजगारावर असणाऱ्या कामगारांचे शोषण नष्ट होते. अर्थात या ठिकाणी समतोलाच्या अटी AW = MW = MRP = ARP अशा दुहेरी स्वरूपाच्या आहेत. $OW_6$ हा वेतनदर ARP वक्राच्या वर असल्याने म्हणजेच व्यवसायसंस्थेच्या कुवतीच्या पलीकडे असणारा व परिणामी तोटा निर्माण करणारा असल्याने तो वेतनदर संभवत नाही. त्याचा कामगार संघटनेने आग्रह धरल्यास व्यवसायसंस्था बंद केली जाईल. अर्थात कामगार संघटनेस ARP वक्राची जाणीव आहे हे गृहीत धरावे लागते. तसेच व्यवसायसंस्था तोटा पत्करणार नाही हेही उघडच आहे.


परंतु एकक्रयाधिकारी नियोक्ता कमीत कमी वेतनदर देण्याचा प्रयत्न करणार असेही गृहीत धरता येईल. तसे करण्यासाठी आवश्यक ती सौदाशक्ती त्याच्याकडे आहे. त्या बाबतीत एवढेच म्हणता येते की हा किमान वेतनदर कामगार संघटनेला स्वीकारार्ह असला पाहिजे. कामगार संघटनेच्या दृष्टीने

असाही एक वेतनदर असणार की ज्यापेक्षा कमी वेतनदर द्यायचे नियोक्त्याने ठरविले तर ते संघटनेला मान्य होणार नाही. समजा हा वेतनदर $OW_3$ आहे, त्यापेक्षा कमी वेतनदरास कामगार संघटना संपावर जाणे अधिक पसंत करतील. या परिस्थितीची जाणीव नियोक्त्याला नेहमीच ठेवावी लागेल. हा किमान वेतन दर पुढील घटकांवरही अवलंबून राहील. उदा. एकूण बाजारस्थिती, उत्पादित वस्तूच्या मागणीची लवचिकता, भांडवल व श्रम यांच्यातील पर्यायितेची लवचिकता, कामगारांचा प्रचलित राहणीमान खर्च इत्यादी. या ठिकाणी एवढेच म्हणता येईल की, किमान वेतनदराची ही संकल्पना बरीच अस्पष्ट आहे. म्हणजेच प्रत्यक्षात ठरणारा वेतनदर हा कमाल वेतनदर EM व अस्पष्ट असणारा किमान वेतनदर यांच्या दरम्यान कोठेतरी असणार. नियोक्त्याच्या तुलनेने कामगार संघटनेची सौदाशक्ती अधिक असल्यास प्रत्यक्ष वेतनदर कमाल वेतनदराच्या अधिक जवळ असेल. उलट, नियोक्त्याची सौदाशक्ती अधिक असल्यास, ठरणारा वेतनदर किमान वेतनदराच्या अधिक जवळ असणार. महत्त्वाचे म्हणजे या विवेचनात वेतनदर बराचसा अनिश्चित राहतो.

### ३.१.३– ब–वेतनदर–रोजगार समवृत्ती वक्र प्रसामान्य स्वरूपाचे

३.१.३– अ मधील विवेचनात कामगार संघटना फक्त वेतनदराचा विचार करते, त्याचा रोजगारावर होणारा परिणाम लक्षात घेत नाही (वेतनदर व रोजगार प्रमाण पूर्णतः अपर्यायी आहेत) असे मानले होते. असे प्रत्यक्षात घडणे शक्य नाही. प्रत्यक्षात वेतनदर व रोजगार काही प्रमाणात तरी परस्पर पर्यायी असतात. परिणामतः वेतनदर–रोजगार समवृत्ती वक्र मूळ बिंदूस बहिर्वक्र असणार. म्हणजेच त्यांचा आकार प्रसामान्य (Normal) स्वरूपाचा असणार. अशा परिस्थितीत उभयपक्षी मक्तेदारी श्रमबाजारात वेतनदर कसा ठरेल याचे स्पष्टीकरण आकृती ११ च्या आधारे करता येईल.

आकृती ११ मध्ये १,२,३,४,५ हे कामगार संघटनेचे वेतनदर–रोजगार समवृत्ती वक्र आहेत. ARP व MRP हे नियोक्त्याचे सरासरी व सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र आहेत व ठरलेल्या वेतनदरास किती रोजगार द्यायचा हा निर्णय नियोक्त्याच्या अखत्यारीत आहे. साहजिकच नियोक्ता ठरलेल्या वेतनदरास वेतनदर व सीमांत प्राप्ती उत्पादकता (MRP) जेथे समान होतील इतका रोजगार देणार. अर्थात या परिस्थितीत कामगार संघटना असा वेतनदर निवडतील की ज्या ठिकाणी MRP वक्र वेतनदर–रोजगार समवृत्ती वक्रास स्पर्शीय असेल. ही अवस्था $E_1$ या बिंदूत निर्माण होते. या वेळी वेतनदर $OW_1$ असेल व रोजगार $OM_1$ इतका असेल. अर्थात कामगार संघटना याहीपेक्षा प्रभावी असल्यास ती जास्तीत जास्त $OW_2$ इतका




वेतनदर ठरवू शकेल. त्या ठिकाणी वेतनदर व सरासरी प्राप्ती उत्पादकता समान होतील. (कारण $E_2$ या बिंदूत ARP वक्र ५ नंबरच्या उच्चतर असणाऱ्या वेतनदर–रोजगार समवृत्ती वक्रास स्पर्शीय आहे.) प्रत्यक्षात इतकी प्रभावी कामगार संघटना असेल असे वाटत नाही. ते काहीही असो, ARP वरील E या उच्चतम बिंदूमुळे व्यक्त होणाऱ्या वेतनदरापलीकडे जाणे कितीही प्रभावी असणाऱ्या कामगार संघटनेस शक्य नाही.

तसेच E या बिंदूकडे जाण्यात रोजगारात लक्षणीय घट पत्करावी लागेल. याउलट आपण असे मानू की नियोक्ता अत्यंत शक्तिशाली आहे. अशा वेळी नियोक्ता MRP वक्रावर अधिकाधिक खाली जाऊन वेतनदर ठरविण्याचा प्रयत्न करणार. कारण तसे करण्याने त्याचा फायदा वाढत जातो. परंतु अशा वेळी कामगार

संघटनेस मान्य होणारी किमान समाधानाची अवस्था जर ३ नंबरच्या वेतनदर–रोजगार समवृत्ती वक्राने दाखविली जात असेल तर नियोक्त्याने $OW_3$ इतका वेतनदर दिलाच पाहिजे, अन्यथा कामगार संपावर जातील. म्हणजेच नियोक्ता MRP वक्रावर $E_3$ या बिंदूपर्यंत खाली येऊ शकेल. (कामगार संबंधित उद्योग सोडून इतर उद्योगांत जाणार नाहीत याची तरी खात्री झाली पाहिजे.)

म्हणजेच या ठिकाणी व्यावहारिकदृष्टया $OW_1$ हा कमाल वेतनदर व $OW_3$ हा किमान दर अशी दोन टोके लक्षात येतात. परंतु तरीही या मर्यादेत नेमक्या कोणत्या ठिकाणी वेतनदर ठरेल हे अनिश्चितच राहते. वेतनदर $OW_1$कडे अधिक सरकण्यासाठी कामगार संघटनेचे सामर्थ्य नियोक्त्याच्या तुलनेने अधिक असले पाहिजे. याउलट वेतनदर $OW_3$कडे अधिक सरकण्यासाठी कामगार संघटनेच्या तुलनेने नियोक्त्याचे सामर्थ्य (सौदाशक्ती) अधिक हवे.

### ३.१.४. प्रा. कार्टर यांचे प्रतिमान

उभयपक्षी मक्तेदारीच्या श्रमबाजारात वेतनदर कसा निश्चित होत असावा यासंबंधी प्रा. ए. एम्. कार्टर[६] यांनी केलेले विवेचन अधिक प्रगत व सर्वंकष आहे. प्रा. कार्टर आपल्या विवेचनात वेतनदर व रोजगार यांच्यातील पर्यायितेबरोबरच उत्पादक किंवा नियोक्ते एका बाजूस फायदा व दुसऱ्या बाजूस वेतनदर–रोजगार यांच्या तुलनेने आपला पसंतीक्रम ठरवितात, असे मानले आहे. तसेच प्रचलित वेतनदर व रोजगारपातळी या दोन्ही घटकांचा प्रभाव पुढील काळात वेतनदर व रोजगारपातळी यांच्यातील पर्यायितेवर पडतो असेही त्यांनी गृहीत धरले आहे. म्हणूनच प्रा. कार्टर यांचे सिद्धांतन अधिक वास्तव तर होतेच, पण त्याचबरोबर विश्लेषणतंत्राच्या दृष्टीनेही ते अधिक प्रगत ठरते.


### ३.१.४–अ–कामगार संघटनेचा वेतनपसंती मार्ग ( Wage Preference Path )

प्रा. कार्टर, सुरुवातीस एक विशिष्ट वेतनदर प्रचलित आहे व त्या वेतनदरास एक विशिष्ट रोजगारपातळी रूढ झाली आहे असे गृहीत धरतात. ही गृहीते लक्षात घेता

( १ ) विशिष्ट प्रमाणात रोजगार घट मान्य होण्यासाठी कामगार संघटना पूर्वीपेक्षा फार अधिक प्रमाणात वेतन दराची वाढ अपेक्षित करेल किंवा,

( २ ) विशिष्ट प्रमाणात वेतनदर घट मान्य होण्यासाठी कामगार संघटना पूर्वीपेक्षा फार अधिक प्रमाणात रोजगार वाढ अपेक्षित धरतील.

वरील दोन्ही विधाने तर्कसंगत तशीच पूर्णत: वास्तव वाटतात. कारण कामगार संघटनेच्या दृष्टीने संघटनेचे अस्तित्व व संवर्धन ही सर्वांत महत्त्वाची उद्दिष्टे मानावी लागतील. थोड्याशा वेतनवाढीसाठी काही सभासदांची बेकारी मान्य करणे किंवा थोड्या रोजगारवाढीसाठी वेतनघट स्वीकारणे या दोन्ही प्रकारांमध्ये सभासदांचा रोष पत्करावा लागेल व संघटनेचे स्थैर्य, एकसंधता तसेच सातत्य धोक्यात येतील. हे विवेचन आकृती १२ च्या आधारे स्पष्ट करता येईल.





आकृती १२ मध्ये OW हा प्रचलित वेतनदर आहे. त्या वेळची रोजगारपातळी OM आहे. $MM_1$ इतक्या अल्प प्रमाणात रोजगारघट मान्य होण्यासाठी $WW_1$ इतक्या मोठ्या प्रमाणात वेतनदर वाढवावा लागेल. याउलट $WW_2$ एवढ्या अल्प प्रमाणात वेतनदर घट मान्य होण्यासाठी $MM_2$ इतक्या मोठ्या प्रमाणात रोजगार वाढवावा लागेल. या ठिकाणी UI हा वक्र कामगार संघटनेचा वेतनदर–रोजगार यांच्या संबंधातील समवृत्ती वक्र आहे. याला आपण "संघटना समवृत्ती वक्र" ( Union Indifference Curve )

असे नाव देऊ. वरील विश्लेषणाच्या आधारे कामगार संघटनेचा "वेतन-पसंती मार्ग" (Wage Preference Path) ही संकल्पना स्पष्ट करता येते. विशेषतः श्रमासाठी असणारी मागणी वाढल्यास वा कमी झाल्यास कामगार संघटनेची प्रतिक्रिया कशी असेल याचे वेतन-पसंती मार्ग ही संकल्पना स्पष्टीकरण देते.

जेव्हा श्रमासाठी मागणी वाढते तेव्हा रोजगारवाढीपेक्षा वेतनदर वाढीस कामगार संघटना अधिक प्राधान्य देतील. याउलट श्रमासाठी मागणी कमी झाल्यास रोजगारघटीपेक्षा वेतनदराच्या घटीला कामगार संघटना अधिक प्रभावी विरोध करतात. परंतु वेतनदर घटीला पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणातील बेकारी असेल तर वेतनदर घट शहाण-पणाने स्वीकारली जाते. म्हणूनच प्रचलित वेतनदर व रोजगार यांच्या संदर्भात विचार करता आकृती १३ मध्ये दाखविल्याप्रमाणे वेगवेगळे "संघटना समवृत्ती वक्र" तयार होतील.

आकृती १३ मध्ये $U_1I_1$, $U_2I_2$, ......UI......$U_4I_4$......असे संघटना समवृत्ती वक्र आहेत. त्या प्रत्येकाला $MRP_1$, $MRP_2$, ... .. MRP ...... $MRP_4$ ...... असे सीमांत प्राप्ती उत्पादकता वक्र किंवा श्रमासाठी मागणी वक्र $P_1$ $P_2$, ... ... P....... $P_4$ ...... या बिंदूत स्पर्शीय आहेत. हे बिंदू जोडल्यानंतर म्हणजेच W–$P_1$ $P_2$ $P_3$ P $P_4$ $P_5$ $P_6$ हा वक्र तयार होतो. या वक्रालाच संघटनेचा वेतन-पसंती मार्ग असे नाव देतात. P च्या वरील बाजूस श्रमासाठी वाढती मागणी व्यक्त होते तर P च्या डाव्या बाजूस श्रमासाठी घटती मागणी व्यक्त होते. P च्या उजव्या बाजूस वाढत्या वेतनदराला रोजगारवाढीच्या तुलनेने अधिक महत्त्व आहे तर P च्या डाव्या बाजूस फार मोठ्या प्रमाणात रोजगारघट होण्यापेक्षा काही वेतनदर घट स्वीकारण्याची कामगार संघटनांची तयारी स्पष्ट होते.





संघटनेचा वेतन-पसंती मार्ग हा एका अर्थाने श्रमाचा पुरवठावक्र असतो. अर्थात नेहमीचा पुरवठावक्र हा एका अर्थाने विविध वेतनदराला किती कामगारांचा पुरवठा होईल याचे स्पष्टीकरण करतो. अशा नेहमीच्या पुरवठावक्राच्या उजवीकडील कोणताही वेतनदर व रोजगार हा शक्य नसतो. परंतु वेतन-पसंती मार्ग हा मूळ पुरवठावक्राच्या डाव्या बाजूस असल्याने त्यावरील कोणत्याही बिंदूने दाखविलेला वेतनदर व रोजगार हा शक्य असणारा तर असतोच पण त्यासाठी कामगार संघटनेची पसंतीही अधिक असते.

### ३ . १ . ४–ब–नियोक्त्याचा पसंतीक्रम ( Employer's Preference Function )

विविध वेतनदराला किती फायदा मिळतो यावर नियोक्त्याचे समाधान अवलंबून असणार. नियोक्त्याला मिळणाऱ्या फायद्याचे हे प्रमाण दाखविण्यासाठी प्रा. कार्टर सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकतेच्या ( Average Net Revenue Productivity ) संकल्पनेचा उपयोग करतात. श्रमाची सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता (ANRP) काढण्यासाठी श्रमाच्या सरासरी उत्पादकतेतून (ARP)संयोजक सोडून इतर उत्पादनघटकांचा सरासरी खर्च वजा करावा लागेल. असे केल्यास व वेतनदर हा श्रमाच्या सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकतेइतका आहे असे मानल्यास नियोक्त्यास मिळणारा फायदा शून्य होईल. म्हणजेच सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता वक्र वेतनदर व रोजगारपातळी यांचे असे संयोग (combinations) दाखविते की ज्यांच्या संदर्भात नियोक्त्याचा फायदा शून्य असतो. पण श्रमाच्या सरासरी प्राप्ति-उत्पादकतेतून इतर घटकांच्या खर्चाबरोबरच नियोक्त्याचा एक ठराविक फायदा वजा केल्यास मिळणारा सरासरी निव्वळ प्राप्ती उत्पादकता वक्र (ANRP) तो ठराविक फायदा कोण-

कोणत्या वेतनदर रोजगारपातळीवर मिळू शकेल हे दाखवितो. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आपण आकृती १४ लक्षात घेऊ.

आकृती १४ मध्ये $ANRP_1$ हा सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता वक्र शून्य नफा दाखवितो असे मानल्यास व कामगार संघटना उच्चतम वेतनदर अपेक्षित करणार असे मानल्यास त्या ठिकाणी $E_1M_1 = OW_1$ इतका वेतनदर निवडला जाईल व $OM_1$ इतका रोजगार असेल. कारण $E_1$ हा $ANRP_1$ वक्रावरील उच्चतम बिंदू आहे. या खालील प्रत्येक सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता वक्र ($ANRP_2$, $ANRP_3$ $ANRP_4$ इ.) नियोक्त्याला मिळणारा ठराविक फायदा वाढत जातो हे दाखवितो. आकृती १४ मधील सर्व सरासरी निव्वळ प्राप्तिउत्पादकता वक्रांचे उच्चतम बिंदू ( $E_1$, $E_2$, $E_3$, $E_4$ ) हे जोडल्यास एक प्रकारचा सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्र (MRP) प्राप्त होतो. कारण या सर्व बिंदूत त्या त्या ANRP वक्राचा संबंधित सीमांत प्राप्तिवक्र वरून खाली छेदतो; ते सर्व छेदबिंदू त्या त्या ANRP वक्रांचे उच्चतम बिंदू आहेत. अर्थात हे सर्व बिंदू फायदा जसा वाढेल तसे (म्हणजेच वेतनदर जसा कमी होईल तसे) उजवीकडे खाली सरकतात. कारण कमी वेतनदरावर नियोक्ता अधिक रोजगार देण्यास तयार होतो. सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता वक्र हा एका अर्थाने "फायदा-समवृत्ती वक्र" मानता येईल. वेतन-पसंती मार्ग व वरील पद्धतीने तयार होणारा सीमांत प्राप्तिवक्र या संकल्पनांच्या आधारे प्रा. कार्टर उभयपक्षी मक्तेदारीच्या श्रमबाजारात वेतनदर कसा ठरविला जाईल याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करतात—





### ३.१.४–क–श्रमासाठी असणारी मागणी स्थिर असताना

या विवेचनासाठी प्रा. कार्टर पुढील गृहीतें लक्षात घेतात : (१) कामगार संघटनेस नियोक्त्यांचा पसंतीक्रम माहीत आहे. तसेच नियोक्त्यांना कामगारांचा वेतन-पसंती मार्ग माहीत आहे. (२) दोन्ही पक्षांना विचारविनिमय, चर्चा व देवाणघेवाण करण्याची व समझोत्याने अंतिम निर्णय घेण्याची इच्छा आहे.

आता श्रमासाठी असणारी मागणी बदलत नाही, पूर्वीइतकीच राहते असे मानायचे झाल्यास संबंधित वस्तूसाठी असणारी मागणी, श्रमाची उत्पादकता, वस्तूची किंमत व घटक-वापराचे प्रमाण स्थिर आहे असेही गृहीत धरावे लागेल. अशा परिस्थितीत सामुदायिक सौद्याचे स्वरूप कसे असेल याचे विवेचन आकृती १५च्या आधारे करता येईल.

समजा $U_0I_0$, $U_1I_1$, $U_2I_2$ हे संघटना समवृत्ती वक्र आहेत. $E_0E_0$, $E_1E_1$ व $E_2E_2$ हे नियोक्ता समवृत्ती वक्र आहेत. MRP हा संबंधित सीमांत प्राप्तिवक्र आहे. $P_0$ या बिंदूत प्रचलित वेतनदर $OW_0$ आहे व रोजगारपातळी $W_0P_0$ इतकी आहे. श्रमासाठी असणारी मागणी स्थिर असल्यामुळे MRP आहे तोच राहतो. म्हणूनच या परिस्थितीत शक्यतो आहे तीच वेतनदर-रोजगार रचना टिकविली जाईल. मागणी स्थिर असल्यामुळे म्हणजेच मिळणारा फायदा स्थिर असल्यामुळे वेतनदर कमी करण्याची आवश्यकता नियोक्त्यास वाटणार नाही. म्हणजेच $P_0$ च्या डावीकडे WPP मार्गावर ( वेतन-पसंती मार्गावर ) खाली सरकण्याची शक्यता नाहीशी होते.

संघटनेच्या दृष्टीनेही $P_0P_1$ या मार्गाने अधिक वेतनदर मागणे योग्य ठरत नाही. कारण तसे केल्यास, म्हणजेच $OW_1$ हा वेतनदर (वेतन-पसंती मार्गावरील $P_1$ या बिंदूने व्यक्त केलेला) मागितल्यास नियोक्ता $W_0P_0$ किंवा $W_1P_1$ इतका रोजगार न देता फक्त $W_1P_2$ इतकाच रोजगार देणार. कारण तो बिंदू ($P_2$) MRP वक्रावर आहे. म्हणजेच रोजगारात फार मोठी घट होणार. त्यामुळे $OW_1$ हा वेतनदर मागणेही शक्य नाही. कारण $P_2$ हा बिंदू $U_2I_2$ या खालच्या पातळीच्या संघटना समवृत्ती वक्रावर आहे.




दुसरी गोष्ट अशी की कामगार संघटना MRP वक्रावर $P_0$ या बिंदूच्या खाली किंवा जर जाऊ इच्छिणार नाही कारण दोन्ही बाजूस कमी पातळीवरील संघटना समवृत्ती वक्रच MRP वक्राला छेद देतात. परंतु MRP वक्र हा जर अधिक उभट असेल व उच्चतर संघटना समवृत्ती वक्रास $P_0$ च्या वर छेदत असेल तर मात्र नियोक्त्याची अडचण होईल व त्यातून संप किंवा टाळेबंदी हेच परिणाम संभवतील. अर्थात हा प्रकार बहुधा अल्पकाळातच शक्य आहे. हा MRP वक्र श्रमासाठी असणारी मागणी वेतनदराच्या संदर्भात फारच अलवचिक आहे असे दर्शवितो. दीर्घकाळात श्रमाची मागणी लवचिक होते कारण तांत्रिक सुधारणा होऊन श्रमाला पर्यायी घटक निर्माण होऊ शकतात. एकंदरीत पाहता जेव्हा श्रमासाठी स्थिर मागणी असते तेव्हा प्रचलित वेतनदर व रोजगारपातळी "जैसे थे" ठेवण्यातच कामगार संघटना व नियोक्ते या दोघांनाही रस असतो.

**३.१.४–ड— श्रमासाठी मागणी वाढत असताना**

श्रमासाठी मागणी वाढल्यानंतर, म्हणजेच श्रमाच्या सीमांत प्राप्ति–उत्पादकतेत जेव्हा वाढ होते तेव्हा वाढलेल्या प्राप्तीत कामगार व नियोक्ता यांचे हिस्से ठरविणे हा नेहमी आढळणारा प्रश्न आहे. विकसनशील देशात श्रमाची सीमांत वस्तू उत्पादकता वाढल्यामुळे किंवा वस्तूची किंमत वाढल्यामुळे, अशी वाढ होऊ शकते. अशा वेळी सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्र उजवीकडे वर सरकतो. या परिस्थितीत प्रा. कार्टर यांच्या विवेचनाप्रमाणे होणारी वेतनदर रोजगारनिश्चिती आकृती १६ मध्ये दाखविली आहे. (पान ५५ वर आ. १६ आहे.)


या आकृतीत P या बिंदूने प्रचलित वेतनदर PM = OW व OM इतका रोजगार ही अवस्था दर्शविली जाते. पूर्वीच्या वाटाघाटीतून ती निर्माण झाली आहे असे आपण समजू. UPI हा त्या वेळचा संघटना समवृत्ती वक्र आहे. ANRP हा काही विशिष्ट फायदा दाखविणारा नियोक्त्याचा पसंतीक्रम दाखवितो. MRP हा सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्र आहे.

समजा, श्रमासाठी मागणी वाढली; परिणामी उजवीकडे वरील बाजूस $MRP_1$ हा नवा सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्र तयार होतो. अशा वेळी कामगार संघटना वेतनदरात वाढ मागणार. सामुदायिक सौदास या वेळी प्रारंभ होतो. दोन्ही पक्ष किमान असा प्रयत्न करणार की ज्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या समाधानात घट होणार नाही.

म्हणजेच संघटनेच्या दृष्टीने नवा वेतनदर A व B या मर्यादेत असला पाहिजे. कारण ते दोन्ही बिंदू नव्या $MRP_1$ वर आहेत, तसेच ते UPI या पूर्वीच्याच संघटना समवृत्ती वक्रावरही आहेत. म्हणून A किंवा B मुळे मिळणारे समाधान P इतकेच असणार.

परंतु कामगार संघटना खरा प्रयत्न करणार तो अधिक वरच्या पातळीवरचे समाधान मिळविण्याचा. म्हणजेच A किंवा B वर जाण्यापेक्षा वेतनपसंती मार्गावर R या बिंदूवर जाणे संघटनेला अधिक श्रेयस्कर वाटेल. कारण तो बिंदू संघटनेला अधिक वरच्या संघटना समवृत्ती वक्रावर नेईल व त्याच वेळी संघटना नव्या $MRP_1$ या वक्रावरही जाईल. या ठिकाणी वेतनदर व रोजगार या दोन्हींत वाढ होते.

आकृती १६




नियोक्त्याच्या दृष्टीने विचार करता पूर्वीइतकाच फायदा देणारा पसंतीक्रम (फायदा – समवृत्ती वक्र) किंवा सरासरी निव्वळ प्राप्ति उत्पादकता वक्रही वर सरकणार. समजा तो $ANRP_1$ हा आहे. नवा $MRP_1$ वक्र त्याला Q या बिंदूत ( P च्या बरोबर वर ) छेदतो. म्हणजेच पूर्वीइतकाच फायदा मिळविण्याच्या दृष्टीने Q मुळे व्यक्त होणारा वेतनदर नियोक्ता मान्य करण्याची शक्यता आहे अर्थात रोजगार मात्र पूर्वीइतकाच (OM) राहतो. अर्थात Q च्या खाली $MRP_1$ वक्रावर जुना वेतनदर देण्याच्या बिंदूवर येणे नियोक्त्याला अधिक फायदा देणारे आहे. हा जुना वेतनदर $MRP_1$ या नव्या मागणी वक्रावर T या बिंदूने व्यक्त होतो. परंतु श्रमाची मागणी वाढलेली असल्याने जुनाच वेतनदर नवीन समतोलावस्थेत टिकून राहणे शक्य दिसत नाही. तेव्हा एकूण निष्कर्ष पुढीलप्रमाणे येतात :–

(१) Q ते R हे स्थानांतर कामगार संघ व नियोक्ता या दोघांनाही श्रेयस्कर आहे. कारण R बिंदूवर जाण्याने कामगार संघ उच्चतर संघटना समवृत्ती वक्रावर जाणार आहे. म्हणजे या ठिकाणी वेतनदर व रोजगार पातळी यापासून कामगार संघटनेला एकत्रित मिळणारे समाधान अधिक असणार तर Q च्या खाली R पर्यंत सरकण्याने नियोक्ता अधिकाधिक फायदा देणाऱ्या सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता वक्रावर जाणार.

(२) R ते T या मर्यादेत मात्र T कडे जाण्याचा प्रयत्न नियोक्ता करणार व त्याउलट R च्या जवळ राहण्याचा प्रयत्न कामगार संघटना करणार. म्हणजेच कामगार संघटना व नियोक्ता यांच्यात होणाऱ्या संघर्षाची म्हणजेच सामुदायिक सौद्याची व्याप्ती किंवा मर्यादा RT या अंतराने व्यक्त होते.

(३) SS हा श्रमपुरवठा वक्र मानल्यास हीच मर्यादा RL इतकीच (लहान) राहते. कारण SS हा पुरवठावक्र $MRP_1$ या मागणीवक्रास L या बिंदूत छेदतो. त्याच्या उजवीकडे वेतनदर रोजगार समतोल संभवत नाही.

(४) म्हणजेच एवढे निश्चित की श्रमासाठी मागणी वाढल्यानंतर RL या मर्यादेत कोठेही वेतनदर ठरला तरी तो पूर्वीपेक्षा अधिक असणार. व त्या वेळी उपलब्ध होणारा रोजगारही पूर्वीपेक्षा अधिक असणार. तसेच नियोक्त्याला मिळणारा फायदाही अधिकच असणार.


(५) परंतु R ते L या मर्यादेत वेतनदर नेमका कोठे असेल हे मात्र अनिश्चितच राहते.

**३.१.४–ई–श्रमासाठी मागणी घटत असताना**

श्रमासाठी असणारी मागणी घटत असताना कोणत्या पद्धतीने वेतनदर-निश्चितीची प्रक्रिया घडून येईल याचे स्पष्टीकरण आकृती १७ च्या आधारे करता येते (पृष्ठ ५६).

आकृती १७ मध्ये MRP हा श्रमासाठी असणारा मागणीचा प्रारंभीचा वक्र आहे. ANRP हा संबंधित फायदा समवृत्ती वक्र आहे. P या बिंदूत त्या वेळचा समतोल आहे. OM रोजगार व OW वेतनदर ही त्यावेळची स्थिती आहे. समजा $MRP_1$ हा नवा मागणी वक्र श्रमासाठी घटलेली मागणी दाखवितो. (हा प्रकार मंदीच्या काळात किंवा लोकांच्या संबंधित वस्तूच्या उपभोग-सवयी बदलल्यास किंवा संबंधित वस्तूस अधिक प्रगत व तुलनात्मक दृष्टया स्वस्त पर्याय निर्माण झाल्यास घडू शकेल.) श्रमाच्या मागणीत म्हणजेच सीमांत प्राप्तीत झालेल्या या घटीमुळे नियोक्त्याचा पूर्वीइतकाच फायदा दर्शविणारा सरासरी निव्वळ प्राप्ति-उत्पादकता वक्र खाली सरकतो. तो $ANRP_1$ हा आहे. WPP हा वेतन-पसंती मार्ग आहे. आता—

आकृती १७




( १ ) नियोक्त्याने Q या बिंदूपाशी वेतनदर ठरविल्यास (वेतनदर कमी केल्यास) त्याला पूर्वीइतकाच फायदा मिळणार. परंतु $MRP_1$ या वक्रावर Q च्या वर कोणत्याही ठिकाणी वेतनदर ठरल्यास नियोक्त्याचा फायदा कमी होणार. म्हणजेच नियोक्ता शक्यतो Q वर किंवा त्याच्या जास्तीत जास्त जवळ राहण्याचा प्रयत्न करणार.

( २ ) नव्या $MRP_1$ या वक्रावर कोणत्याही बिंदूवर कामगार संघटनेचे नुकसानच आहे. परंतु R या बिंदूवर हे नुकसान कमीत कमी आहे. कारण R हा बिंदू संघटनेच्या मूळच्या वेतनपसंती मार्गावर आहे.

( ३ ) म्हणजेच RQ ही वाटाघाटींची मर्यादा झाली. संघटना R वर किंवा जवळ (उजवीकडे) राहण्याचा प्रयत्न करणार. व नियोक्ता Q वर किंवा जवळ (डाव्या बाजूस) राहण्याचा प्रयत्न करणार.

( ४ ) जर SS हा श्रमपुरवठा वक्र असेल तर हीच मर्यादा RL अशी आणखी लहान होते.

( ५ ) याही ठिकाणी अंतिम वेतनदर अनिश्चितच राहतो.

प्रा. डनलॉप, प्रा. फेलनर व प्रा. कार्टर यांच्या प्रतिमानांचा तुलनात्मक विचार केल्यास एकच गोष्ट लक्षात येते की या तिन्ही प्रतिमानांत अंतिम वेतनदर काय असेल हे अनिश्चित राहते. येथे खालील मुद्दे लक्षात घेणे प्रस्तुत ठरते :–

( १ ) प्रा. डनलॉप तीन उद्दिष्टांच्या संदर्भात तीन पर्याय दाखवितात. पण प्रत्यक्षात संघटना या तीन उद्दिष्टांपैकी एकाचीच निवड करून वाटाघाटी करतात असे म्हणता येणार नाही. तसेच प्रा. डनलॉप यांची सभासदत्व फल ( membership function ) ही संकल्पना लक्षात घेता ही अनिश्चितता आणखी वाढते.

( २ ) प्रा. फेलनर व प्रा. कार्टर या दोघांच्या विश्लेषणात संघटना-समवृत्ती वक्रांची संकल्पना आहे व त्यामुळे संघटना संयुक्त उद्दिष्टांच्या पूर्तीचा विचार करतात ही वास्तव गोष्ट लक्षात घेतली जाते. त्यातल्या त्यात प्रा. कार्टर यांच्या संघटना समवृत्ती वक्राचा आकार अधिक वास्तववादी वाटतो. परंतु दोघांच्याही विश्लेषणात सभासदत्व फलाची संकल्पना अस्पष्ट व अपुऱ्या प्रमाणात विवेचिलेली वाटते. प्रा. फेलनर यांच्या तुलनेने प्रा. कार्टर यांच्या प्रतिमानात वाटाघाट-मर्यादा अधिक स्पष्ट व आकुंचित होते. त्यामुळे वेतननिर्णयाची प्रक्रिया अधिक जलद व सुलभ होईल अशी त्यांची कल्पना आहे.

( ३ ) प्रा. कार्टर व प्रा. फेलनर नियोक्त्यांच्या उद्दिष्टांचा अधिक स्पष्ट विचार करतात. प्रा. कार्टर त्यासाठी फायदा–समवृत्ती वक्र (ANRP) ही संकल्पना वापरतात. परंतु प्रा. डनलॉप मात्र कायद्याचे कमालीकरण हे उद्दिष्ट नियोक्त्याच्या संदर्भात गृहीत धरतात. परंतु व्यवसायसंस्थेच्या अनेक प्रेरणांपैकी एक म्हणून त्याचा विचार झालेला नाही.

( ४ ) प्रा. कार्टर यांनी श्रमासाठी स्थिर मागणी असताना वेतनदर व रोजगार 'जैसे थे' असतात असे सुचविले आहे. त्या अर्थाने वेतनदर निश्चित आहे. परंतु विश्लेषणाच्या प्रारंभी निश्चित असणारा प्रचलित वेतनदर पूर्वी कसा ठरला हे अनुत्तरितच राहते.

( ५ ) कामगार संघटनेची उद्दिष्टे फक्त आर्थिकच असतात असे गृहीत या सर्व प्रतिमानात आहे. वास्तवात, राजकीय पक्षांचा प्रभाव, कामगार नेत्यांचा पूर्वग्रह, त्यांच्या राजकीय (व इतरही) महत्त्वाकांक्षा यांचाही परिणाम प्रत्यक्ष सामुदायिक सौद्याच्या वाटाघाटींवर होऊ शकतो. या बाबींकडे वरील प्रतिमानात दुर्लक्ष झालेले आहे.

( ६ ) कामगार व नियोक्ते हे संघटित असतात असे मानल्यास संघटित समाज व त्याचे प्रातिनिधिक स्वरूप म्हणून शासकीय हस्तक्षेप लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. तसा प्रयत्न यापैकी कोणत्याच प्रतिमानात नाही.

( ७ ) भारतासारख्या अर्थव्यवस्थेत व समाजव्यवस्थेत वेतन-पसंती मार्गाचा प्रचलित वेतनदराच्या डाव्या बाजूचा भाग अवास्तव किंवा अप्रस्तुत वाटतो. कारण कोणती कामगार संघटना वेतनदरवाढीसाठी (किंवा आहे तो वेतनदर टिकविण्यासाठी) रोजगारघटीची किंमत देण्यास तयार होणार नाही ? विशेषतः रचनात्मक बेकारीचे प्रमाण मोठे असताना व लोकसंख्या झपाट्याने वाढणारी असताना !

( ८ ) या सर्व प्रतिमानात घटक किंमतीसंबंधी सीमांत उत्पादकतेचा सिद्धांत गृहीत धरलेला आहे हे उघड आहे. म्हणजेच या सर्व विवेचनात श्रमासाठी असणारी मागणी हाच घटक वेतन ठरविणारा आहे असे मानलेले दिसते. प्रा. कार्टर श्रमपुरवठ्याचा घटक लक्षात घेतात. पण त्याचा वापर वेतन ज्या मर्यादेत ठरू शकेल ती मर्यादा अधिक छोटी करण्यापुरताच होतो.

### ४.१. नवी दिशा


वरील ८ नंबरच्या मुद्द्याच्या संदर्भात प्रत्यक्षात काय घडत असावे याचा अंदाज पुढीलप्रमाणे घेता येईल. त्या दृष्टीने वेतन-पसंती मार्गाचा अधिक चिकित्सक विचार करावा लागेल. प्रा. कार्टर यांच्या वेतन-पसंती मार्गाच्या मुळाशी संघटना समवृत्ती वक्राचा विशिष्ट आकार तसेच श्रमासाठी बदलती मागणी या दोन गोष्टी गृहीत आहेत. संघटना समवृत्ती वक्राची संकल्पना पुढील गोष्टी दर्शविते :–

( अ ) विशिष्ट प्रमाणात रोजगारघट मान्य होण्यासाठी कामगार संघटना पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात वेतनदराची वाढ अपेक्षित धरते. (ब) विशिष्ट प्रमाणात वेतनदर घट मान्य होण्यासाठी संघटना पूर्वीपेक्षा अधिक रोजगारवाढ अपेक्षित धरेल.[४]

परंतु प्रा. कार्टर यांचे सर्व विश्लेषण कामगार संघटना व एकच नियोक्ता (एकक्रयाधिकार) या रचनेवर आधारित आहे. विश्लेषणाचा कालखंड अल्पकाळाचा आहे. वास्तविक अल्पकाळाचा विचार करता कोणतीही कामगार संघटना मोठ्या वेतनवाढीसाठी रोजगारघट मान्य करेल असे वाटत नाही. संघटनेचे सर्वच सभासद रोजगारावर असणे हा संघटनेच्या अस्तित्वाचा (तिच्या नेतृत्वाच्या सातत्याचा) व दीर्घ काळात तिच्या सभासदसंख्येत होणाऱ्या वाढीचा मूळ आधार मानावा लागेल. वेतनवाढीची मागणी करताना संघटनेचा कोणताही सभासद बेकार होणार नाही. याची संघटनेला प्रथम काळजी घ्यावी लागेल. तसेच श्रमासाठी वाढती मागणी (उच्चतर MRP वक्र) निर्माण होत असताना वेतनदरातील मर्यादित वाढ व रोजगारीतील अधिक वाढ हे दुहेरी उद्दिष्ट संघटनेच्या संख्यात्मक व गुणात्मक सामर्थ्यात वाढ होण्यासाठी अधिक योग्य ठरू शकेल. याउलट श्रमासाठी मागणी घटत असताना वेतनदर

कमी झाला तरी चालेल पण बेकारी नको, चालू सर्व सभासदांचा रोजगार सुरक्षित राहावा अशी संघटनेची भूमिका अधिक योग्य ठरू शकेल. या घटकांचा विचार करता प्रा. कार्टर यांच्या वेतन-पसंती मार्गाचा वक्र आकाराने वेगळा होणार हे स्पष्ट होईल. आकृती १८ च्या द्वारे हा विचार अधिक स्पष्ट करता येईल.


आकृती १८ मध्ये PM हा प्रचलित वेतनदर आहे. त्या वेतनदरावर प्रचलित असलेला रोजगार OM इतका आहे. MPS हा वेतन-पसंती मार्ग वरील विवेचनाच्या आधारे काढलेला आहे. PM या वेतनदरापेक्षा कमी वेतनदरांचा विचार करता म्हणजेच ३, २, १ या सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्रांनी दाखविण्यात येणारी घटती श्रममागणी लक्षात घेता, PM हा पूर्ण अलवचिक असा श्रमपुरवठा वक्र तयार होतो व तो P च्या डावीकडील वेतन-पसंती मार्ग म्हणून लक्षात घ्यावा लागेल. म्हणजेच वेतनदर PM पेक्षा कमी होत गेल्यास रोजगार कमी करण्यास संघटनेचा पूर्ण विरोध राहणार. अर्थात घटत्या सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्राशी सुसंगत अशी वेतनदर घट त्यांना मान्य करावी लागेल. व ते करणे अधिक योग्य ठरेल.




P च्या वरच्या उजव्या बाजूस मात्र श्रमासाठी मागणी वाढत असताना वेतनदर वाढ व रोजगार वाढ या दोन्ही गोष्टी शक्य आहेत हे स्पष्ट होते. कारण या ठिकाणी P च्या उजवीकडील वेतन-पसंती मार्ग (PS) हा लवचिक होतो. हा वेतन-पसंती मार्गच श्रमपुरवठ्याचा वक्र आहे हे मान्य केल्यास वेतन-निश्चिती कशी होते हे पाहणे उपयुक्त ठरेल.

प्रथम आपण श्रमासाठी मागणी वाढल्यास काय घडते हे लक्षात घेऊ.

आकृती १९ मध्ये प्रारंभीची अवस्था OM रोजगार व PM हा वेतनदर अशी आहे. त्या वेळचा श्रम-मागणी वक्र MRP असा आहे. MPS हा वेतन पसंती मार्ग आहे व सुरुवातीचा नियोक्ता पसंती क्रम किंवा फायदा समवृत्ती वक्र ANRP आहे. समजा श्रमासाठी मागणी वाढली, म्हणजेच नवा मागणी वक्र $MRP_1$ असा झाला. आता या सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्राच्या संदर्भात नियोक्त्याला पूर्वीइतकाच फायदा मिळवून देणारा फायदा–समवृत्ती वक्र $ANRP_1$ असा होतो. कामगार संघटनेच्या दृष्टीने UPI या संघटना समवृत्ती वक्राचा विचार करता, या बदललेल्या परिस्थितीत कमाल वेतनदर A या बिंदूमुळे व्यक्त होईल. पण त्या ठिकाणी रोजगार घटणार म्हणून तो पर्याय नाकारला जाईल. दुसरी शक्यता B या बिंदूमुळे व्यक्त होते.



या ठिकाणी रोजगार मोठ्या प्रमाणात वाढतो पण वेतनदर कमी होतो. श्रमासाठी मागणी वाढली असता वेतनदर कमी होणे सुसंगत वाटत नाही. म्हणून हाही पर्याय संघटनेला स्वीकाराई वाटणे शक्य नाही. पूर्वीइतकाच फायदा व पूर्वीइतकाच रोजगार गृहीत धरल्यास नियोक्ता कामगारांना QM इतका वेतनदर देण्यास तयार होईल. परंतु विकासाच्या संदर्भात हेही सुसंगत ठरत नाही. तसेच Q ते R या दिशेने स्थानांतर झाल्यास कामगार संघटना उच्चतर संघटना-समवृत्ती वक्रावर जाईल. तसेच नियोक्ता खालच्या ANRP वक्रावर जाईल. म्हणजेच त्याला पूर्वीपेक्षा अधिक फायदा मिळू शकेल. (उपरोक्त परिच्छेद क्र. ३.१.४–ब पाहा). म्हणजेच R बिंदूच्या वर समतोल होणे कामगार संघटना व नियोक्ता या दोघांनाही तोटयाचे आहे. अर्थातच R च्या खाली $MRP_1$ वक्रावर जाणे नियोक्त्यास शक्य नाही. कारण त्या ठिकाणी श्रमपुरवठा वक्र (जो येथे वेतन-पसंती मार्ग हाच मानला आहे) $MRP_1$ ला छेदतो. म्हणजेच R या एकाच ठिकाणी वेतनदर ठरेल व तेथे कामगार संघटना उच्चतर समाधान मिळवितात. कारण—


(१) पूर्वीपेक्षा अधिक वेतनदर मिळतो.

(२) पूर्वीपेक्षा अधिक रोजगार मिळतो.

तसेच नियोक्त्यासही पूर्वीपेक्षा अधिक फायदा मिळतो.

आता श्रममागणी कमी झाल्यास काय होईल याचा विचार आकृती २० च्या आधारे करता येईल.

आपण वरील विवेचनात गृहीत धरलेला वेतन-पसंती मार्ग वक्राचा आकार लक्षात घेता श्रम-मागणी घटलेली असताना ($MRP_1$ हा वक्र) कामगार संघटनेला QM हाच वेतनदर स्वीकारावा लागेल. कारण तसे केल्यासच OM हा रोजगार टिकविता येतो. येथे आणिक एका गोष्टीचा उल्लेख करावयास हवा. श्रम-मागणी कमी होण्यामुळे दिला जाणारा वेतनदर निर्वाह वेतनाच्याही खाली जाणार असल्यास कामगारांना त्यांच्या काही गरजा मोफत पुरविणे किंवा नियोक्त्यांना काही प्रमाणात उत्पादन अनुदान देऊन हा वेतनदर निर्वाह वेतनापेक्षा कमी होणार नाही याची खात्री करणे, या स्वरूपात शासनाला हस्तक्षेप करावाच लागेल. म्हणजेच याही ठिकाणी ठरणारा वेतनदर निश्चितच आहे.




म्हणजेच वेतन-पसंती मार्ग वक्राचा हा नवा आकार लक्षात घेता उभयपक्षी मक्तेदारी श्रमबाजारात वेतनदर अनिश्चित राहात नाही. धोरणाच्या दृष्टीने या विवेचनाचे काही महत्त्वाचे अन्वयार्थ पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) उभयपक्षी मक्तेदारी श्रमबाजारात श्रममागणी एका विशिष्ट मर्यादेच्या (निर्वाह वेतनपातळीच्या) खाली घटल्यास उत्पादन अनुदान किंवा वेतन अनुदान या स्वरूपात सरकारी हस्तक्षेप आवश्यक आहे.

(२) श्रमासाठी मागणी वाढत असल्यास (अ) श्रमिकांच्या वाढत्या सीमांत प्राप्ति-उत्पादकतेची मोजणी व्यावहारिक पद्धतीने करण्याची शासकीय व्यवस्था केल्यास आणि (ब) उत्पादकांना किमान नफा किती मिळावा याचे सर्वसामान्य प्रमाण ठरविल्यास, वाढीव वेतनदर, वाढीव रोजगार व वाढीव फायदा या तिन्ही निकषांवर नवीन समतोल साधणे शक्य आहे. (अ) व (ब) साठी आवश्यक असणारी शास्त्रीय तटस्थ

मापनव्यवस्था सरकारी खर्चाने निर्माण करावी. तसे केल्यास वाढत्या उत्पादकतेचे वाटप वाढीव वेतनदर, वाढीव रोजगार व वाढीव फायदा यात कसे करायचे हे ठरविण्याचे तंत्र विकसित होऊ शकेल.

( ३ ) अर्थात वेतन-पसंती मार्ग वक्राचाही संख्याशास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे व त्यांचा अंदाज करणे आवश्यक आहे. त्याचीही जबाबदारी शासनाने घेणे आवश्यक आहे. अर्थात या विश्लेषणासाठी वेतन-पसंती मार्ग हाच खरा श्रमपुरवठा वक्र आहे असे मानणे अत्यावश्यक आहे. तसे मानण्यात तर्कसंगतीच्या दृष्टीने अडचण येईल असे वाटत नाही.

## संदर्भ :


१. Rothschild K. W. : Approaches To The Theory Of Bargaining, in J. T. Dunlop (ed.) The Theory of Wage Determination, Macmillan Co. Ltd., 1964, p. 284.

२. Dunlop J. T. : Wage Determination Under Trade Unions, A. M. Kelly, N. Y., 1966 (Reprints of Economic Classics).

३. या आकृतीमधील $D_1$ $D_1$ हा वक्र खरे तर सर्व व्यवसायसंस्थांच्या सीमांत मागणी वक्रांची समस्तरीय बेरीज आहे व त्यातून एकूण उद्योगाची श्रमासाठी असणारी मागणी व्यक्त होते. म्हणजेच अपूर्ण स्पर्धेच्या बाजारात एकाधिकार श्रमपुरवठा करणारी संस्था वेगवेगळ्या वेतनदरांस किती श्रमपुरवठा करू शकेल याचे स्पष्टीकरण या वक्रामुळे मिळते. नेहमीच्या एकाधिकारात अशा वक्रास आपण AR वक्र असे नाव देतो. परंतु कामगार संघटना कमालीकरणाचे उद्दिष्ट ठेवून काम करीत असल्याने या सीमांत प्राप्ति-उत्पादकता वक्राच्या समस्तरीय बेरजेतून व्यक्त होणाऱ्या मागणी वक्रास सीमांत असणारा वक्र $D_1$ $M_2$ काढावा लागतो. पहा.–Cartter A. M., Marshall F. R., Labour Economics, Richard D., Irwin Inc., Homewood Illinois, 1967, p. 278.

४. Chopra P. N. : Advanced Economic Theory, 2nd Ed., Kalyani Publishers, Delhi p. 450.

५. Fellner, William, Competition Among the Few, Knofs, N. Y., 1949.

६. Cartter A. M., Theory of Wages and Employment, Irwin Inc., Homewood, Illinois, 1959.

७. तत्रैव, पृ. ८९.


■ ■

# अर्थसिद्धांत चुकीचे आणि / वा चकवे–४

## संगततेचे तत्त्व ( Correspondence Principle)*

नी. वि. सोवनी

### प्रास्ताविक

प्रचलित अर्थशास्त्रीय सिद्धांतनाची चौकट पूर्णपणे स्थितिकीची (statics) आहे, गतिकीची (dynamics) नाही असे विधान नेहमी करण्यात येते व त्याला सर्वत्र मान्यता मिळालेली आहे. अर्थशास्त्रातील सिद्धांत हे अर्थव्यवस्थेतील सतत बदलत्या आर्थिक प्रक्रियेबद्दल असल्यामुळे ते निव्वळ स्थितिकीच्या चौकटीत व्युत्पादिता येत नाहीत म्हणून अर्थशास्त्रीय अन्वेषणाची रीतीही स्थितिकीची नसून तुलनात्मक स्थितिकीची (comparative statics) आहे असेही विधान वरील विधानाबरोबर केले जाते व तेही सर्वमान्य आहे. पण या दोन्ही विधानांचा खोलवरचा अर्थ फारसा चर्चिला जात नाही व त्या अर्थानुसार प्रचलित अर्थशास्त्रीय सिद्धान्तांवर पडणाऱ्या फार मोठ्या मर्यादांचीही बहुतेकांना कल्पना नसते. तुलनात्मक स्थितिकीची अन्वेषणारीती तिच्याबद्दल फारशी चर्चा न होताच अर्थशास्त्रात फार पूर्वीपासून स्वीकारली गेली आहे. सॅम्युएलसन यांनी १९४०–४७ या काळात 'ती शास्त्रीय आहे की नाही' असा प्रश्न उपस्थित करीपर्यंत त्या संबंधात अर्थशास्त्रात कोणतीच चर्चा झालेली नव्हती. सॅम्युएलसन यांनी हा प्रश्न उपस्थित केला व त्याची चर्चा करून त्याचे उत्तर होकारार्थी दिले. अर्थशास्त्रीय सिद्धान्त व्युत्पादितांना तुलनात्मक स्थितिकीची रीत वापरणे शास्त्रीय आहे हे सॅम्युएलसन यांनी संगततेचे तत्त्व मांडून दाखविण्याचा प्रयत्न केला. हा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला असेच आज अनेक वर्षे अर्थशास्त्रात मानण्यात आलेले होते. परंतु अलीकडे या तत्त्वाचे अधिक खोलवर संशोधन होऊन हे तत्त्व वाटत होते त्यापेक्षा फारच संकुचित व्याप्तीचे आहे असे निदर्शनास आले आहे. ॲरो व हान यांनी त्यांच्या General Competitive Analysis (1971) या पुस्तकात हे परीक्षण केले आहे. त्याच्या आधाराने येथे संगतता तत्त्वाचे विश्लेषण व त्याची संकुचित व्याप्ती याची चर्चा करावयाची आहे. या विषयाची ओळख करून देण्यासाठी स्थितिकी, गतिकी, तुलनात्मक स्थितिकी वगैरे संज्ञांचे काटेकोर अर्थ, त्यांचे परस्परांशी संबंध व त्यांचा अर्थशास्त्रातील आविष्कार यासंबंधीचे विवेचन करणे आवश्यक आहे. माझ्या पूर्वीच्या लिखाणांच्या आधारे ते येथे प्रथम करतो.[1]

### कालप्रवाह व आर्थिक घडामोडी

कालौघ जसा निरवधी असतो तसेच अर्थव्यवहारही सतत चालू असतात. या सतत बदलणाऱ्या अर्थव्यवहारांचा अन्वय-अर्थ लावण्याचा अर्थशास्त्राचा प्रयत्न असतो. परंतु सतत बदलणाऱ्या अर्थव्यवहारांची अन्वेषणा करणे सोपे नसते. कारण त्यातील काहीच स्थिर आहे असे समजता येत नाही आणि अस्थिर चलांच्या अन्वेषणासाठी लागणारी चिकित्सेची साधने जरूर तेवढी शक्तिमान किंवा कार्यक्षम अशी अजूनपर्यंत सिद्ध करता आलेली नाहीत. सर्व

* हा लेख लिहिण्यात प्रा. वि. म. दांडेकर यांची फार मदत झाली.

अर्थशास्त्रीय प्रश्नांच्या अन्वेषणातील मध्यवर्ती समस्या काल या घटकाशी निगडित आहेत असे जे मार्शल यांनी आपल्या सुप्रसिद्ध पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे त्याचे रहस्य हेच आहे. सतत वाहणाऱ्या काल-प्रवाहाचा चिकित्सेत मागोवा घेण्यासाठी त्यासंबंधी काही साधी गृहीतकृत्ये स्वीकारून पुढे जाण्याची पद्धत आहे. त्यापैकी मुख्य म्हणजे काळ स्थिर आहे, थांबलेला आहे असे समजून––म्हणजेच वाहत्या काळाचा विचार क्षणभर बाजूस ठेवून–त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या स्थितिशील परिस्थितीच्या प्रतिमानांचे विश्लेषण करणे ही होय. अशा परिस्थितीच्या अभ्यासानंतर काळाचे गृहीत स्थिरत्व थोडे कमी करून अधिक वास्तव अशा चिकित्सेकडे प्रगती करावयाची असते हे समजावून घेण्यासाठी स्थितिशील (static) व गतिशील (dynamic) अर्थव्यवस्था यांच्या अर्थशास्त्रात केल्या गेलेल्या व्याख्या प्रथम समजावून घेतल्या पाहिजेत.

**स्थितिशील व गतिशील अर्थव्यवस्था**

ज्या अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानात त्यातील सर्वच गोष्टी (चल) कालौघात न बदलणाऱ्या म्हणजे स्थिर असतात अशा अर्थव्यवस्थेला 'स्थितिशील अर्थव्यवस्था' किंवा अर्थव्यवस्थेची स्थितिशील अवस्था असे म्हणतात. अशा अर्थव्यवस्थेत अर्थव्यवहाराचे तेच तेच आवर्तन वर्षानुवर्षे होत असते. सर्व वस्तूंचे व सेवांचे उत्पादन तेवढेच होते, उत्पादन-साधने तेवढीच राहतात, किमती व वेतनाचे दर तेच असतात, लोकसंख्याही स्थिर असते. या तिच्या आवर्तनी व्यवहारात अर्थव्यवस्थेबाहेरील काही घडामोडींमुळेच फरक पडण्याची शक्यता असते. स्थितिशील अर्थव्यवस्थेचे प्रतिमान 'स्थितिशील प्रतिमान' (static model) म्हणून ओळखले जाते. अशा प्रतिमानातील चल (variables) हे त्या प्रतिमानाच्या व्याख्येनुसारच कालावलंबी नसतात––म्हणजे कालौघाने त्यांच्यावर काही परिणाम होत नाही.

स्थितिशील प्रतिमानांच्या साहाय्याने स्थितिशील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करता येतो. त्याचप्रमाणे त्याच अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या वेळच्या स्थितिशील अवस्थांची एकमेकांशी तुलना करून त्यातील चलांच्या मूल्यांतील फरकांवरून गतिशील अर्थव्यवस्थेच्या वर्तणुकीसंबंधी काही अंदाज करता येतात. कालौघात सतत बदलत असलेल्या अर्थव्यवहारांचा ओघ दोन किंवा अधिक ठिकाणी खंडित करून त्या त्या वेळची अर्थव्यवस्थेची (स्थितिशील) स्थिर-चित्रे एकमेकांशी तुलना करण्यासाठी व त्यात झालेल्या बदलांचा सूक्ष्म अभ्यास करण्यासाठी वापरता येतात. चित्रपटाच्या पट्टीवर प्रत्येक चौकटीतील चित्र स्थिर असते परंतु त्यातील प्रत्येक चित्र दुसऱ्या चित्राहून थोडे तरी निराळे असते, आणि ही चित्रे वेगाने एकामागोमाग एक पाहिली तर त्या प्रत्येक चौकटीतील स्थिर चित्रांच्या साह्याने बदलते व्यवहार कसे झाले अगर होतात याचे धावते चित्र आपल्याला पाहता येते. स्थितिशील अर्थव्यवस्था म्हणजे चित्रपट-पट्टीतील एक चौकट. या चौकटीतील अर्थव्यवस्थेच्या चित्राच्या साहाय्याने करता येणाऱ्या अभ्यासाला आर्थिक 'स्थितिकी' (statics) असे नाव आहे. निरनिराळ्या चौकटीतील चित्रांच्या तुलनेने त्यातील फरकांच्या अभ्यासास 'तुलनात्मक स्थितिकी' (comparative statics) असे म्हणतात. ही स्थिरचित्रे वेगाने सरकावून पाहिल्यास व्यवहाराचे जे धावते वा जिवंत चित्र साकार केले जाते त्याच्या अभ्यासास 'गतिकी' (dynamics) असे नाव आहे

**सातत्याचे तत्त्व**

गतिमान काळाच्या स्थिरत्वाच्या अगर कृत्रिम विभागणीच्या ह्या गृहीतकृत्याचे समर्थन सातत्याच्या तत्त्वाच्या (principle of continuity) आधाराने मार्शल यांनी केले आहे व तसेच ते आजही केले जाते या तत्त्वाचा सारांश असा की, स्थितिशील परिस्थिती ही चल परिस्थितीचाच एक भाग असते. चल परिस्थिती ही सातत्याने बदलणाऱ्या अशा स्थितिशील परिस्थितीची क्रमवर्ती पंक्तीच असते. स्थितिशील परिस्थिती ही गतिशील परिस्थितीत सूक्ष्मपणे मिसळत किंवा एकजीव होत जाते. त्यामुळे त्यापैकी एकीचा स्वतंत्रपणे अगर अनेकांचा तुलनात्मक अभ्यास समर्थनीय आहे.

**आर्थिक परिस्थितींची तुलना**

पण शास्त्रीय चर्चेत अमुक एक अन्वेषणाची दिशा संयुक्तिक आहे एवढ्याच स्थूल आधारावर अन्वेषणा-रीती उभारता येत नाही. ती उभारण्यासाठी त्या दिशेने जाताना कोणता मार्ग पत्करावयाचा, त्याची वैशिष्ट्ये कोणती,

त्यात अडथळे वा चकवे कोणते आहेत वगैरे गोष्टींचा तपशीलवार विचार करणे आवश्यक असते. त्या दृष्टीने पाहता सातत्याचे तत्त्व अर्थशास्त्रीय अन्वेषणात वापरणे योग्य असले तरी त्यासंबंधी अधिक तपशीलवार विचार केला पाहिजे. प्रथम विचारात घ्यावयाची गोष्ट म्हणजे ज्या आर्थिक परिस्थितींची तुलना करुन आर्थिक प्रक्रियेसंबंधी सिद्धान्त बांधावयाचे त्या परिस्थिती यदृच्छ कोणत्याही का काही विशिष्ट प्रकारच्या किंवा विशिष्ट लक्षणांनी युक्त असल्या पाहिजेत ? अर्थशास्त्रीय अन्वेषणाचे प्रयोजन काय ? या प्रश्नांच्या अनुषंगानेच याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. हे प्रयोजन, आर्थिक व्यवहार किंवा प्रक्रिया यांचे काही नियम आहेत का ? त्यांच्यातील कार्यकारणभाव कसा व कोणता? त्यातील प्रवृत्ती कोणत्या ? या व अशा प्रश्नमालिकेनेच साकार करता येते. हे लक्षात घेता यदृच्छ कोणत्याही दोन परिस्थितींची तुलना करणे योग्य ठरणार नाही. कारण पूर्वी दिलेली उपमाच पुढे चालवावयाची तर चित्रपटाच्या पट्टीवरील कोणत्याही चौकटीतील चित्राची दुसऱ्या कोणत्याही चौकटीतील चित्राशी तुलना केल्यास त्यातील बदल नोंदता येतील पण पहिल्या चौकटीत ग्रथित केलेल्या घटनेची दुसऱ्या चौकटीत ग्रथित केलेली घटना अनिवार्य पर्यवसान आहे की नाही—म्हणजे त्या दोन चौकटीतील चित्रांतील फरक त्या दोन चित्रांमधील काळातील प्रक्रियेमुळे अनिवार्यपणे निर्माण झालेले आहेत की नाही—हे सांगता येणार नाही, आणि ते सांगता आले नाही तर अशा तुलनांतून आर्थिक प्रवृत्तींचे नियम, कार्यकारणभाव वगैरेंबद्दल निश्चितपणे काहीच सांगता येणार नाही. थोडक्यात, शास्त्रीय अन्वेषणाच्या दृष्टीने अशा तुलना फारशा फलदायी ठरणार नाहीत. त्यासाठी आर्थिक प्रक्रियेतील काही विशिष्ट लक्षणांनी युक्त अशाच परिस्थितींची तुलना करणे आवश्यक आहे. मग साहजिकच अशा परिस्थितींची वैशिष्ट्ये कोणती याचा शोध सुरू होतो. हा शोध स्थितिकी व गतिकी या न्यूटनप्रणीत गणिताच्या (mechanics) चौकटीत व साहाय्याने व्हावा व तसा झाला हेही नैसर्गिकच होते. कारण विसाव्या शतकाच्या निम्म्यापर्यंत सर्व नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा आदर्श न्यूटन यांची भौतिकी (physics) व यांत्रिकी (mechanics) हाच होता. अर्थशास्त्र म्हणजे उपयुक्ततेची (utility) यांत्रिकीच (स्थितिगतिशास्त्र) होय ही जेव्हन्स यांची उक्ती प्रसिद्ध आहे. या गणिताच्या चौकटीत व साहाय्याने वरील समस्येसंबंधी विचार होणे स्वाभाविक होते व तसा विचार करता उत्तरही सहज सुचणारे होते. ते म्हणजे त्या शास्त्रातील समतोलाची संकल्पना. जर आपण ज्या दोन परिस्थितींची तुलना करावयाची त्या परिस्थिती समतोलाच्या असतील व पहिल्या समतोलाच्या परिस्थितीतून दुसरी समतोलाची परिस्थिती अपरिहार्यपणे निघत असेल, किंवा पहिल्या समतोलातील प्रवृत्तींची दुसरा समतोल ही अपरिहार्य परिणती असेल, तर त्या दोन परिस्थितींतील फरक त्या मधल्या काळातील अर्थप्रवृत्तींचे स्वरुप, लक्षणे, कार्यकारणभाव यासंबंधी निश्चित अशी शास्त्रीय निकषास उतरणारी विधाने करण्यास उपयोगी पडतील. ह्या दोन परिस्थितींमधले फरक हे सातत्याने चालणाऱ्या प्रवृत्तींतून निर्माण झालेले असतील व तेच शास्त्रीय सिद्धान्तांच्या पातळीवर पोचू शकतील. या विचारांच्या अनुषंगाने तुलनात्मक स्थितिकी (comparative statics) म्हणजे समतोल परिस्थितींची तुलना व त्यातून निघणारे निष्कर्ष असे अर्थशास्त्रज्ञांनी ठरविले. यामुळे या सर्व अर्थशास्त्रीय अन्वेषणात समतोल ही फार केंद्रवर्ती अशी संकल्पना झालेली आहे.

तुलना करावयाच्या परिस्थिती कशा असाव्या लागतील याची जी ढोबळ चर्चा वर केली ती आता अधिक तपशिलात परिक्षिली पाहिजे. वरच्या चर्चेत जे मुख्य मुद्दे अगर परिस्थितींची लक्षणे सांगितली ती तपशीलवार अशी मांडता येतील :—

(१) ज्या दोन परिस्थितींची तुलना करावयाची त्या दोन्ही समतोलांत असल्या पाहिजेत. म्हणजे प्रथमतः पहिल्या परिस्थितीतील चलांचा समतोल होण्याची शक्यता आहे का हे अजमावले पाहिजे. ते अजमावताना असा समतोल एकच एक संभाव्य आहे का अनेक समतोल संभाव्य आहेत हेही तपासले पाहिजे. कारण अनेक समतोल संभाव्य असतील तर त्यांपैकी तुलनेसाठी कोणता निवडावयाचा असा प्रश्न निर्माण होईल व त्याचे समाधानकारक उत्तर देणे अवघड होईल. हे दोन्ही प्रश्न समतोलाच्या अस्तित्वाचा (existence) प्रश्न व त्याच्या अनन्यत्वाचा (uniqueness) प्रश्न म्हणून ओळखले जातात.

(२) वरील प्रश्नांचे उत्तर होकारार्थी मिळाले तरी अर्थव्यवस्थेच्या त्या परिस्थितीतील समतोलात

विक्षोभ झाल्यास त्यांच्या चलात व प्राचलात बदल झाल्यास अगर अर्थव्यवस्था त्या समतोलापासून ढळल्यास त्यामुळे सुरू झालेल्या आर्थिक प्रक्रियांचे पर्यवसान पुन्हा समतोलातच होईल का व तो समतोल अनन्य असेल का असा दुसरा प्रश्न विचारावाच लागतो. कारण या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल तरच अर्थव्यवस्थेत सुरू झालेल्या आर्थिक प्रक्रियेची दुसरा समतोल ही अपरिहार्य परिणती आहे असे म्हणता येईल व मग त्या दोन समतोलांची तुलना करून त्यात पडलेल्या चलांच्या व प्राचलांच्या मूल्यांतील फरकांच्या आधारे दरम्यानच्या काळातील आर्थिक प्रक्रियेच्या परिणामांचे आकृतिबंध, कार्यकारणभाव, प्रवृत्ती यासंबंधी अर्थपूर्ण निष्कर्ष काढता येतील. या प्रश्नाला समतोलाच्या स्थिरतेचा प्रश्न असे म्हणतात. समतोलांच्या स्थिरतेसंबंधी पुढे विस्तृत चर्चा केलेलीच आहे. पण येथे त्या संदर्भातील एक बारकावा लक्षात आणून देणे योग्य ठरेल. (१) व (२) या प्रश्नांत अभिप्रेत असलेली अर्थव्यवस्थेच्या समतोलाची स्थिरता ही 'गतिकी स्थिरता' आहे. 'स्थितिकी स्थिरता' नाही. त्याचे कारणही उघड आहे. स्थितिकी स्थिरता असलेला समतोल ढळला तर पुन्हा त्याच समतोलाकडे परत येतो. म्हणजे त्यात झालेल्या विक्षोभामुळे पहिला समतोल ढळला तरी पुन्हा तोच समतोल दुसऱ्यांदा स्थापित होतो. त्या दुसऱ्या समतोलातील चलांची व प्राचलांची मूल्ये पहिल्या समतोलातल्या इतकीच असतात. त्या दोन समतोलांत एकच एक संगतता (one to one correspondence) असते असे त्याचे गणिती लक्षण सांगता येईल. त्या दोन समतोलांत फरक मुळीच नसतात किंवा शून्य असतात. अर्थातच अशा समतोलांच्या तुलनेने त्यातील फरकांचा अभ्यास करता येत नाही. व साहजिकच त्यांच्या दरम्यानच्या काळातील आर्थिक प्रक्रियांसंबंधी काहीच सांगता येत नाही. अन्वेषणाच्या दृष्टीने अशी तुलना कुचकामाची असते. म्हणून येथे अभिप्रेत असलेल्या समतोलाची स्थिरता गतिकी स्थिरता आहे. अशा प्रकारच्या समतोलात अर्थव्यवस्था समतोलापासून ढळली तर ती पुन्हा समतोलात येते; परंतु या दुसऱ्या समतोलातील चलांची व प्राचलांची मूल्ये पहिल्यातील चलांच्या व प्राचलांच्या मूल्यांपेक्षा निराळी असतात. त्यांच्यात फरक पडलेले असतात आणि त्यांच्या आधारे त्यांच्या दरम्यानच्या काळातील आर्थिक प्रक्रियेची अर्थपूर्ण अन्वेषणा करता येते.

(३) वरच्या दोन प्रश्नांचे उत्तर होकारार्थी असून सुद्धा भागत नाही. वर उल्लेखिलेली गतिक समतोलाकडे असणारी अर्थव्यवस्थेतील प्रक्रियेची प्रवृत्ती जोरदार व वेगवान असणे ही अशा अन्वेषणासाठी आवश्यक असते. ती फार हळूहळू व दीर्घ कालखंडात होणारी आहे असे आढळले तर त्या अर्थव्यवस्थेतील बरेच चल व प्राचल दीर्घकालपर्यंत जवळजवळ स्थिर असतात असे मानावे लागेल, आणि अर्थव्यवस्थांसंबंधीची प्रत्यक्षातील माहिती लक्षात घेता अशा प्रकारची अर्थव्यवस्था अवास्तवच म्हणावी लागेल. अशा अर्थव्यवस्थेतील चलात व प्रचलात पडणारे फरक अल्प-काळात फारच नगण्य असतील. या अडचणीचा निरास करण्यासाठी समतोलांची प्रवृत्ती बलवान व वेगवान आहे की नाही याचाही शोध घ्यावा लागतो.

या तिन्ही प्रश्नांचा समावेश संगतता तत्त्वात आहे व ते तत्त्व तुलनात्मक स्थितिकी या अन्वेषणारीतीला पायाभूत आहे. या प्रश्नांची अन्वेषणा पूर्णपणे गणिती आहे हे सांगावयास नकोच.

सॅम्युएलसन यांनी त्याचे संशोधन करून विशदीकरण करीपर्यंत या गोष्टींची अर्थशास्त्रज्ञांना स्पष्ट अगर पुरेशी कल्पना नव्हती. पण जाणता वा अजाणता ॲडॅम स्मिथ यांच्यापासूनचे सर्व अर्थशास्त्रज्ञ तुलनात्मक स्थितिकीच्या अन्वेषणारीतीनुसार सिद्धांत बांधीत होते.[२] अर्थातच मग हे कितपत शास्त्रीय होते असा प्रश्न उद्भवतोच. तोच सॅम्युएलसन यांच्यापुढे उभा राहिल्याने त्यांनी या अन्वेषणारीतीचे तोपर्यंत झाले होते त्यापेक्षा खोलवर संशोधन करून संगततेचे तत्त्व उद्घोषिले व त्या अनुसार तोपर्यंतचे अर्थशास्त्रीय सिद्धान्तन हे शास्त्रीय पद्धतीनेच व्युत्पादिले गेले आहे असा दिलासा सर्वांना दिला.

### थोडा ऐतिहासिक दृष्टिक्षेप

अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासाकडे थोडा दृष्टिक्षेप केल्यास वर मांडलेल्या प्रश्नांसंबंधीच्या विचारांचा उद्गम व विकास कसा झाला हे स्थूलमानाने लक्षात येते. आर्थिक घडामोडींचा सार्वत्रिक समतोलाचा सिद्धांत वॉलरा यांनी १८७४–७८ मध्ये प्रथम मांडला. समतोल संभाव्य आहे का (प्रश्न १) याचे उत्तर त्यांनी माहीत असलेली

समीकरणे व काढावयाची उत्तरे यांची संख्या सारखी असते असे दाखवून होकारार्थी दिले. अशा समतोलास स्थिरता असते का (प्रश्न २) याचे उत्तर होकारार्थी देताना त्यांनी वापरलेले लिलावबाल्याचे ज्ञापक ( tatonement—grouping or tentative proceedings ) फार ओबडधोबड असल्यामुळे त्यांना त्यात समाधानकारक प्रगती करता आली नाही. या दोन्ही प्रश्नांची चर्चा होत राहिली पण त्या दोन्ही प्रश्नांना समाधानकारक उत्तरे ही दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातच मिळाली. तोपर्यंत ती होकारार्थी आहेत असे समजून वा न समजून अर्थशास्त्रातील सिद्धांत बांधण्याची पूर्वीचीच रीत अर्थशास्त्रज्ञ पाळीत राहिले.

सॅम्युएलसन यांनी मांडलेल्या त्या संगतता तत्त्वाची अधिक चर्चा करण्यापूर्वी व सॅम्युएलसन यांची कामगिरी नीट समजण्यासाठी वरील प्रश्नांतील समतोलाची संकल्पना, महत्त्व, अर्थ यासंबंधी प्रथम विवेचन करतो.

**समतोलाची संकल्पना व प्रकार**

प्रथम समतोलाच्या संकल्पनेसंबंधी लिहिले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत प्रवर्तित होत असलेल्या सर्व प्रभावांचा (शक्तींचा) समतोल अशी समतोलाची कल्पना सर्वांनाच असते.[३] तथापि त्यातही प्रकार असतात. दोन मुख्य प्रकार म्हणजे यांत्रिकी समतोल व जीवशास्त्रीय समतोल. जीवशास्त्रीय (biological) समतोलात उभारणी व संहारणी करणाऱ्या प्रभावांच्या एकमेकांवरील परिणामातून त्या जीवाचे त्याच्या आयुष्यातील संवर्धन व नाश ही ठरविली जातात. यांत्रिकी समतोलात एखाद्या वस्तूची अवकाशातील भौतिक प्रभावांमुळे होणारी हालचाल तिच्यावर प्रवर्तित होणाऱ्या प्रभावांचा (शक्तींचा) समतोल होऊन थांबते ती स्थिती ध्यानात घेतली जाते. आर्थिक समतोल हा एका परिस्थितीतील मानवी वर्तनावस्था आर्थिक प्रभावांचा समतोल असतो व त्याला मानवी समाजाचा व वर्तनाचा संदर्भ असल्यामुळे तो खरे तर जीवशास्त्रीय समतोलाशी जास्त समरूप व जवळचे नाते सांगणारा असतो. जीवशास्त्रीय समतोल हा स्वभावतःच गतिकी समतोल असतो तर यांत्रिकी समतोल स्वभावतः स्थितिकी समतोल असतो. अवकाशात भौतिकी प्रभावामुळे हालचाल करणारी वस्तू समतोलात आली म्हणजे ती तशीच अनंत काळपर्यंत समतोलाच्या स्थितीत राहील अशी अपेक्षा असते. उदाहरणार्थ, सूर्यमाला उत्पन्न झाल्यापासून तिच्यातील घटकांत अशा प्रकारचा स्थितिकी समतोल आहे. याउलट जीवशास्त्रीय समतोल त्या जीवाच्या आयुष्यातील एकाच क्षणाचा समजता येत नाही. त्यापूर्वीच्या आयुष्यातील सर्व घटनांचा (प्रभावांचा) त्या क्षणापुरता तो परिपाक असतो व त्या समतोलाला त्या जीवाच्या, सर्व आयुष्याच्या संदर्भातच अर्थ प्राप्त होतो.

दुसरा फरक असा की यांत्रिकी समतोलात त्या परिस्थितीवर बाहेरून प्रवर्तित होणाऱ्या प्रभावांचाच विचार असतो. तिच्यातील चलात व प्राचलात अन्तर्गतरीत्या निर्माण होणाऱ्या प्रभावांचा विचार नसतो. किंबहुना तसे अन्तर्गत प्रभाव अस्तित्वात नाहीत वा नगण्य आहेत असे मानले जाते. जीवशास्त्रीय समतोलात त्या जीवाच्या अन्तर्गत प्रक्रियांतून निर्माण होणाऱ्या प्रभावांचा त्यावर होणाऱ्या बहिर्गत प्रभावांच्या बरोबरीने विचार असतो व त्या दोहोमिळून होणारा समतोल अभिप्रेत असतो.

तिसरा फरक असा की जीवशास्त्रीय समतोलाचे 'गणित' यांत्रिकी समतोलाच्या 'गणितापेक्षा' फार गुंतागुंतीचे व घनिष्ट असते. यांत्रिकी समतोलातील प्रत्येक प्रभाव (शक्ती) हा दुसऱ्या प्रभावांच्या (शक्तींच्या) अस्तित्वाशी निगडित नसतो. स्वतंत्र असतो. फक्त ते प्रभाव एकमेकांवर परिणाम करतात. त्यामुळे त्या परिस्थितीतील एकूण प्रभावांची बेरीज-वजाबाकीच त्यांच्या समतोलात अभिप्रेत असते. जीवशास्त्रातील समतोलात प्रवर्तित होणाऱ्या प्रभावांची अशी सहज बेरीज–वजाबाकी करून समतोल सिद्ध होत नाही. कारण त्या प्रभावांच्या परस्परांवरील परिणामांमुळे त्यांचा उगम ज्यातून होतो त्या मूळ चलात व प्राचलातच परस्परावलंबी प्रकारचे रूपभेद (फेरबदल) होतात.[४]

असे असूनही अर्थशास्त्रीय अन्वेषणात यांत्रिकी समतोलच स्वीकृत केला गेला याचे कारण त्याचे गणित तयार होते व जीवशास्त्रीय समतोलापेक्षा हाताळण्यास तो सोपा होता. यांत्रिकी समतोलाच्या स्वीकारामुळे अर्थशास्त्रीय अन्वेषणात आलेल्या अवास्तवतेकडे अर्थशास्त्राने आतापर्यंत दुर्लक्ष केले आहे, हे पुढील चर्चेत स्पष्ट होईलच. आता अर्थशास्त्रास प्रस्तुत असलेल्या यांत्रिकी समतोलाची चर्चा पुढे चालवू या.

### यांत्रिकी समतोल

यांत्रिकीतील समतोलाची व्याख्या : 'एखाद्या सटावर (set) किंवा वस्तुसमूहावर प्रवर्तित होत असलेल्या निरनिराळ्या शक्तींचे प्रभाव जेथे एकमेकांस छेदतात (किंवा संपूर्णपणे संतुलित करतात) व त्यामुळे तो सट अगर वस्तुसमुदाय दिल्या स्थितीत अमर्याद काळ राहतो' अशी केली जाते. पण गणिताप्रमाणे कोणत्याही सटाचा असा समतोल एकच एक असेल असे सांगता येत नाही व असे अनेक समतोल असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून आर्थिक अन्वेषणात करावयाच्या तुलनेसाठी दिलेल्या सटाला एकच एक वा अनन्य समतोल होण्याची शक्यता परीक्षावी लागते.

### यांत्रिकी समतोलाचे स्थिर व अस्थिर प्रकार

समतोल दोन प्रकारचा असतो. स्थिर (स्थायी) आणि अस्थिर (अस्थायी). समजा समतोलात असलेल्या सटावर आणखी एखादा प्रभाव प्रवर्तित झाला तर तो समतोलापासून च्युत होतो, ढळतो. त्यामुळे निर्माण झालेल्या असमतोलाच्या स्थितीतील त्याच्या चलात जर अशा तऱ्हेने बदल होतील की तो पुन्हा समतोलाच्या स्थितीला येईल तर अशा समतोलाला 'स्थिर (स्थायी) समतोल' (stable equilibrium) असे म्हणतात. बिघडलेल्या समतोलाची प्रवृत्ती पुन्हा समतोलाकडे जावयाची नसली तर त्याला 'अस्थिर (अस्थायी) समतोल' (unstable equilibrium) असे नाव आहे.

### स्थायी व अस्थायी समतोल

समतोलाची संकल्पना स्थितिकी व गतिकी या दोन्हींनाही लागू होते. स्थितिशील परिस्थितीतील समतोल स्थिर (स्थायी) किंवा अस्थिर (अस्थायी) असू शकेल. गतिशील परिस्थितीतील सटामधील सर्व चल एकाच गतीने बदलणारे असले तर समतोल संभवतो. ते समगतीने बदलणारे नसले तर समतोल होणे दुरापास्त असते. असमगतीने बदलणारे चल असलेले गतिशील प्रतिमान बाजूस ठेवले तर आतापर्यंत सांगितलेले समतोलाचे सर्व प्रकार समगतीने बदलणाऱ्या चलांच्या बनलेल्या गतिशील प्रतिमानांच्या संदर्भात वर्गीकरण करून सांगता येतात. या वर्गीकरणाप्रमाणे गतिशील प्रतिमानांचे वर्ग दोन : (१) समगतीने व (२) असमगतीने बदलणारे. समगतीने बदलणारी प्रतिमाने दोन प्रकारची : (१.१) स्थितिशील (स्थितिकी) समतोल असलेली व (१.२) गतिशील (गतिकी) समतोल असलेली आणि या प्रत्येकाचे दोन प्रकार : (१.११) स्थिर (स्थायी) समतोल असलेली व (१.१२) अस्थिर (अस्थायी) समतोल असलेली. आणि (१.२१) स्थिर (स्थायी) समतोल असलेली व (१.२२) अस्थिर (अस्थायी) समतोल असलेली.

या वर्गीकरणाच्या साहाय्याने स्थितिशील व गतिशील अवस्थांच्या अर्थव्यवस्थांच्या प्रतिमानांसंबंधी पुन्हा विचार केला तर असे लक्षात येईल की काही गतिशील प्रतिमानातील समीकरणे सोडविल्यास त्यांचे उत्तर स्थितिशील येऊ शकते. याचा अर्थ एवढाच की त्या गतिशील प्रतिमानातील चलांच्या मूल्यांचा असा एक विशिष्ट सट असतो की ती मूल्ये त्यांना दिल्यास ती मूल्ये वर्षानुवर्षे तीच तीच राहू शकतात. तसे असले तर ते प्रतिमान स्थितिशील प्रतिमानाचाच एक पर्याय होईल हे सहज लक्षात येईल. परंतु समगती गतिशील प्रतिमानाला (त्यातील समीकरणांना) एकाहून अधिक उत्तरे संभवतात. त्यांपैकी काही स्थिरस्थायी समतोलात्मक (स्थितिशील) असतील तर काही अस्थिर (अस्थायी) समतोलात्मक (स्थितिशील) असतील. त्याचप्रमाणे ती गतिशील (गतिकी) स्थिर समतोलात्मक व अस्थिर समतोलात्मकही असू शकतील. गतिशील प्रतिमानाचे (त्यातील समीकरणांचे) उत्तर स्थिर (स्थायी) समतोलात्मक असेल तर ते प्रतिमान स्थिर (स्थायी) आहे असे म्हणतात. ते अस्थिर (अस्थायी) समतोलात्मक असेल तर त्याला अस्थिर (अस्थायी) म्हणतात.

### समतोलाच्या स्थिरतेचे प्रकार

समतोलांची स्थिरता ही अनेक प्रकारची असू शकते व त्यातील बहुतेक प्रकार या चर्चेत येतात. म्हणून त्यांचे थोडे वर्णन करणे आवश्यक आहे. हे प्रकार तीन आहेत. एक प्रकार अर्थव्यवस्थेतील किमतींच्या सर्वसाधारण पातळीच्या

अनुरोधाने सांगण्यात येतो. अर्थव्यवस्थेतील किमतीची पातळी स्थिर आहे असे जेव्हा म्हटले जाते त्या वेळी किमती आहेत तशाच व तेवढयाच राहतात असे म्हणण्याचा उद्देश नसून किमतीचे चढउतार त्या काळात अत्यल्प मर्यादात असतात असे म्हणावयाचे असते. या अर्थी तो किमतींचा एक जवळजवळ वा निकट (approximate) समतोल असतो. गणितात अशा प्रकारच्या समतोलाच्या स्थिरतेला 'लायापुनाव्ह स्थिरता' अशी संज्ञा आहे. दुसऱ्या प्रकारची स्थिरता अर्थशास्त्रीय चर्चेत अधिक वारंवार भेटणारी आहे. तिला गणितात 'अंततोपगामी स्थिरता' (asymptotic) अशी संज्ञा आहे. तिचे मुख्य लक्षण असे की अशी स्थिरता असणाऱ्या समतोलात लहानसा विक्षोभ (disturbance) झाल्यास किंवा तो थोडा बिघडल्यास, तो पुन्हा पूर्वीच्या समतोलाकडे यावयाची प्रवृत्ती दर्शवितो. पूर्वी भेटलेली स्थितिकी स्थिरता ती हीच. अर्थशास्त्रीय चर्चेत हाच प्रकार बहुधा प्रस्तुत असतो. याशिवाय तिसऱ्या प्रकारची स्थिरता जागतिक किंवा सर्वंकष (global) या नावाने ओळखली जाते. अशी स्थिरता असणाऱ्या समतोलात मोठा विक्षोभ झाला किंवा तो फार मोठ्या प्रमाणात बिघडला तरी तो पुन्हा एका विशिष्ट समतोल बिंदूकडे अभिगामी होतो (tends to). या प्रकारची स्थिरता असणारा समतोल अनन्य असतोच. पण त्यात एक श्लेष असा आहे की आर्थिक प्रक्रिया ही सर्वंकष प्रकारची स्थिर आहे याचा अर्थ त्यातून निघणारा समतोल सर्वंकष प्रकारची स्थिरता असलेला असेल असे नाही.

**अर्थशास्त्रातील स्थिरता**

स्थिरतेच्या या चौकटीत आर्थिक संकल्पना बसविण्यासाठी अर्थशास्त्राला आणखी संकेत स्वीकारावे लागले आहेत. स्थितिशील अर्थव्यवस्था ही स्थिर समतोलात असते, असे या संदर्भात अर्थशास्त्र गृहीत धरते. या गृहीतकृत्याची अर्थशास्त्रज्ञांना इतकी सवय झालेली आहे की बहुतेकांना हे गृहीतकृत्य आहे, प्रत्येक स्थितिशील अर्थव्यवस्थेचा आंगिक गुण नव्हे, याचा विसर पडतो. तसे होऊ नये म्हणून या गृहीतकृत्याच्या स्वीकारामुळे अर्थव्यवस्थेवर आपण कोणते गुण अन्वेषणाच्या सोईसाठी लादतो किंवा आरोपित करतो हे नीट लक्षात घेतले पाहिजे. या गृहीतकृत्याची दोन लक्षणे आहेत : (१) स्थितिशील अर्थव्यवस्था ही समतोलात असते. (२) हा समतोल काही कारणाने ढळला तर त्या अर्थव्यवस्थेतील घडामोडींची प्रवृत्ती पुन्हा समतोलाकडे जाण्याचीच असते.

यापैकी (१) या लक्षणात समतोल असतो हे गृहीत धरलेले आहे. हे गृहीतकृत्य स्वीकारले नाही तर कोणत्याही स्थितिशील अर्थव्यवस्थेतील व्यवहारांच्या अन्वयार्थाबद्दल काही विधाने करता येतील. परंतु ती अन्वेषणाच्या दृष्टीने फार मर्यादित स्वरूपाची असतील. उदाहरणार्थ, अशा अर्थव्यवस्थेतील मागणी-पुरवठा यांची समाजलेखेत अभिप्रेत असलेली नित्य समीकरणे (social accounting identities) मांडता येतील. परंतु ती काय व कोणत्या प्रक्रियेतून सिद्ध झालेली आहेत यासंबंधी काहीच विधान करता येणार नाही. समतोल आहे असे गृहीत धरले म्हणजे मागणीचा व पुरवठ्याचा प्रत्येकी एक वक्र असतो व त्यात मागणी-पुरवठ्याच्या निरनिराळ्या अवस्था ग्रथित केलेल्या असतात. मागणी-पुरवठा सारखी झाली म्हणजे समतोल होतो व त्यांचे वक्र जेथे एकमेकांस छेदतात तो समतोल-बिंदू असतो असे विवेचन करता येते. परंतु समतोल आहे हे गृहीत धरल्याखेरीज हे करता येत नाही.

**समतोलाची प्रवृत्ती**

समतोलाची शक्यता व अस्तित्व गृहीत धरली तरी तो स्थिर (स्थायी) आहे – म्हणजे पूर्वी सांगितल्याप्रमाणे अर्थव्यवस्थेची प्रवृत्ती समतोलाकडे जाण्याची आहे – हे सिद्ध होत नाही. ते गृहीत धरण्यासाठी अर्थशास्त्राला फार अवास्तव गोष्टी अंगीकाराव्या लागल्या आहेत. अर्थव्यवस्था कोणत्या प्रकारची आहे हे सांगितले म्हणजे तिच्यात ही प्रवृत्ती अनुस्यूतच आहे असे धरून चालता येत नाही असे सॅम्युएलसन यांनी म्हटले आहे ते रास्तच आहे. संपूर्ण आर्थिक चढाओढीच्या परिस्थितीत अर्थव्यवहारांची प्रवृत्ती अशीच असेल की नसेल हे सांगता येत नाही. 'कॉबवेब' (मलसुळी आवर्तन) सिद्धान्तावरून हे सहज लक्षात येईल. म्हणून अर्थव्यवस्था असमतोल परिस्थितीत असताना कोणत्या प्रकारच्या प्रक्रिया अर्थव्यवहारात झाल्यास समतोल होतो त्या विनिर्दिष्ट केल्याखेरीज व त्या तशा अर्थव्यवस्थेत असतात असे दाखविल्याखेरीज अशी अर्थव्यवस्थेची प्रवृत्ती आहे हे गृहीत धरता येणार नाही.

## तर्कसंगत वर्तनाचे गृहीतकृत्य व त्याचा अर्थ

अशा प्रक्रिया विनिर्दिष्ट करताना अर्थशास्त्राने अर्थव्यवस्थेतील सर्व व्यक्ती तर्कसंगत रीतीनेच वागतात असे गृहीतकृत्य स्वीकारले आहे आणि तर्कसंगत याचा अर्थ जे वागणे अर्थव्यवस्थेस समतोलाकडे नेईल ते वागणे होय अशी त्याला पुस्ती जोडली आहे. याचे थोडे विस्तृत विवेचन करणे आवश्यक आहे.[५]

स्थितिशील अर्थव्यवस्थेतील समतोल हा क्षणिक असतो किंवा काळसापेक्ष नसतो हे पूर्वीच सांगितले आहे. तर्कसंगतीची कल्पना ही काळ स्थिर असल्याखेरीज अर्थपूर्ण होऊ शकत नाही. परिस्थिती सारखी बदलत असेल तर एका क्षणी जे तर्कसुसंगत ते दुसऱ्या क्षणी तसे ठरेलच असे नाही. बळाचा वापर करावयाचा नाही व खोटेपणाने व्यवहार करावयाचे नाहीत असे ठरवून अर्थव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्ती पूर्ण तर्कसुसंगतपणे वागली तर जे अस्तित्वात येईल, घडेल त्याला अर्थशास्त्राने 'समतोल' असे मानले आहे. कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीला सर्वात फायद्याची वागणूक म्हणजे तर्कसंगत वागणूक. परंतु अशी वागणूक त्या व्यक्तीच्या दृष्टीने सर्वात फायदेशीर वागणूक आहे हे त्या व्यक्तीच्या मनाला पटायला सुद्धा इतर व्यक्तींच्या वागणुकीविषयी व परिस्थितीविषयी तिला पूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. असे ज्ञान तिला भूत व वर्तमान परिस्थितीबद्दलच होऊ शकेल. परंतु भविष्यातील परिस्थिती तिला अज्ञेयच राहणार. भविष्यकालीन परिस्थिती भूतकाळातील घटनांच्या संगतीतून सांगता येतात अशी त्यातून वाट काढता येणार नाही. कारण तसे केल्यास सद्यःस्थितीतील व्यक्तींना कार्य (निवड) स्वातंत्र्य नसते असे गृहीत धरावे लागून आणखीनच घोटाळा होईल. म्हणून तर्कसंगत वागणूक ही व्यक्तींना फक्त वर्तमानातच शक्य असते हे मान्य करणे भाग आहे. परंतु अशा वागणुकीचे परिणाम निव्वळ त्या व्यक्तीच्या वागणुकीवर सर्वस्वी अवलंबून नसून इतर व्यक्तींच्या वागणुकीचाही त्यात भाग असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीला वर्तमानातील आपली तर्कसंगत वागणूक ठरविण्यास त्या वेळीच चालू असलेल्या इतर व्यक्तींच्या वागणुकीचे ज्ञान आवश्यक असते. अशा वागणुकीसंबंधीचे सर्व व्यक्तींचे अंदाज किंवा बेत एकत्रित करून त्यांचा एकमेकांशी मेळ घालून ते प्रत्येक व्यक्तीला ज्ञात केल्याखेरीज त्या व्यक्तींची तर्कसंगत वागणूक काय असावी हे तिचे तिलाही ठरविता येणार नाही. समतोलाच्या संकल्पनेमुळे किंवा तिच्या साहाय्याने हे वर्तन कसे असावे हे अर्थशास्त्र सांगते. म्हणजेच अर्थशास्त्रातील समतोलाची संकल्पना अशा प्रकारचे सर्व व्यक्तींचे वर्तन होईल या गृहीतकृत्यावर आधारलेली आहे किंवा समतोल होण्यासाठी जे वर्तन प्रत्येक व्यक्तीने करावयास हवे तेच तर्कसुसंगत वर्तन अशी तर्कसुसंगत वर्तनाची व्याख्या अर्थशास्त्राने केली आहे.

## समतोलाच्या बलवान प्रवृत्तीचे गृहीतकृत्य

अर्थशास्त्रातील समतोलाची संकल्पना इतक्याच अवास्तव गृहीतकृत्यावर आधारलेली आहे असे नाही. तिला आणखी एक अवास्तव गृहीतकृत्य स्वीकारावे लागले आहे. अर्थव्यवस्थेत समतोल आहे व त्यातील प्रक्रियांची प्रवृत्ती समतोलाकडेच आहे एवढेच गृहीत धरून अर्थशास्त्रीय चिकित्सेचा रथ चालू होत नाही. ही समतोलाकडे असणारी प्रवृत्ती जोरदार आहे असेही गृहीत धरावे लागते. कारण ती प्रवृत्ती दुर्बल व फार हळूहळू होणारी असली तर तुलनात्मक अन्वेषणाच्या दृष्टीने ती कुचकामी ठरते. फार दीर्घकालखंडात होणाऱ्या समतोलांच्या तुलनेतून फारसे काही हाती लागत नाही.

या अडचणीवर मात करण्यासाठीच आंशिक व सार्वत्रिक समतोलाच्या संकल्पनांचा वापर अर्थशास्त्राने केला आहे. आंशिक समतोलात झपाट्याने बदलणाऱ्या चलांवर लक्ष केंद्रित करून इतर सर्व चल स्थिर ठेवून अगर मानून अन्वेषण करता येते. मार्शल यांनी आंशिक समतोलावर फार भर दिला याचे मुख्य कारण वरील अडचणींचा निरास करणे हेच होते. परंतु आंशिक समतोलामुळे आर्थिक चिकित्सा पुष्कळच दुबळी व लंगडी झाली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या व्यवसायसंस्थेच्या (firm) समतोलाचा आपण विचार करतो त्या वेळी तिच्या प्रतिस्पर्धी व्यवसायसंस्थांचे सर्व व्यवहार स्थिर आहेत व इतर सर्व गोष्टीही स्थिर आहेत असे गृहीत धरून आपण चिकित्सा करतो. म्हणजे खरोखरच त्या व्यवसायसंस्थेपुढील सर्व महत्त्वाचे प्रश्न गाळून इतर दुय्यम महत्त्वाच्या प्रश्नावर आपण आपले लक्ष केंद्रित करतो. त्याचप्रमाणे कामगारांच्या वेतनाच्या प्रश्नाच्या विवेचनात आंशिक समतोलाचे तत्त्व लावताच येत नाही. त्याहूनही

अधिक महत्त्वाचे म्हणजे नफा कसा उत्पन्न होतो हे आंशिक अगर सार्वत्रिक समतोलाच्या संकल्पनेच्या साह्याने सांगताच येत नाही. कारण समतोल व नफा यांचे साहचर्य होऊ शकत नाही. असमतोलातच नफ्याचा जन्म होतो. समतोलात नफा अस्तित्वात येऊ शकत नाही तर त्यासंबंधीचे अन्वेषण कोठून येणार ?

### सॅम्युएलसन यांना पडलेला प्रश्न व त्याचे उत्तर

येथपर्यंत वर्णिलेली अर्थशास्त्रीय अन्वेषणाची परिस्थिती १९४०–४७ या काळात सॅम्युएलसन जेव्हा आपला 'अर्थशास्त्रीय अन्वेषणाच्या आधारशिला' (Foundations of Economic Analysis, 1947) हा प्रबंध लिहीत होते तेव्हा त्यांच्या पुढे होती व ती त्यांना फार अशास्त्रीय व असमाधानकारक वाटली. तोपर्यंतच्या अर्थशास्त्रीय सिद्धान्तनाची सर्व बैठक व चौकट पूर्णपणे स्थितिकीची असताना सर्व अर्थशास्त्रज्ञ, जाणता वा अजाणता, ती गतिकीची आहे असे समजून बिनदिक्कत आपले सिद्धान्त व्युत्पादित होते. तर्कशुद्धतेच्या दृष्टीने (गणिताने) ही सिद्धान्तनाची रीती पूर्णपणे चुकीची होती व त्यातून निघणारे सिद्धान्त हे शास्त्रशुद्ध नव्हते. यातून मार्ग काय ? एकतर त्या सिद्धान्तात काही अर्थ नाही व सर्व अर्थशास्त्र नव्याने उभारावयास हवे असा निष्कर्ष काढून पुढे जाणे अगर ही तोपर्यंत वापरली गेलेली रीत काही विशिष्ट परिस्थितीत शास्त्रशुद्ध ठरू शकेल असे दाखविणे. सॅम्युएलसन यांनी दुसरा मार्ग पत्करला. गणिताप्रमाणे काही गतिक प्रतिमानांचा समतोल स्थितिक प्रकाराचा असू शकतो त्या प्रमेयाचा फायदा घेऊन सॅम्युएलसन यांनी असा युक्तिवाद केला की स्थितिक परिस्थितीत गतिक प्रकारचे अर्थशास्त्रज्ञांनी केलेले सिद्धान्तन हे ती स्थितिक परिस्थिती एका गतिक प्रतिमानाच्या स्थितिक समतोलाची आहे असे मानता आले तर शास्त्रशुद्ध ठरू शकते. तसे असण्यास त्या स्थितिक परिस्थितीतील समतोल अनन्य आणि गतिकस्थिरता असलेला असला पाहिजे. अशी परिस्थिती अर्थव्यवस्थेतून पुष्कळ वेळा सर्वसामान्यपणे असते म्हणून तोपर्यंतच्या अर्थशास्त्रातील सिद्धान्त व सिद्धान्तन करण्याची रीत ही शास्त्रशुद्ध आहेत असे सॅम्युएलसन यांनी संगतता तत्त्वाचा उपन्यास करून मांडले. अर्थशास्त्रातील सिद्धान्तन करण्याच्या रीतीमागील अप्रकट गृहीततत्त्वांचे प्रकटीकरणासाठी व त्यामुळे त्या रीतीस प्राप्त होणाऱ्या शास्त्रशुद्धतेसाठी त्यांनी संगतता तत्त्वाचा उपन्यास केला.

### सॅम्युएलसन यांची कामगिरी

पूर्वीच्या अर्थशास्त्रीय सिद्धान्तनातला दोष कोणाच्याच कसा लक्षात आला नाही याबद्दल त्यांना आश्चर्य वाटले व वर उल्लेखिलेल्या प्रबंधात त्यांनी यौवनसुलभ डौलाने लिहिले आहे की गेल्या शतकाच्या शेवटी त्या वेळचे अर्थशास्त्रज्ञ सार्वत्रिक समतोलाची शक्यता व अस्तित्व, किमती, मागणी, पुरवठा यांची समीकरणे मोजून ती काढावयाच्या अज्ञात उत्तरांइतकीच आहेत असे दाखवून सिद्ध करीत होते. त्या वेळी हीसुद्धा मोठीच कामगिरी होती. "परंतु विसाव्या शतकाच्या पहिल्या २५ वर्षांतील अर्थशास्त्रज्ञांनी या प्राथमिक अन्वेषणावरच-त्यात प्रत्यक्षातील निरिक्षित माहितीवरून पडताळा पाहता येईल असे फारच थोडे अर्थपूर्ण (meaningful) सिद्धान्त असताना-का समाधान मानले याचा उलगडा अजून व्हावयाचा आहे." (पृ. २५७).

हे दुर्लक्षिलेले काम करण्यास सॅम्युएलसन पुढे सरसावले. त्या कामाबद्दल त्यांनीच तेथे लिहिले आहे : "विविध प्रकारची माहिती (चल व प्राचल) विनिर्दिष्ट केली असता आणि आधारतत्त्वी अटी (postulates) अथवा क्रियात्मक (फलीय) संबंध (functional relations) निश्चित असता, दिलेल्या चलांची समतोलातील मूल्ये कशी ठरतात हे दाखविणे हे तुलनात्मक स्थितिकीचे काम आहे.' उदाहरणार्थ, एका वस्तूच्या आंशिक समतोलाच्या बाबतीत इतर वस्तूंच्या किमती व संख्यात्मक पार्श्वभूमी माहीत असता, त्या वस्तूच्या पुरवठा व मागणी यांचे संबंध स्वतंत्रपणे दाखविणारे वक्र जेथे एकमेकांस छेदतात त्या बिंदूने समतोलातील अज्ञात किंमत आणि पुरवठा व मागणी यांच्या राशी ठरतात याहून अर्थशास्त्राला अधिक काही म्हणता येत नसेल तर मग "अर्थशास्त्रज्ञ हा मागणी-पुरवठा एवढेच शब्द म्हणावयास शिकविलेला पोपट आहे" अशा त्याच्या केल्या जाणाऱ्या अधिक्षेपास तो सर्वस्वी पात्र आहे असेच म्हणावे लागेल. समतोल करणारे प्रभावी 'नियम' आहेत एवढेच माहीत होत असल्यास त्या नियमांच्या

स्वभावाबद्दल आपणास काहीच कळत नाही. आपले अन्वेषण उपयोगी व्हावयास या समतोलातील स्वतंत्र माहितीत (प्राचलात) बदल झाल्यास समतोलातील मूल्ये कशी बदलतील यासंबंधीची माहिती त्या अन्वेषणाने आपणास मिळाली पाहिजे."

"वरच्या उदाहरणातील उपभोक्त्यांच्या 'आवडीनिवडी' (taste) हा फक्त मागणीवर परिणाम करणारा प्राचल (parameter) बदलणारा आहे असे समजू. मग मागणी वाढली तर त्यामुळे त्या वस्तूची किंमत वाढेल का कमी होईल? प्राचलात बदल होण्यापूर्वीच्या परिस्थितीत व बदल झाल्यावरच्या परिस्थितीत मागणी व पुरवठावक्र एकमेकांस छेदतात ती किंमत ठरेल या विधानाने वरच्या प्रश्नास उत्तर मिळत नाही. त्या दोन वक्रांचा छेदबिंदू त्यांपैकी एक वक्र बदलल्यास कसा सरकेल याबद्दल काहीच सांगता येत नाही. आणि तरीसुद्धा विविध प्रकारच्या अशा परिस्थितीत या प्रश्नाला 'किंमत वाढेल' असे निश्चित उत्तर देता येते असे बहुतेक अर्थशास्त्रज्ञ म्हणतील."

"हे उत्तर कसे येते? समतोलाच्या बिंदूच्या जवळच्या क्षेत्रातसुद्धा फार थोड्या वस्तूंच्या बाबत त्यांच्या पुरवठा व मागणी वक्रांच्या यथातथ्य आकाराबद्दल आपल्याकडे तपशीलवार माहिती उपलब्ध असते. अशी माहिती जमविण्यास पुष्कळ पैसा व वेळ खर्च करावा लागेल हे तर झालेच पण अशा कित्येक बाबतीत उपभोक्ते वा उत्पादक (पुरवठा करणारे) यांना प्रत्यक्षात (वस्तुतः) बदललेल्या किंमतीच समोर टाकल्या तर काय होईल (ते काय करतील) यासंबंधी वस्तुनिष्ठ माहिती गोळा करणेही अशक्य आहे."

"अर्थशास्त्रज्ञाच्या पुढे उभे ठाकणाऱ्या प्रश्नांपैकी हा प्रातिनिधिक प्रश्न आहे. परिमाणात्मक अशी बिनचूक माहिती उपलब्ध नसता एका जटिल (अर्थ) व्यवस्थेच्या गतीच्या गुणात्मकतेविषयी अन्वेषणाने त्याला अंदाज करावा लागतो. या संदर्भात त्याने जे थोडेफार यश मिळविले आहे त्या बहुतेकांचे दोन प्रकारांत वर्गीकरण करता येईल : (१) व्यक्ती आपल्या उपयोगितेचे किंवा व्यवसाय (उत्पादन) संस्था आपल्या नफ्याचे महत्तमीकरण करतात या गृहीततत्त्वावर आधारलेले सिद्धांत आणि (२) अर्थव्यावसायिक व अर्थसंस्था यामधील आंतरक्रियांच्या समतोलाच्या स्थिरतेसंबंधात विनिर्दिष्ट केलेल्या अटी यावर आधारलेले सिद्धांत. जरी (१) प्रकारचे सिद्धांताचे अलीकडेपर्यंत अपुरे शोधन झाले असले तरी ते सर्वत्र अधिक माहीत आहेत. आणि त्यांच्यासंबंधी येथे काही म्हणावयाचे नाही. परंतु पुढच्या विश्लेषणात असे दिसून येईल की (१) या प्रकारचे सिद्धांत हे दुसऱ्या प्रकारच्या सिद्धांताची काही खास रूपे असतात. समतोलांच्या स्थिरतेचा प्रश्न हा तुलनात्मक स्थितिकीच्या साह्याने अर्थपूर्ण सिद्धांत व्युत्पन्न करण्याशी किती घनिष्टपणे संबंधित आहे हे दाखविण्याचे या प्रकरणाचे मुख्य काम आहे. या दुहेरीपणातच मी म्हणतो त्या संगततेच्या तत्त्वाचा (correspondence principle) जन्म आहे." (पृ. २५८).

त्या तत्त्वाचे विश्लेषण त्यानंतरच्या प्रकरणात करून त्याच्या पुढच्या प्रकरणाच्या सुरुवातीस सॅम्युएलसन यांनी लिहिले आहे : "तुलनात्मक स्थितिकी आणि गतिकी (dynamics) यांच्यामध्ये आकारीक पण घनिष्ठ संबंध आहे हे मागील प्रकरणात दर्शविले आहे. माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंतच्या अर्थशास्त्रीय लिखाणात हा संबंध प्रत्यक्षपणे कधीही सांगितला गेलेला नाही आणि दुसरे चांगले नाव सुचत नाही म्हणून मी त्याला संगततेचे तत्त्व (correspondence principle) असे नाव दिले आहे. या प्रकरणात त्याच्या विश्लेषक स्वभावाचे अधिक खोलवर संशोधन करावयाचे आहे आणि त्याचा दुहेरी स्वभाव विशद करावयाचा आहे. तो दुहेरी स्वभाव असा की गतिमान अवस्थांच्या स्थैर्यसंबंधीचे संशोधन स्थितिशील विश्लेषणाचे अर्थपूर्ण सिद्धांत सांगू शकते एवढेच नव्हे तर (तुलनात्मक) स्थितिशील पद्धतींचा उपयोग त्या पद्धतीच्या गतिशील अवस्थेसंबंधी माहिती मिळविण्यास करता येतो."

आणि हे जे नवीन तत्त्व सॅम्युएलसन सांगत होते त्याचे अर्थशास्त्र विचारांच्या प्रगतीतील स्थान सांगताना त्यांनी स्वतःच लिहिले आहे : "सध्याच्या (१९४७) अर्थशास्त्रीय सिद्धान्तनात स्थितिशील अन्वेषणाकडून गतिशील अन्वेषणाकडे संक्रमण होत असलेल्या क्रांतिकारक काळात या तत्त्वाची उत्तम समज असणे (देणे) हे अत्यंत महत्त्वाचे आहे... भौतिकीतील सनातन सिद्धांताकडून पुंज सिद्धांतानुसारी यांत्रिकीकडे झालेल्या संक्रमणामुळे जसा (त्या शास्त्राच्या) दृष्टिकोनात बदल झाला त्याच प्रकारच्या बदलाशी याची तुलना करता येईल." (पृ. २८४).

**संगतता तत्त्वाची परीक्षा**

सॅम्युएलसन यांनी ही कामगिरी यशस्वी रीतीने पार पाडली असेच सर्वांचे आतापर्यंतचे मत आहे. या कामगिरीचे वर्णन ॲरो व हान पुढील शब्दांत करतात. "समतोलाच्या स्थिरतेची सध्या सर्वमान्य व प्रतिष्ठित झालेली व्याख्या सॅम्युएलसन यांनी केलेली आहे. असमतोलात असलेल्या अर्थव्यवस्थेच्या गतिशील प्रतिमानात किमती कशा होतील यावर ही व्याख्या प्रकटपणे आधारली पाहिजे असा त्यांनी युक्तिवाद केला. वालरा व त्याच्यानंतरच्या बहुतेक अभ्यासकांच्या यासंबंधीच्या विश्लेषणातील सुप्त (अप्रकट) गृहीतके त्यांनी प्रकटपणे (formalised) केली : 'प्रत्येक वस्तूची किंमत तिला असलेल्या जादा मागणीच्या प्रमाणानुसार वाढते' हे ते गृहीतक होते. या गृहीतकान्वये एक विकलक (differential) समीकरणांची प्रणाली (पद्धती) निश्चित होते; या समीकरण पद्धतीची पूर्ती करणारा (बदलाचा) प्रत्येक प्रश्न व समतोलाच्या सान्निध्यातून (जवळून) निघणारा प्रत्येक (बदलाचा) मार्ग जर समतोलाकडेच नेणारा असेल, तर ती पद्धती स्थिर असते...तुलनात्मक स्थितिकीतील सर्व अर्थपूर्ण सिद्धांत हे उपभोक्ते आपल्या उपयोगितेचे वा उत्पादक आपल्या नफ्याचे महत्तमन करतात या दुय्यम (second order) गृहीतकावरून किंवा प्रस्तुत समतोल स्थिर प्रकारचा आहे या गृहीतकावरून मिळतात असे सर्वसाधारण संगततेचे तत्त्व म्हणून सॅम्युएलसन यांनी सांगितले. खरोखर पाहता या तत्त्वाच्या आधारे फारच थोडे अर्थपूर्ण सिद्धांत निघू शकतात."[६]

ॲरो व हान यांनी या प्रश्नाचे खोलवर गणिती अन्वेषण करून शेवटच्या वाक्यातील निष्कर्ष काढला आहे. ते अवगाहन गणिती व जटिल आहे. ते त्या भाषेत येथे मांडण्याचे प्रयोजन नाही. फक्त त्यातील मुख्य मुद्दे येथे गणित शक्य तेवढे टाळून मांडण्याचा प्रयत्न करतो. ॲरो आणि हान यांच्या या परीक्षणाचे नीट आकलन होण्यासाठी संगतता तत्त्वाचे कार्य व त्याची व्याप्ती यांच्या परीक्षेसंबंधी प्रथम थोडक्यात कल्पना देतो.

सॅम्युएलसन यांनी संगतता तत्त्वाचा प्रपंच मागे उल्लेखिलेल्या अर्थशास्त्रीय अन्वेषणास आवश्यक असलेल्या तीन गृहीतकृत्यात्मक प्रश्नांचे उत्तर होकारार्थी देण्यासाठी केला होता. त्यांच्या विश्लेषणाचा मथितार्थ असा की समतोलाच्या स्थैर्यासंबंधी शोध करून ते स्थिर प्रकारचे आहे असे सिद्ध करता आले तर वरील तिन्ही प्रश्नांचे उत्तर होकारार्थी येते व त्यावर आधारलेली अर्थशास्त्रीय मीमांसा ही शास्त्रीय ठरते. समतोलाच्या स्थैर्याचा प्रश्न म्हणजेच तुलनात्मक स्थितिकीची रीत शास्त्रीय असण्याचा निकष. म्हणून सॅम्युएलसन यांनी समतोलांच्या स्थैर्यासंबंधी गणिती संशोधन करून संगततेचे तत्त्व सांगितले आहे.

मागे विवेचन केल्याप्रमाणे काही (सर्व नव्हे) समगतीने बदलणाऱ्या प्रतिमानातील समीकरणे सोडविल्यास त्यांची उत्तरे स्थितिशील स्थायी समतोलात्मक येऊ शकतात परंतु अशा प्रत्येक प्रतिमानातील असे उत्तर एकच एक वा अनन्य असेलच असे नाही. अशी अनेक उत्तरे संभवतात. तेव्हा अनन्य स्थायी समतोल असलेल्या समगती गतिशील प्रतिमानांनाच सॅम्युएलसन यांचे संगतता तत्त्व लागू आहे. सर्वांना नाही. ही त्या तत्त्वाच्या व्याप्तीवरची एक मर्यादा झाली.

सॅम्युएलसन यांचा दावा ते वास्तवाविषयी सिद्धांत मांडणारे आहेत, नुसत्या कल्पनात्मक सिद्धांतात त्यांना रस नाही असा होता. त्यांनी संगतता तत्त्व वास्तव आहे हे कशावरून ठरविले ? गॉर्डन यांना उत्तर देताना सॅम्युएलसन यांनी खुलासा केला आहे की माझ्या ग्रंथात "गतिशील प्रतिमानांच्या स्थायी समतोलाचे नुसते गणिती अन्वेषण करून न थांबता प्रत्यक्षातल्या अर्थव्यवस्थेतही तसेच आढळते असे विधान मी केले आहे. परंतु आता (म्हणजे १९५५ मध्ये) याविषयी मला इतका आत्मविश्वास वाटत नाही." "१९३० नंतरच्या काळात अमेरिकी अर्थव्यवस्थेतील समष्टीय स्तरावरची आकडेवारी लक्षात घेतली तर माझ्याप्रमाणे इतरांनाही ती परिस्थिती गतिशील स्थैर्याचीच वाटली होती. त्या अर्थव्यवस्थेची अलीकडची परिस्थिती पाहता हे गृहीतकृत्य चूक होते असे म्हणावयास हरकत नाही. या बाबतीत मी गॉर्डन यांच्या तक्रारीशी सहमत आहे."[७] संगतता तत्त्वामागील गृहीतकृत्याच्या वास्तवतेबद्दलची ही कबुली अधिकच निर्णायक आहे.

ॲरो व हान यांचे परीक्षण सॅम्युएलसन यांच्या गणिती संशोधनासंबंधीच आहे. सॅम्युएलसन यांनी यासंबंधीच्या प्रश्नात जितके खोलवर जावयास हवे होते तितके न जाता संगतता तत्त्व हे व्यापक आहे व बहुतेक अर्थव्यवस्थांना लागू पडते असे अपुऱ्या संशोधनाने मांडले असे त्यांचे म्हणणे आहे. अशा प्रकारचे खोलवर गणिती संशोधन केल्यास तुलनात्मक स्थितिकीची अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या व्युत्पत्तीस पायाभूत असलेली अन्वेषणारीती किती थोड्या आणि अवास्तव परिस्थितीत शास्त्रीय ठरते हे दृष्टोत्पत्तीस येऊन सॅम्युएलसन यांचे संगतता तत्त्व हे अर्थशास्त्रातील प्रचलित सिद्धांतांना शास्त्रीय समर्थन देण्यास किती अपुरे आहे हे लक्षात येते. थोडक्यात ॲरो आणि हान असे दाखवतात की समतोलाचे अनन्यत्व आणि त्याचे स्थैर्य ही फार थोड्या प्रकारच्या विशिष्ट अर्थव्यवस्थांच्या प्रतिमानात आढळतात. त्या अर्थव्यवस्थांची वैशिष्ट्ये (किंवा गृहीततत्त्वे) प्रत्यक्षातील अर्थव्यवस्थांच्या कोठे जवळपासही नसतात. एवढेच नव्हे तर ही वैशिष्ट्ये असलेल्या अर्थव्यवस्थातही अनन्य व स्थिर समतोल शक्य होण्यासाठी ती वैशिष्ट्ये फक्त पर्याप्त (पुरेशी) असतात, आवश्यक नसतात. म्हणजे ती वैशिष्ट्ये असली तरी त्या अर्थव्यवस्थेतील आर्थिक प्रक्रियांची प्रवृत्ती जोरदारपणे समतोलाकडे नसेल (किंवा हे आवश्यक लक्षण त्यात नसेल) तर तसा समतोल होईल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे समतोलाच्या स्थैर्यावर आधारलेल्या संगतता तत्त्वाची व्याप्ती फारच संकुचित आहे. ती विशिष्ट कल्पित अर्थव्यवस्थांच्या प्रतिमानापुरतीच आहे. प्रत्यक्षातील अर्थव्यवस्थांच्या संबंधात संगतता तत्त्व जवळ जवळ गैरलागूच आहे. तेव्हा त्याच्या आधाराने प्रचलित अर्थशास्त्रातील सिद्धांत व्युत्पादण्याची तुलनात्मक स्थितिकीची रीत शास्त्रीय आहे असे म्हणणे मुळीच टिकणारे नाही. अशा अशास्त्रीय अन्वेषणारीतीनेच आतापर्यंतचे प्रचलित अर्थशास्त्रीय सिद्धांत व्युत्पादिले गेले आहेत.

आता ॲरो-हान यांच्या पुस्तकातील या विषयासंबंधीच्या मजकुराचे सढळ भाषांतर वाचा :

ॲरो व हान यांच्या पुस्तकाच्या १० व्या प्रकरणाचे नाव 'समतोलांची तुलना' असे आहे. त्याच्या सुरुवातीस हे ग्रंथकारद्वय लिहितात : "एखाद्या अर्थव्यवस्थेतील प्राचलात (parameters) काही बदल झाल्यास (समजा, उपभोक्त्यांच्या आवडीनिवडी किंवा उत्पादनतंत्र) त्याचे परिणाम काय होतील याचा अभ्यास करताना प्राथमिक पाऊल म्हणून या बदलाशी अर्थव्यवस्था कसे जुळवून घेते या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून, ज्या समतोलापासून अर्थव्यवस्था (या बदलामुळे) वळली व ज्या समतोलाकडे ती तेथून अभिगामी असेल ते दोन समतोल एकमेकांशी तुलणे उपयोगी ठरते. ही विश्लेषणपद्धती केव्हा उपयोगी असेल ह्या प्रश्नाचे आपल्याला उत्तर द्यावयास हवे. समतोलांच्या अशा तुलना करण्याच्या रीतीला तुलनात्मक स्थितिकी किंवा तुलनात्मक गतिकी असे म्हणण्याचा संकेत आहे. त्यातील 'स्थितिकी' व 'गतिकी' या संज्ञांचा नेमका अर्थ कोणता आहे हे अस्पष्ट आहे. उदाहरणार्थ, ज्या अर्थव्यवस्थेत (पुढच्या काळाशी संलग्न) असा वायदे बाजार अस्तित्वात व कार्यानुवर्ती आहे तिच्या संबंधात 'स्थितिकी' वा 'गतिकी' यापैकी कोणती परिस्थिती आहे हे सांगणे अवघड आहे. त्या अर्थव्यवस्थेतील सर्व संविदा (contract) एका विशिष्ट क्षणी केल्या जातात म्हणून ती स्थितिशील असे म्हणावयाचे की उत्पादन केलेल्या व साठवून ठेवलेल्या वस्तूंचे साठे भविष्यात बदलतील म्हणून ती गतिशील आहे असे म्हणावयाचे ? म्हणून आम्ही 'स्थितिकी' व 'गतिकी' या संज्ञा या संदर्भात टाळावयाचे ठरविले आहे." (पृ. २४५).

"या प्रकरणात सार्वत्रिक समतोलांच्या प्रतिमानांची त्या प्रतिमानातील प्राचलात फरक झाल्यामुळे कोणते बदल होतील याचे स्पष्ट भविष्य करण्याची शक्ती वा कुवत किती आहे याचे संशोधन करावयाचे आहे. मागील विवेचनात हा प्रश्न अशा समतोलांच्या अनन्यत्वाशी (uniqueness) घनिष्ठपणे संबंधित आहे असे आम्ही दाखविलेच आहे आणि असे अनन्यतत्त्व संपादण्यासाठी लागणाऱ्या काही अटी सांगितल्याखेरीज यात विशेष प्रगती करता येणे शक्य नाही हे सहज लक्षात येईल. तरीसुद्धा ज्या प्रकारच्या प्राचलातील बदलांच्या बाबतीत असे भविष्य शक्य होते ते प्रकार फारच मर्यादित (कमी) आहेत." (पृ. २४५).

त्या प्रकरणाच्या शेवटी त्यातील निष्कर्ष देताना ग्रंथकारद्वय लिहितात : "आतापर्यंतच्या अन्वेषणाचा अर्थ असा की समतोलांच्या तुलनेच्या संदर्भातील प्रश्नांना निश्चित उत्तरे देण्यास उपयोगिता आणि नफा यांचे महत्तमन करण्याची प्रवृत्ती गृहीत धरणारी प्रतिमाने फार अपुरी पडतात. व्यक्त पसंतीचे[6] अबल गृहीतक जरी सर्व अर्थव्यवस्थेस

समतोलांच्या तुलनेसाठी या सर्वसाधारणपणे लागू पडते असे समजले तरी जेव्हा प्राचलातील बदलांमुळे होणारे पण द्विवर्णी[९] नसलेले बदल लक्षात घ्यावयाचे असतील त्या वेळी त्या प्रतिमानातील माहिती निश्चित उत्तरे काढण्यास अपुरी पडते असे आढळते. एके काळी असे वाटत होते की जर वरील गृहीतकाबरोबरच अर्थव्यवस्थेतील समतोल (काही विवक्षित समायोजनाच्या परिस्थितीत) स्थिर असतो असे गृहीतक स्वीकारले तर उत्तराबाबतची ही अनिश्चितता दूर होईल. आपल्याला पुढे कळेलच की अशा स्थिरतेची जी आवश्यक लक्षणे आहेत त्यातून आपणास या संदर्भात हवी ती माहिती मिळत नाही, आणि त्या स्थिरतेची जी पर्याप्त (पुरेशी) लक्षणे आहेत त्यामुळे किंवा त्यांच्यासाठी (त्या प्रतिमानातील) मागणी फलांवर (अनुवर्तावर) स्थूलपर्यायी[१०] किंवा कर्णप्रभावी[११] अशी बंधने घालावी लागतात. त्यामुळे मुख्य प्रश्नाबाबत फारशी प्रगती होत नाही. फक्त एक नकारात्मक निष्कर्ष मिळतो की आंशिक अन्वेषणाची रीती ही अत्यंत बिनभरवशाची आहे. त्यातून निश्चित उत्तरे मिळतात पण ती वास्तव असतीलच असे म्हणता येणार नाही." (पृ. २६२).

सॅम्युएलसन यांनी मांडलेल्या संगततेच्या तत्त्वाबद्दल आता निश्चित मत देता येईल. "प्रथमदर्शनी सॅम्युएलसन यांचा या तत्त्वासंबंधीचा दावा समर्थनीय आहे असे वाटेल. कारण ज्या प्रतिमानातील प्राचलांच्या बदलामुळे त्या अर्थव्यवस्थेच्या समतोलात होणाऱ्या बदलांबद्दल आपल्याला निश्चितपणे सांगणे शक्य झाले ती प्रतिमाने स्थिर समतोल असलेली होती (आहेत) हे आपण सिद्ध करू शकलो. एवढ्या सामग्रीवरूनच तुलनात्मक स्थितिकी व समतोलाची स्थिरता यात घनिष्ठ संबंध आहे असे मांडण्यात आले आहे. परंतु हा निष्कर्ष घाईने काढलेला व फसवा आहे. कारण ते प्रतिमान स्थूलपर्यायी, हिक्सीय[१२] वगैरे प्रकारचे आहे का याबद्दल काहीही निर्देश न करता ते स्थानिक (local) वा सर्वंकष (global) प्रकारे स्थिर आहे एवढेच सांगून त्यांची तुलना करण्यास हे तत्त्व आपल्याला सांगत आहे.--- ही माहिती आपल्या पुढच्या कामाच्या दृष्टीने अपुरी आहे. स्थानिक स्थैर्यासाठी पुऱ्या व्हाव्या लागणाऱ्या आवश्यक अटी तुलनांच्या संदर्भात फार कमकुवत आहेत. अनंत वस्तू आणि सर्वंकष स्थैर्य यांच्या संदर्भात तर त्या अधिकच निर्बल ठरतात."

"म्हणून संगततेच्या तत्त्वाचा अर्थ एवढाच : सर्वंकष समतोल शक्य होण्यासाठी पुरेशा अशा ज्या अटी पुऱ्या झाल्या पाहिजेत, त्या पुऱ्या झाल्यास समतोलांची तुलना करण्याचा उपक्रम करण्यास थोडी सवड सापडेल. स्पर्धात्मक समतोलाच्या अनन्यत्वासाठी त्याच अटी पुऱ्या व्हाव्या लागतात. या सर्वच अटी ज्या कामासाठी शोधल्या गेल्या त्या कामासाठी त्या आवश्यक नाहीत. त्या फक्त पुरेशा आहेत. आणि म्हणूनच संगततेचे तत्त्व (त्या कामासाठी) पुरेसे नाही हे सहज ध्यानात येईल." (पृ. ३२१).

## तळटीपा

१. माझ्या पूर्वीच्या लिखाणाचा संदर्भ "समतोलाची संकल्पना आणि अर्थचिकित्सा" हा 'अर्थसंवाद' एप्रिल-जून १९७७, खंड १, अंक १ येथे प्रसिद्ध झालेला लेख आहे व त्यातील अवतरणे या लेखात दिली आहेत.

२. सॅम्युएलसन यांच्या संगतता तत्त्वावर टीका करताना गॉर्डन यांनी असा प्रश्न उपस्थित केला की हे तत्त्व माहीत नसताना सुद्धा ॲडॅम स्मिथ त्याप्रमाणेच सिद्धांत करीत होते असे मानावयाचे काय ? त्याला उत्तर देताना सॅम्युएलसन यांनी लिहिलेले आहे.– "गॉर्डन यांनी ॲडॅम स्मिथ यांच्या पुस्तकातील जो उतारा दिला आहे तो हृद्य आहे. त्यातील अन्वेषण खालील गणिती विधानात मांडता येईल.

$$dp/dt = K \ ( D - S );$$

K = एक धन स्थिरांक; D = मागणी वक्राप्रमाणे मागणीची राशी; S = पुरवठावक्राप्रमाणे पुरवठ्याची राशी; dp/dt = कालौघात किमती बदलण्याचा दर (वेग). (या समीकरणाचा अर्थ असा की किमतीच्या बदलाचा दर हा त्या वस्तूस असणाऱ्या जादा मागणीच्या प्रमाणात ठरतो.)"

"हे विधान संगतता तत्त्वाची जागा घेते का त्याचा प्रतिषेध (contradict) करते असे म्हणावयाचे ? यांपैकी काहीच होत नाही. वरील विधानाचे आधारे गॉर्डन किंवा स्मिथ यांना तुलनात्मक स्थितिकीसंबंधी काहीच म्हणता येत नाही. त्यांना तुलनात्मक गतिकीतील खालील विधान मात्र करता येईल. 'जर सुरुवातीस

किंमत स्थिर असेल आणि जर त्यानंतरच्या काळात मागणीवक्र उजवीकडे सरकला (व तेथेच राहिला) असेल तर नंतरच्या काळात पूर्वापेक्षा किंमत वाढेल अशी अपेक्षा आपल्याला करता येईल."

"आता जर आपल्याला तुलनात्मक स्थितिकीनुसार विधान करावयाचे असेल तर वरील विधानात आपण आणखी गृहीतकृत्ये समाविष्ट केली पाहिजेत. वरील विधानात 'मागणीवक्र सरकल्यास ते प्रतिमान त्यामुळे नवीन गतिक समतोलाकडेच अभिगामी होते' असे गृहीतकृत्य स्वीकारल्यास आपल्याला असा अंदाज करता येतो की तुलनात्मक स्थितिक किमतीतील बदल धन असेल (म्हणजे किंमत वाढेल). हे विधान तुलनात्मक स्थितिकीचे आहे, आणि ते करताना आपण संगतता तत्त्वच वापरीत आहोत." *Quarterly Journal of Economics*, May 1955, pp. 305–310.

३. समतोलाच्या संकल्पनेचे विवरण येथे चालले आहे म्हणून त्या संकल्पनेसंबंधी विशेषत: अर्थशास्त्रात फार मोठ्या प्रमाणावर प्रस्तुत असलेल्या एका गैरसमजाची थोडीशी दखल घेणे आवश्यक आहे. पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत अर्थव्यवहारांचा सार्वत्रिक समतोल होतो व ती समतोलाची अवस्था अर्थव्यवस्थेतील अधिकतम समाधानाची वा लोककल्याणाची अवस्था असते असे सिद्ध करण्याचा अर्थशास्त्रात प्रयत्न झाला. त्यालाच पुढे पॅरेटो इष्टतमता असे नाव मिळाले. त्यातूनच अर्थव्यवहारांचा समतोल म्हणजे त्यांचा (व पर्यायाने अर्थव्यवस्थेचा) सुसंवाद वा स्वरमेळ (harmony) असे समीकरण मांडण्यात आले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील ही सुसंवादाची प्रवृत्ती म्हणजे केवढा वरदहस्त आहे. यावर काव्य रचून त्या अर्थव्यवस्थेचे गुणगौरव गाण्यास पुष्कळांनी सुरुवात केली. (Bastiat, Carey वगैरे). त्यामुळे भांडवलशाही विरुद्ध मत असणाऱ्या मंडळींनी आपल्या परीने अर्थव्यवहारांचा समतोल या संकल्पनेवरच हल्ला करण्याचा पवित्रा घेतला. साक्षेपी अर्थशास्त्रज्ञांनी असा गैरसमज करून घेतला नाही. उदाहरणार्थ वर उल्लेखिलेला अर्थशास्त्रीय सिद्धांत फार मर्यादित अर्थाचा व फार मर्यादित परिस्थितीतच खरा असू शकेल असा इशारा मार्शल यांनी दिलेला आढळतो. (A.Marshall, *Principles of Economics*, 8th edition, p. 470) तथापि हा गैरसमज सुप्त स्वरूपात नवसनातन अर्थशास्त्रात टिकून राहिलेला व अनेक वेळा डोके वर काढीत राहिलेला आहे.

मुळातच समतोल व सुसंवाद वा स्वरमेळ या दोन कल्पनांचे समीकरण मांडणे चूक आहे. त्या दोन स्वतंत्र आणि निरनिराळ्या अर्थांच्या संकल्पना आहेत. समतोल ही परस्परविरुद्ध बाह्य प्रभावांनी (शक्तींनी) एकमेकांस हतप्रभ केल्यामुळे होणारी स्थितिक अवस्था असते. तर सुसंवाद किंवा स्वरमेळ हा आन्तरिक व बाह्य प्रभावांनी मिलाफाने एकत्र येऊन निर्माण झालेली व इष्ट वाटणारी गतिक अवस्था असते. त्याच्या 'इष्टतेमुळे' सुसंवादात मूल्यविचार गर्भित असतो. समतोल ही तांत्रिक गोष्ट असते. व त्यात मूल्यगर्भिता नसते. सुसंवाद वा स्वरमेळ होण्यास समतोल हे आवश्यक आणि पुरेसे कारण नसते. समतोलामुळे सुसंवाद वा स्वरमेळ होतोच वा होईलच असे मुळीच नाही.

४. आर्थिक समतोलातही अशीच अडचण येते याची कल्पना फॉन नाऊमन व केनेथ ॲरो यांनी बरेच वर्षांपूर्वीपासून दिली आहे. अर्थव्यावसायिक परस्पर सहकार्याने जे स्वत: मिळवतात त्याला 'आर्थिक मूल्ये' म्हणावयाचे असेल तर आर्थिक मूल्ये अयोज्य (non-additive) आहेत असे म्हणणे भाग आहे. असा फॉन नाऊमन यांचा निष्कर्ष आहे. जर एखादी मूल्य योजना (value scheme) म्हणजे एका व्यक्तीच्या विविध आर्थिक निवडींचे क्रमीकरण (ordering) असा अर्थ असेल तर अनेक व्यक्तींच्या आर्थिक निवडींच्या क्रमीकरणांचे समुच्चयन (aggregation) करून सबंध समाजाची मूल्य योजना (Social Value Scheme) तयार करणे हे सर्वसाधारणपणे अशक्य असते असा ॲरो यांचा सिद्धान्त आहे.

५. G. L. S. Shackle, *Epistemics and Economics*, 1972, p. 53.

६. K. J. Arrow, and F. H. Hahn, *General Competitive Analysis*, Holden-Day, San Francisco, 1971, p. 12.

७. तत्रैव.

८. व्यक्त पसंतीचे अबल गृहीतक (weak axiom of revealed preference) : दोन वस्तूंमधील व्यक्त पसंती अप्रत्यावर्ती आहे. अ व ब या दोन वस्तूत अ ब पेक्षा अधिक व्यक्तपसंत असेल तर त्याच वेळी ब ही अपेक्षा व्यक्तपसंत असणार नाही.

९. द्विवर्णी बदल (bianary) : सर्व वस्तूंच्या किमतींच्या संदर्भात जर प्रतिमानातील प्राचलात बदल झाल्याने (उदाहरणार्थ उपभोक्त्यांच्या आवडीनिवडीत) फक्त दोनच वस्तूंच्या मागणीत फरक पडत असेल तर त्याला द्विवर्णी बदल म्हणतात.

१०. स्थूल पर्यायी (gross substitutes) : अशा अर्थव्यवस्थेतील सर्व वस्तू या स्थूलमानाने एकमेकांचे पर्याय असतात. कोणत्याही वस्तूची किमत वाढली तर त्यामुळे इतर सर्व वस्तूंच्या (जादा) मागण्या वाढतात. अशा अर्थव्यवस्थेतील समतोल अनन्य असतो. वास्तवातील अर्थव्यवस्थेत असे कधीच नसते.

११. कर्णप्रभावी (diagonal dominance) : सारणी गणितातील भाषेतील ही संज्ञा आहे. तिचा प्राकृत अर्थ असा की अशा अर्थव्यवस्थेत प्रत्येक वस्तूच्या जादा मागणीचे फल (अनुवर्त) हे त्या वस्तूच्या किमतीतील बदलांना, इतर सर्व वस्तूंतील एकत्रित बदलांपेक्षा, जास्त संवेदनाशील असते. हे गृहीतक वास्तव असल्यास मार्शल यांच्या आंशिक समतोलाच्या विश्लेषणाचे तंत्र आक्षेपसहित होते.

कोणत्याही निमानाच्या (numeraire) संदर्भात कर्ण प्रभाविता असेल तर होणारा समतोल अनन्य असतो. पण सर्व निमानांच्या संदर्भात कर्णप्रभावित असेलच असे नाही. त्यामुळे कर्णप्रभाविताचा विचार हा विनिर्दिष्ट निमानांच्या संदर्भातच करता येतो. निमान कोणते हे ठरविण्याचा प्रश्न त्यामुळेच महत्त्वाचा ठरतो. (पृ. ३०१–३०२).

१२. हिक्सीय प्रतिमान : एका अर्थव्यवस्थेत एकच कुटुंब आहे अशी कल्पना करा. अशा अर्थव्यवस्थेतील समतोल अनन्य असतो. आपण जर असे समजलो की एका अर्थव्यवस्थेत सर्व व्यक्ती सारख्याच आहेत किंवा तेथे जणूकाय एकच व्यक्ती आहे (फक्त ती आकाराने मोठी आहे) आणि हीच कल्पना पुढे चालविली तर सर्व कुटुंबे एकसारखीच असलेल्या अर्थव्यवस्थेत जणू एकच कुटुंब (मोठ्या आकाराचे) आहे असा त्याचा अर्थ होईल. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने कोणताही एक किमतीचा सट अस्तित्वात असेल तर त्याच्या संदर्भात या कुटुंबातील संपत्ती विभजनाचा एकुणात जादा मागणी (पुरवठा) यांच्या सदिशावर (vector) काहीही परिणाम होणार नाही. दुसरे असे की किमतबदलामुळे संपत्ती विभजनावर होणाऱ्या परिणामाचा एकुणात जादा मागणीच्या सदिशावर (vector) कोणताही परिणाम होता उपयोगी नाही. पहिली अट पुरी झाली तर दुसरी आपोआपच पुरी होईल हे उघड आहे. शिवाय, कुटुंबामधील कोणत्याही प्रकारचे संपत्ती विभजन असता जर ज्या कुटुंबांकडून संपत्ती जाऊन दुसऱ्या कुटुंबांना मिळेल, त्यांची (ज्यांची संपत्ती वाढली त्यांची) बाजारातील खरेदी-विक्री ज्यांची संपत्ती कमी झालेली असेल त्या कुटुंबांच्या बाजारातील खरेदी-विक्रीच्याइतकीच (आकाराने) पण व्यस्त असेल तरच या दोन अटी पुऱ्या होतील. या हिक्सीय अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानातील समतोल अनन्य असेल. (पृ. २२१).

■ ■

# नव्या आर्थिक क्रान्तीची चाहूल[1]

भा. रा. हेकणे

आर्थिक क्रांती ही राजकीय क्रांतीसारखी अचानक होत नसते किंवा एकदम आपले लक्ष वेधून घेत नाही. राजकीय क्रांत्या अनेकदा होत असतात, आर्थिक क्रांतीचे तसे नसते. सध्या अमेरिका, इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशात एका नवीन प्रकारच्या आर्थिक क्रांतीची सुरुवात झाली आहे आणि यासंबंधी काही पुरावाही उपलब्ध होऊ लागला आहे. सुमारे दोनशे वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली व त्यानंतरच्या शंभर वर्षांत ती पूर्ण झाली असे मानले जाते. यापूर्वीच्या औद्योगिक क्रांतीमुळे तेथे आर्थिक, सामाजिक व राजकीय उलथापालथ झाली आणि इंग्लंडचा चेहरामोहरा पार बदलून गेला. तेथील राजकारणात जमीनदार उमराववर्गाचे महत्त्व कमी कमी होत जाऊन राजसत्ता हळूहळू कारखानदार व व्यापारी वर्गाच्या हातात येऊ लागली. दोनशे वर्षांपूर्वी इंग्लंडमधील साठ टक्के मजूरवर्ग शेतीमध्ये राबत होता आणि तरीही धान्य आयात करावे लागत असे. सध्या दोन टक्क्यांपेक्षाही कमी मजूर शेतीत काम करतात आणि तरीही शेतीमालाचे उत्पादन अनेक पटीने वाढलेले दिसून येते. शेतीमध्ये क्रांती झाल्यामुळे असंख्य मजूर त्या धंद्यातून बाहेर फेकले गेले. नवीन प्रकारच्या कारखानदारीने (factory system) या बेकार मजुरांना सामावून घेतले हे खरे असले तरी काही काळ हे बेकार झालेले लोक गरिबीच्या खाईत लोटले गेले. यथावकाश औद्योगिक क्रांतीच्या काळात आगगाडीचे आगमन झाले ही एक अभूतपूर्व घटना होती. जुन्या जमीनदार पद्धतीत मजूर एकाच ठिकाणी आणि एकाच मालकापाशी जखडलेला होता. त्याला आता पाय फुटले व तो फिरण्याचे स्वातंत्र्य उपभोगू लागला. त्याला देशात वाटेल त्या ठिकाणी जाऊन उपजीविकेचे साधन शोधणे शक्य होऊ लागले. त्यानंतर मोटारीचे आगमन झाले व त्यामुळे मानव अधिक मोकळेपणे हिंडू लागला. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमधील नवीन प्रकारची कारखानदारी उत्तरेकडे केंद्रित होऊ लागली आणि त्यामुळे ग्लॅसगो, लिव्हरपूर, मँचेस्टर, बर्मिंगहॅम यांसारखी शहरे उदयाला आली आणि श्रीमंत झाली.

या पार्श्वभूमीवर पुढारलेल्या देशांत होत असलेल्या आर्थिक क्रांतीचा येथे विचार करायचा आहे. या नवीन क्रांतीला संज्ञान क्रांती (Information Revolution) असे म्हटले जाते. संज्ञानाच्या क्षेत्रात वेळोवेळी झालेल्या सुधारणांमुळे मानव अधिकाधिक स्वतंत्र होऊ लागला आहे. पुरातनकाळी एका खेड्यात राहणाऱ्या माणसाला आपले विचार दुसऱ्या खेड्यात राहणाऱ्या माणसाला कळविता येत नव्हते. कारण त्या काळी खेड्यांना जोडणारे रस्तेच नव्हते. कालांतराने रस्ते बांधले गेले आणि माणूस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणावर जाऊन आपले मनोगत सांगू लागला. त्याला स्वतःला जाणे शक्य नसले तर तो दुसऱ्या माणसाबरोबर निरोप पाठवू लागला. बोलक्या कळप्याची गोष्ट सर्व विदितच आहे. कालांतराने टपालाची व्यवस्था झाली आणि माणूस आपले विचार पत्राद्वारे दुसऱ्याला सांगू लागला. इंग्रजी अमदानीत तारेने संपर्क साधणे शक्य होऊ लागले. यानंतरची संज्ञानक्षेत्रातील सुधारणा म्हणजे टेलिफोन ही होय. भारतासारख्या खंडप्राय देशात समर्थपणे राज्यकारभार व व्यापार करण्यासाठी तारयंत्र व टेलिफोन

या सुविधांचे फार मोठे साहाय्य झाले व आजही होत आहे. भारताशी सतत संपर्क साधता यावा यासाठी इंग्लंडने तीन वेळा समुद्रातून तार घातली आणि तिन्ही वेळा तार तुटली. तार घालण्यात नंतरच यश मिळाले. टेलेक्स ही यापुढची पायरी. इलेक्ट्रॉनिकीमुळे आता तर संज्ञानसाधनात मोठीच क्रांती होऊ घातली आहे.

सध्याच्या संज्ञान क्रांतीचा संबंध अथवा उगम आधुनिक तंत्रविज्ञानात आहे. फायबर ऑप्टिक केबल, रिमोटसेनसिंग, उपग्रह, डिजिटल कोड, मायक्रो-प्रोसेसिंग, लाईट पेन्स, टच-सेन्सिटिव्ह व्हिडिओ स्क्रिन्स वगैरे आधुनिक कळयंत्रे ( gadgets ) ही संज्ञान क्रांती घडवून आणीत आहेत. यापैकी आणि इतर अनेक कळयंत्रे स्वतंत्रपणे आपआपल्या क्षेत्रात वापरली जात असत. सर्वांना एकत्र आणून वापर करण्याची शक्यता निर्माण झाली नव्हती. परंतु आता ही कळयंत्रे एकत्र आणून त्यांच्याकडून संयुक्तपणे काम करून घेणे शक्य होत असल्याने संज्ञान क्रांतीचे पाऊल बरेच पुढे पडले आहे. या कळयंत्रांकडून संयुक्तपणे काम करून घेण्याची क्षमता वाढल्यामुळे अनेक कामे तीव्र वेगाने, कमी श्रमाने व सुलभपणे करता येऊ लागली आहेत.

या संज्ञान क्रांतीमुळे इंग्लंडसारख्या देशातील परिस्थितीत कोणते बदल घडून येत आहेत हे उदाहरण म्हणून विचारात घेणे उपयुक्त ठरेल. एके काळी इंग्लंड हे जगाची कर्मशाळा (workshop of the world) म्हणून प्रसिद्ध होते. इंग्लंडच्या या लौकिकाला आता उतरती कळा येऊ लागली आहे, नव्हे आली आहे. पूर्वीचे ब्रिटिश साम्राज्य आता लयाला गेले असल्यामुळे इंग्लंडच्या मालाला हुकमी बाजारपेठा नष्ट झाल्या आहेत. कारखानदारीत इंग्लंडच्या पुढे गेलेले अमेरिका, जपान, जर्मनी यांसारख्या देशांशी जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करणे इंग्लंडला कठीण जाऊ लागले आहे. आपल्या अर्थव्यवस्थेची व विशेषत: कारखानदारीची पुनर्रचना केल्याखेरीज जगाच्या बाजारपेठेत आपले स्थान टिकून धरता येणार नाही याची रास्त जाणीव तेथील लोकांस व शासनास झाली असल्याचे दिसून येते. याच कारणास्तव त्यांनी नवीन तंत्रविज्ञानाचा आश्रय घेण्याचे ठरविले आहे. एवढेच नव्हे तर, नवीन तंत्रविज्ञानाची अपरिहार्यता लक्षात घेऊन, इंग्लंडने कारखानदारीत व इतर विविध क्षेत्रांत या विज्ञानाचा वापर केव्हाच सुरू केला असून त्याचे काही परिणाम दिसू लागले आहेत. १९५० मध्ये कारखानदारी आणि सर्व प्रकारच्या सेवा (services) यामध्ये सारख्याच प्रमाणात म्हणजे प्रत्येकी ४२ टक्के रोजगारी होती. सध्या मात्र कारखानदारीतील रोजगारी ४२ टक्क्यांहून २६ टक्क्यांवर घसरली आहे. आणि सेवाक्षेत्रामधील रोजगारी ४२ टक्क्यांवरून ६२ टक्के इतकी वाढली आहे. आजपर्यंत इंग्लंडमध्ये कारखानदारीचे उत्तर भागात केंद्रीकरण झालेले होते; आणि आता त्याच भागात बेकारी वाढत आहे. बर्मिंगहॅममध्ये बेकारीचे प्रमाण १६ टक्के इतके झाले असून ते राष्ट्रीय प्रमाणापेक्षा बरेच अधिक आहे. उत्तरेकडच्या प्रदेशात रोजगारी वाढण्याची आता शक्यता नाही. एवढेच नव्हे तर तेथील कारखानदारीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी अधिक लोक बेकार होणे जरूर आहे. ही वाढती बेकारी तात्पुरत्या स्वरूपाची नाही. ज्यांच्या नोकऱ्या गेल्या आहेत त्यांच्या त्या कायमच्या गेल्या आहेत; त्यांना पूर्वीच्या नोकऱ्या परत मिळण्याची शक्यता नाही. या वाढत्या बेकारीमुळे जून १९८३ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत टोरी पक्षाला चांगला टोला बसेल असा काहींचा अंदाज होता. परंतु तसे काही झाले नाही. एवढेच नव्हे तर टोरी पक्षाला पार्लमेंटमध्ये प्रचंड बहुमत मिळाले. याचे मुख्य कारण म्हणजे तेथील लोकांना सध्याच्या बेकारीचे स्वरूप समजले आहे.

या बेकारीचे मूळ संज्ञान क्रांतीतच सापडते. याचमुळे इंग्लंडमध्ये कारखानदारीचे प्रमाण कमी होत जाणार आहे. आज चार मजुरांपैकी एक मजूर कारखान्यात काम करतो. परंतु यापुढे मात्र दहा टक्के मजूर कारखानदारीत पुरेसे होतील आणि तरीही तेथील उत्पादनक्षमता व उत्पादन वाढतच जाईल असा अंदाज आहे. उद्योगात नवीन तंत्रविद्या (technology) वापरली जात असल्यामुळे—उदा. यंत्रमानव (robot), संगणित्र (computer), दूरसंचारण (telecommunications) यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागल्यामुळे – उत्पादनाच्या क्षेत्रात यापुढे कमी मनुष्यबळ लागणार आहे. इंग्लंडमधील लॅंगब्रिजच्या मोटार कारखान्यात आज काय चालले आहे हे पाहिले म्हणजे काळाची पाउले कोणत्या दिशेने पडत आहेत हे लक्षात येते. आज या कारखान्यात दहा वर्षांपूर्वीपेक्षा निम्मे लोक काम करतात आणि तरीही उत्पादन घटले नाही. याउलट मालाचा दर्जा सुधारला, उत्पादनखर्च कमी झाला आणि जागतिक बाजारपेठेत या मोटारीने आपले स्थान बळकट केले.

बेकार झालेल्या लोकांना आता नवीन नोकऱ्या कोठे मिळणार हा मुख्य प्रश्न आहे. या प्रश्नाचे योग्य उत्तर अमेरिकेतील बोल्डर (कोलोरॅडो) यांनी दिले आहे. एखादा नवीन धंदा उभा करायला भांडवल लागते हे खरे. तथापि नवीन तंत्रविद्येच्या युगात भांडवलापेक्षा ज्ञान आणि कल्पना यांची अधिक जरुरी असते हे बोल्डर (कोलोरॅडो)ने दाखवून दिले आहे. नवीन कळयंत्रे माहिती मोठ्या प्रमाणावर गोळा करतात, साठवतात व त्याचे वितरण करतात. त्यांच्या साहाय्याने नवीन उद्योग लहान प्रमाणावर सुरू करता येतात आणि असे उद्योग कोठेही सुरू करता येतात. इंग्लंडमध्ये नवीन लहान उद्योग जे नवीन तंत्रविद्येवर आधारित आहेत ते दक्षिणेकडे स्थापन होऊ लागले आहेत. उद्योजक आपला उद्योग सुरू करण्यासाठी एखादे लहान गाव किंवा निसर्गरम्य जागा अधिक पसंत करतो. या घटना उद्योगाच्या स्थाननिश्चयनाच्या पारंपरिक सिद्धांतात बसणार नाहीत. किंबहुना यासंबंधी एखाद्या नवीन सिद्धांताची बांधणी करावी लागेल. दूरसंचारण, संगणित वगैरे कळयंत्रांच्या साहाय्याने समाजातील सर्वांनाच – कारकून, टंकलेखक, सचिव, वकील, शिक्षक, बँकर या सर्वांना – आपले काम सुयोग्य वातावरणात व कमी श्रमात करणे शक्य झाले आहे. यामुळे एक नवीन प्रकारचा समाज, संज्ञान समाज (Information Society) अस्तित्वात येऊ लागला आहे.

जे उद्योग नवीन तंत्रविज्ञानावर आधारित आहेत त्यांना भांडवलापेक्षा कल्पनांची व ज्ञानाची अधिक जरुरी असते. म्हणूनच त्यांना बुद्धिसघन (intellect-intensive) उद्योग असे म्हणतात. या संज्ञान क्रांतीची व्याप्ती सध्या किती आहे हे अजून पूर्णपणे स्पष्ट व्हायचे आहे. परंतु या क्रांतीने विविध क्षेत्रांत प्रवेश करण्यास प्रारंभ केला आहे. देशाच्या संरक्षणव्यवस्थेत नवीन तंत्रविज्ञानाचा अधिकाधिक उपयोग होऊ लागला आहे. वेळोवेळी सोडण्यात येणारे उपग्रह हे यातील एक ठळक उदाहरण होय. उपग्रहाच्या साहाय्याने इतर देशांतील संरक्षणव्यवस्था न्याहाळता येते. रज्जू (cable), दूरसंचारण वगैरे साधनांनी शिक्षणक्षेत्रातही प्रवेश केला आहे. रज्जूच्या साहाय्याने शिक्षण घरपोच पोहोचविता येते. शाळेत जायची जरुरी नाही. खरे म्हणजे शाळेचीच जरुरी नाही. दूरसंचारणामुळे शिक्षण देण्याच्या पद्धतीत फरक पडणार आहेत असे दिसते. (Wired school, not a place) अशी परिस्थिती संभवते. डॉक्टर, अकौंटंट, शिक्षक, इंजिनियर, शेतकरी इत्यादी लोकांना आपापल्या धंद्यातील कौशल्य वाढविण्यासाठी परिसंवाद वगैरे आयोजित करावे लागतात. त्यांना यासाठी एके ठिकाणी यावे लागते. ही अडचण आता दूर झाली आहे. त्यांना नियोजित शिक्षणक्रमासाठी एखाद्या ठिकाणी जाण्याची जरुरी नाही. यासंबंधी अमेरिकेतील विसकॉनसिन विद्यापीठात प्रयोग झाले आहेत, होत आहेत. घरबसल्या शिक्षण पोचविता येण्याची आता सोय झाली आहे. संज्ञान क्रांतीमुळे प्रचलित शिक्षणपद्धतीतही क्रांतिकारक बदल होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.

संज्ञान क्रांतीमुळे लहान उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळत असून एकूण अर्थव्यवस्थेत त्यांची संख्या व महत्त्व वाढत जाणार आहे. आजपर्यंत असे सांगण्यात येत असे की, अर्थव्यवस्थेत बडे उद्योगधंद्यांचे प्राबल्य असते. यामध्ये बहुराष्ट्रीय निगमांचा समावेश आहे. उत्पादन किती करावे, जाहिरातीवर किती खर्च करावा, माल कोणत्या किमतीला विकावा यांसारखे महत्त्वाचे निर्णय बडे उद्योगधंदे घेतात आणि या बाबतीत लहान उद्योग व लहान उद्योजक यांचा आवाजही ऐकू येत नाही. प्राध्यापक गालब्रेथ यांनी अनेक ठिकाणी ही मते आग्रहाने मांडली आहेत. परंतु संज्ञान क्रांतीचा प्रमुख परिणाम म्हणून लहान उद्योगांची संख्या वाढत गेली आणि अर्थव्यवस्थेत ते प्रभावी ठरले तर कदाचित पूर्ण स्पर्धेची परिस्थिती निर्माण होऊ शकेल. एवढेच नव्हे तर परिणामी भांडवलशाही (Capitalism) व समाजवाद (Socialism) याविषयीच्या आपण आजवर बाळगलेल्या पारंपरिक कल्पनाही अप्रस्तुत ठरण्याचा संभव निर्माण होईल.

इंग्लंडमधील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात संज्ञान क्रांतीची योग्य दखल घेतली जात आहे. पंतप्रधान श्रीमती थॅचर यांनी या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी एक लक्ष पौंड मंजूर केले आहेत. या संशोधनाचा उद्देश त्यांनी खालील शब्दांत स्पष्ट केला आहे. त्या म्हणतात : " The principal objective of the programme is to formulate lessons for industry and government on how to secure greater acceptance of new technologies by developing their positive aspect, and minimising their negative

aspects, from an enhanced understanding of the cultural and organizational determinants of public attitudes. Acceptance of new technologies at the workplace would be the main, but not the sole focus of the work."[२]

नवीन तंत्रविज्ञानामुळे सुरू होणाऱ्या संज्ञान क्रांतीतील संभाव्य धोके लक्षात घेणे जरूर आहे. कळयंत्राच्या साहाय्याने कोणाही व्यक्तीचे त्याच्या बँकेबरोबर झालेले गोपनीय व्यवहार किंवा त्याच्या फॅमिली डॉक्टरकडे असलेले प्रकृतीसंबंधीचे गोपनीय अहवाल यांची माहिती काढता येणे आता शक्य होऊ लागले आहे. खाजगी स्वरूपाच्या गोपनीय माहितीचे रक्षण कसे करावे हा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे. यासंबंधी आजपर्यंत समाजात काही संकेत ठरले होते व त्यांचे पालनही होत असे. परंतु संकेत आता पुरेसे संरक्षण देऊ शकणार नाहीत अशी जाणीव झाल्यामुळे निदान कायदा करून संरक्षण देता येईल काय याचा विचार चालू आहे. दुसरी अडचण संज्ञानाची किंमत ठरविण्यासंबंधीची. प्रसिद्ध पुस्तकाची किंवा एखाद्या फिल्मची किंमत ठरवून खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. परंतु कळयंत्राने पुरविलेल्या संज्ञानाची किंमत कशी ठरविणार? नवीन तंत्रविज्ञानामुळे निर्माण झालेल्या क्रांतीचा वेग व व्याप्ती प्रचंड आहे. जेथे जेथे ही क्रांती होत आहे तेथील जनता आश्चर्यचकित झाली आहे यात संदेह नाही. या क्रांतीचे परिणाम अजून सुस्पष्ट झालेले नाहीत आणि काळाच्या उदरात काय दडले आहे हे लक्षात येत नसल्यामुळे लोक सचिंत आहेत. या क्रांतीचे दूरगामी परिणाम समजायला एकविसाव्या शतकापर्यंत थांबावे लागेल. एका मुद्द्याबद्दल मात्र सर्वांचे एकमत आहे आणि तो म्हणजे काहीही झाले तरी आपण ही क्रांती समंजसपणे हाताळली पाहिजे, हा होय.

संज्ञान क्रांती भारतात येण्याची कितपत शक्यता आहे? हा प्रश्न योग्य व महत्त्वाचा आहे. तथापि त्याचे उत्तर देणे सोपे वाटत नाही. संज्ञान क्रांतीचा भारताला स्पर्श झाला नाही असे समजणे चूक ठरेल. सार्वजनिक क्षेत्रात तरी नवीन तंत्रविज्ञानाचा अधिकाधिक उपयोग केला जात आहे. वेळोवेळी उडविले जाणारे उपग्रह केवळ टीव्हीवरील चित्र स्पष्ट व चांगले दिसावे किंवा टेलिफोनवरचे संभाषण स्पष्ट ऐकू यावे यासाठी नाहीत. उपग्रहाला अनेक महत्त्वाची कामे करायची असतात आणि त्यातील काही कामे देशाच्या संरक्षणव्यवस्थेसंबंधी असतात. देशाच्या संरक्षण-व्यवस्थापनास नवीन यंत्रविज्ञानाचा उपयोग करण्यास पुष्कळ वाव आहे याची रास्त जाणीव केंद्र शासनाला झाली आहे. तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रात इतर देश पुढे जात असताना भारताने या बाबतीत मागे पडणे देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत धोक्याचे ठरेल.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या खाजगी क्षेत्रात संज्ञान क्रांतीने प्रवेश केला आहे काय? एका महत्त्वाच्या बाबतीत इंग्लंड आणि भारत यामध्ये फार तफावत आहे. इंग्लंडमधील एकूण आर्थिक परिस्थितीत तेथील जनतेचे जीवनमान परदेशी व्यापारावर फार अवलंबून असते. ब्रिटिश साम्राज्य लयाला गेल्यामुळे ब्रिटिश मालाला हुकमी बाजारपेठ राहिली नाही. परदेशात केलेल्या गुंतवणुकीच्या उत्पन्नावर जगण्याचे दिवस आता उरले नाहीत. त्यामुळे इंग्लंडच्या दृष्टीने परदेशी व्यापाराचे महत्त्व अधिकच वाढले आहे. आपला माल कमी किमतीचा आणि दर्जेदार असेल तरच तो जगाच्या बाजारात खपेल; आणि किंमत कमी करण्यासाठी उत्पादनखर्च कमी करायला पाहिजे याची योग्य जाण इंग्लिश उत्पादकाला असते. त्याचमुळे संज्ञान क्रांतीचे महत्त्व इंग्लंडला पटू लागले आहे. या बाबतीत भारतातील परिस्थिती पुष्कळच वेगळी आहे. भारताला परदेशी व्यापाराचे महत्त्व इंग्लंडइतके वाटत नाही. कारण देशातील बाजारपेठच मोठी आहे आणि तेथे भारतीय उत्पादकाला परदेशी मालाशी स्पर्धा करावी लागत नाही. देशी उद्योगधंद्यांना पुरेसे संरक्षण मिळाले आहे. देशातील ग्राहकाला मिळेल तो माल विक्रेता मागेल त्या किमतीला विकत घ्यावा लागतो. ग्राहकाला संरक्षण मिळत नाही. मालाचा दर्जा सुधारावा, उत्पादनक्षमता वाढवावी, उत्पादनखर्च कमी करावा याची भारतीय उत्पादकाला आच वाटत नाही. काही उद्योगांत रिसर्च अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट (R and D) विभाग असतो. य विभागाचे प्रयोजन संशोधन करून उत्पादनखर्च कमी करावा हे असते की करामध्ये सूट मिळवावी हा असतो हे स्पष्ट व्हायचे आहे. याखेरीज आणखी एक अडचण आहे. नवीन तंत्रविद्येचा वापर करावा तर माणसे बेकार होतील मुंबईच्या कापड गिरण्या असोत किंवा आयुर्विमा महामंडळ असो, तेथे नवीन नवीन तंत्रविद्येचा आश्रय करावा तर त्याला प्रखर विरोध होतो. अशा परिस्थितीत नवीन संज्ञान क्रांती भारतात कशी येणार?

तळटीपा :–

१. हा लेख अनेक प्रकाशित साधनांवर आधारलेला आहे. त्यांपैकी काही प्रमुख साधने खालीलप्रमाणे होत :—

(अ) The New Freedom Will Mean The End of Old-fashioned Capitalism And Socialism : By Andrew Neil; The Listener, June 23, 1983.

(ब) The Political Quarterly, The Information Age, Volume 54, No. 2, April-June 1983. या अंकातील खालील लेख माहितीपूर्ण आहेत :—

(१) Commentary : Janet Morgan, Pp. 111-119.

(२) Telecommunications And The Fading of The Industrial Age : Anthony Smith, Pp. 127-136.

(३) The Impact of Telecommunications on Education; : Carolyn Hayman, Pp. 152-159.

(४) The Information Society : Private Monopolies and The Consumer Interest : Jeremy Mitchell, Pp. 160-167.

(५) Uncrossing The Wires : The Hunt Report in Context : John Howkins, Pp. 168-176.

(६) The Information Revolution of The 1990 s : Anthony E. Smith, Pp. 187-191.

(७) Information Technology's Seven-League Boot : William Gosling, Pp. 120-126.

2. The Times (London), August 26, 1983.


## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

**नी. वि. सोवनी** : अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध (१९७७), पृष्ठे २२६, किंमत रु. २० (एकमेव विक्रेते : द कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., ४०–४९–इ, शाहूपुरी, सहावी गल्ली, कोल्हापूर १).

**मो. वि. भाटवडेकर** : शिक्षणाचे अर्थशास्त्र (१९७८), पृष्ठे १७८, किंमत रु. २० (वितरण व्यवस्था : व्हिनस प्रकाशन, तपश्चर्या, ३८१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०).

**भ. ग. बापट** : आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण (१९८२), पृष्ठे ३३३, किंमत रु. ५०. (वितरक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे ४११ ०३०).

# प्रा. सोवनी आणि विनिमयमूल्ये : प्रत्युत्तर

मुकुंद कुलकर्णी

'अर्थसंवाद' च्या ऑक्टोबर-डिसेंबर १९८२ च्या अंकात मी एक लेख लिहून प्रा. सोवनी यांची मूल्यकल्पना अॅडॅम स्मिथ यांच्या मूल्यकल्पनेसदृश म्हणजे बेरीज सिद्धांत[1] मानणारी आहे असे प्रतिपादन केले होते. स्राफा विचार-सरणी समजावून देण्यासाठी जी कोष्टके सोवनी यांनी तयार केली आहेत व त्यांच्या 'स्राफा विचारसरणी – चार व्याख्याने' या पुस्तकात पृष्ठ ४० ते ४२ वर दिलेली आहेत त्या कोष्टकांच्या आधारे मी हा निष्कर्ष काढलेला होता. या माझ्या लेखाला प्रा. सोवनी यांनी 'अर्थसंवाद'च्या एप्रिल-जून १९८३ च्या अंकात उत्तर दिलेले आहे. या उत्तराचा प्रतिवाद करण्यासाठी हा लेख लिहीत आहे.

माझ्या मूळ लेखातील मुख्य आक्षेपाला खऱ्या अर्थाने उत्तर देण्याऐवजी इतरच काही गैरलागू मुद्दे प्रा. सोवनी यांनी निर्माण केलेले आहेत. माझा मुख्य आक्षेप मी अगदी स्पष्ट शब्दांत पुढीलप्रमाणे मांडला होता : प्रा. सोवनींच्या पुस्तकातील पृष्ठ ४१ वरील कोष्टक उद्धृत करून त्याबाबत मी म्हटले होते, "या तक्त्यातील उद्‌विष्टीची मूल्ये ही पूर्वीच्या तक्त्यातील उद्‌विष्टीच्या मूल्यांच्या तुलनेने कमी झालेली आहेत. कारण उघड आहे. मजुरीत जेवढी घट घडून आलेली आहे तेवढी नफ्यात वाढ झालेली नाही. मजुरीचा दर आणि नफ्याचा दर $\left(\frac{\text{नफा}}{\text{निविष्टी}}\right)$ परस्परांशी संबंधित नसल्यासारखे बदललेले आहेत. मजुरीचा दर पूर्वीपेक्षा निम्मा झालेला आहे तर नफ्याचा दर शून्यापासून २५ टक्केपर्यंत (च) वाढलेला आहे. वास्तविक मजुरीचा दर निम्मा होतो तेव्हा – म्हणजे मजुरांकडे केवळ ९०० च जातात तेव्हा – एकूण वाढाव्यातील ९०० शिल्लक उरतात. ते भांडवलदारांकडे गेल्यानंतर नफ्याचा दर $\frac{९००}{९००}$ इतका म्हणजे १०० टक्के इतका होतो. सोवनी म्हणतात तसा २५ टक्के होत नाही. सोवनींचा २५ टक्के हा दर पूर्णपणे काल्पनिक आहे...."

आता या आक्षेपाला उत्तर द्यावयाचे तर आपण घेतलेला २५ टक्के हा दर कसा शास्त्रशुद्ध आहे किंवा स्राफा यांच्या एकूण विवेचनाशी कसा सुसंगत आहे हे तरी सांगावयास हवे किंवा आपण तो पूर्णपणे काल्पनिक घेतला असून तसा तो काल्पनिक घेणेच कसे बरोबर आहे हे तरी पटवावयास हवे. पण प्रा. सोवनींनी असे काहीच केलेले नाही. उलट माझी नफ्याचा दर मोजण्याची पद्धती "मार्क्सीय' आहे असे म्हणून त्यांनी आणखी एक चूक करून ठेवली आहे. मार्क्सीय पद्धतीत 'उत्पादनकालापूर्वी वेतन' असे गृहीत असते. म्हणजे नफ्याचा दर काढताना नफ्याच्या एकूण रकमेला केवळ 'इतर निविष्टी' च्याच नव्हे तर 'इतर निविष्टी' अधिक मजुरी अशा एकूण निविष्टींच्या रकमेने भाग दिला जातो. मी तर असे काहीही केलेले नाही. सोवनींनी ज्या पद्धतीने नफ्याचा दर मोजलेला आहे त्याच पद्धतीने मीही तो मोजलेला आहे. तेव्हा या बाबतीतली माझी पद्धती मार्क्सीय होऊ शकत नाही.

आणखी थोडे पुढे जाऊन सोवनी म्हणतात, "मार्क्सीय प्रतिमानात मजुरीचा दर मजुरांच्या योगक्षेमास किमान जरूर तेवढाच ठरलेला असतो असे गृहीत आहे. त्यामुळे तो ठरल्यावर अर्थव्यवस्थेत निर्माण होणारा वाढावा सर्वस्वी भांडवलदारांनाच मिळणे अटळ असते व तेथे मजुरीचा दर व नफ्याचा दर यांच्यातील परस्परप्रमाणात होणारी चढघट सरळ गणित करून काढता येते. (प्रा. कुळकर्णींनी तसे केले आहे). परंतु हे स्राफा प्रतिमानात करता येत नाही कारण सर्व वाढावा भांडवलदारांनाच मिळतो हे मार्क्सीय गृहीतकृत्य स्राफा यांनी स्वीकारलेले नाही. एकूण वाढाव्यापैकी काही भाग मजुरीतही समाविष्ट होऊ शकतो, असे स्राफा प्रतिमानाचे गृहीतकृत्य आहे."

सोवनींच्या या प्रतिपादनात पुढील मुद्दे आहेत : (१) मार्क्सीय प्रतिमानात मजुरांच्या योगक्षेमास आवश्यक तेवढीच रक्कम मजुरीत दाखविली जाते व निव्वळ उत्पादनातून (म्हणजे उद्विष्टी वजा इतर निविष्टी यातून) ही मजुरीची रक्कम वजा केल्यानंतर शिल्लक राहिलेला भाग भांडवलदारांकडे जातो. (२) याच पद्धतीने मी नफ्याचा दर काढलेला आहे. (३) स्राफा प्रतिमान यापेक्षा वेगळे आहे. तेथे मजुरांना योगक्षेमासाठी आवश्यक असणाऱ्या भागापेक्षा जास्त भाग मिळू शकतो व त्या प्रमाणात भांडवलदारांचा वाटा कमी होतो. यापैकी पहिल्या व तिसऱ्या मुद्द्याबाबत माझा काहीही मतभेद नाही. (फक्त 'योगक्षेमासाठी किमान आवश्यक' म्हणजे शारीरिकदृष्ट्या जिवंत राहण्यापुरते एवढेच मार्क्स मानत नाहीत तर त्या त्या समाजातील पारंपरिक राहणीमानाला आवश्यक असे ते मानतात एवढे लक्षात ठेवले म्हणजे पुरे.) वरील दुसऱ्या मुद्द्यातून सोवनींना असे सूचित करावयाचे आहे की त्यांनी घेतलेल्या उदाहरणात नफ्याचा दर १०० टक्के हवा असे मी जेव्हा म्हणतो (वरील दुसरा परिच्छेद पाहावा) तेव्हा मजुरीत मी समाविष्ट करीत असलेला भाग मजुरांच्या किमान योगक्षेमाइतका असतो असे मी गृहीत धरतो. परंतु सोवनी असे करीत नसल्यामुळे त्यांनी काढलेला नफ्याचा दर या १०० टक्के दरापेक्षा वेगळा येतो. प्रत्यक्षात माझा मूळ लेख ज्यांनी वाचलेला आहे त्यांना माहीत असेल (किंवा या लेखातील दुसऱ्या परिच्छेदावरूनही कल्पना येऊ शकेल) की सोवनी यांनी मजुरीत जेवढा भाग समाविष्ट केलेला आहे, अगदी तेवढाच (म्हणजेच ९०० च) मी मजुरीत दाखविला आहे. हे ९०० मजुरांच्या योगक्षेमाला पुरतील इतकेच आहेत की त्यापेक्षा जास्त आहेत — म्हणजे मार्क्सीय आहेत की स्राफीय आहेत हा प्रश्न मी येथे आणलेला नाही व तो तसा आणणे येथे पूर्णपणे गैरलागू आहे. सोवनींना हवे तर त्यांनी तो आकडा मार्क्सीय मानावा किंवा हवे तर स्राफीय मानावा. पण तो आकडा त्यांनी स्वतःच त्यांच्या उदाहरणात दाखविला आहे एवढे मात्र विसरू नये.

मग प्रश्न असा येतो की, आम्ही दोघांनी काढलेले नफ्याचे दर वेगवेगळे येण्याचे कारण कोणते ? कारण अगदी उघड आहे. मी नफ्याचा दर हिशोबाने काढलेला आहे तर सोवनींनी तो 'मानलेला' आहे. मजुरीचा दरही त्यांनी 'मानलेलाच' आहे. माझे म्हणणे फक्त एवढेच आहे की या दोन दरांपैकी एक दर 'मानलेला' घेतला तर दुसरा दर त्यावरून हिशोबाने काढा. पण दोन्ही दर एकाच वेळी 'मानलेले' घेऊ नका. कारण तसे केले तर ती रिकार्डो-मार्क्स-स्राफा यांची पद्धती होत नसून ॲडॅम स्मिथ — प्राकृत सीमांततावादी यांची बेरीज पद्धती होते.

उत्पादनाचे नैसर्गिक मूल्य हे त्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांना मिळणाऱ्या मोबदल्यांच्या— म्हणजे भाटक, वेतन, नफा यांच्या बेरजेइतके असते असे ॲडॅम स्मिथ सांगतात. हे घटक मोबदले कसे ठरतात ? ॲडॅम स्मिथ यांच्या पद्धतीत प्रत्येक घटकाला असणाऱ्या मागणी-पुरवठ्यानुसार त्या घटकाच्या मोबदल्याचा दर ठरतो. हा दर आणि त्या घटकाचे वापरलेले प्रमाण यावरून त्या घटकाला मिळणारा एकूण मोबदला समजू शकतो. हे घटक परस्परांना पूर्णपणे पर्यायी असतात का आणि त्यामुळे त्यांच्या दरांचा परस्परांवर परिणाम होतो का या प्रश्नाची चर्चा, माझ्या माहितीप्रमाणे, ॲडॅम स्मिथ यांनी केलेली नाही. म्हणूनच त्यांचा सिद्धांत हा बेरीज सिद्धांत राहिलेला आहे. म्हणजेच परस्परनिरपेक्ष रीतीने ठरलेल्या घटक मोबदल्यांच्या दरावरून त्या त्या घटकाचा मोबदला काढावयाचा आणि त्या सर्वांच्या बेरजेइतके उत्पादनाचे मूल्य आहे असे मानावयाचे असा हा सिद्धांत आहे. प्रा. सोवनी जेव्हा मजुरीचा दरही 'मानलेला'च घेतात आणि नफ्याचा दरही 'मानलेला'च घेतात तेव्हा नेमके या सिद्धांतानुसारच वागत असतात. स्मिथ हे दर बाहेरून 'ठरलेले' घेतात तर सोवनी ते 'मानलेले' घेतात. दोन्ही ठिकाणी पद्धत एकच. दर आधी स्वतंत्र रीतीने ठरणार व मग त्यांच्या आधारे मोबदले ठरून त्यावरून विनिमयमूल्ये ठरणार.

जोपर्यंत सार्वत्रिक समतोल सिद्धांत प्रचारात आलेला नव्हता तोपर्यंत सीमांत उत्पादकतावादीही असाच बेरीज सिद्धांत मानत होते. प्रा. सोवनींनीही याचा उल्लेख त्यांच्या परिशिष्टात केलेला आहेच. स्मिथ आणि हे सीमांत उत्पादकतावादी यांच्यात फरक केवळ एवढाच होता की घटकाच्या मागणी–पुरवठ्यानुसार त्याच्या मोब-दल्याचा दर ठरतो, एवढेच सांगून स्मिथ थांबले होते तर मागणीच्या बाजूने जरा अधिक खोलात जाऊन घटकाच्या सीमांत उत्पादकतेनुसार त्याचा दर ठरतो असे सीमांत उत्पादकतावादी मानत होते. मात्र दोहोंची पद्धत एकच होती ती म्हणजे स्वतंत्रपणे ठरलेले दर घेऊन त्यांच्या साहाय्याने विनिमयमूल्याचे मोजमाप करणे.

या बेरीज सिद्धांताचे दोष दाखवत बसण्याचे हे स्थळ नव्हे. त्याचा एक महत्त्वाचा दोष मी माझ्या मागील लेखात दाखविला आहेच. सोवनींसारखे अभ्यासकही या सिद्धांताच्या पगड्यातून सुटू शकत नाहीत याचे कारण व्यष्टि–पातळीवर तो सिद्धांत नेहमीच खरा ठरतो. आपल्या व्यवसायातील उद्‌विष्टीचे विनिमयमूल्य वाढवून (मागणीची बाजू व इतर परिस्थिती त्यासाठी अनुकूल असेल तर) कोणत्याही व्यावसायिकाला त्या व्यवसायातील नफ्याचा दर वाढवून घेता येऊ शकतो. त्यासाठी त्याला त्याच्या मजुरांना दिल्या जाणाऱ्या मजुरीत कपात घडवून आणण्याची आवश्यकता नसते. अर्थव्यवस्थेतील दुसऱ्या कोणाचे तरी वास्तव उत्पन्न कमी होऊन त्यामुळे त्याचे वास्तव उत्पन्न वाढू शकते. पण व्यष्टि–पातळीवर खरी ठरणारी ही गोष्ट समष्टि–पातळीवर खरी ठरू शकत नाही. सर्वच व्यावसायिकांनी आपल्या उत्पादनाची विनिमय-मूल्ये वाढवली पण वास्तव मजुरी मात्र पूर्वीइतकीच ठेवली तर या व्यावसायिकांचा वास्तव नफा वाढणार नाही. जोपर्यंत अर्थव्यवस्थेतील वास्तव वाढावा (उद्‌विष्टी वजा इतर निविष्टी) कायम आहे तोपर्यंत वास्तव मजुरी कायम असेल तर वास्तव नफाही कायमच राहील. केवळ विनिमय-मूल्ये वाढवल्याने तो वाढणार नाही. (या उदाहरणाची सर्व गृहीते स्राफा यांच्या प्रतिमानाप्रमाणेच आहेत. फक्त चलनपुरवठा बदलू शकतो असे येथे अधिक मानले आहे. स्राफा यांच्यावर व्यष्टि–समष्टीतील फरक समजावून सांगण्याचा असा प्रसंग न आल्याने चलनपुरवठ्यातील बदलाबाबत त्यांना काहीच गृहीत मानावे लागलेले नाही.) स्राफा यांचा सिद्धांत समष्टि–पातळीवरील आहे. संपूर्ण अर्थव्यवस्थेतील भांडवलदारवर्ग आणि मजूरवर्ग असा त्यात विचार आहे. अशा ठिकाणी बेरीज–सिद्धांत लावणे म्हणजे काहीही सबळ कारण न देता अर्थव्यवस्थेतील वाढावा कमी किंवा जास्त होतो असे मानणे तरी आहे किंवा चलनभ्रम मानणे तरी आहे. वर दुसऱ्या परिच्छेदात जे उदाहरण दर्शविले आहे त्यात १८०० या एकूण वाढाव्यातील ९०० मजुरांकडे गेल्यानंतर ९०० नफा म्हणून रहातात असे मानून नफ्याचा दर काढला आहे. सोवनींनी मात्र तेथे असा ९०० नफा न मानता केवळ २२५ इतकाच नफा दाखविलेला आहे. मग वाढाव्यातील बाकीचे ६७५ कुठे गेले याचे सोवनींजवळ काय उत्तर आहे? त्यांच्या नंतरच्या उदाहरणातही एकूण वाढावा प्रारंभी ते १४०० इतका दाखवितात. पण नंतर यापैकी ७०० मजुरांकडे जातात आणि ४०० भांडवलदारांकडे जातात असे दर्शवितात. (मजुरीचा आणि नफ्याचा असे दोन्ही दर 'मानलेले' घेतल्यामुळे असे घडते.) असे विभाजन केल्यानंतर उरलेले ३०० कुठे जातात याचा काहीही खुलासा मिळत नाही. याच उदाहरणात पुढे ७०० आणि ५३३ असे विभाजन (नफ्याचा दर स्वतंत्रपणे बदलून टाकल्यामुळे) ते दर्शवितात. अशा वेळी मूळ वाढाव्यातील १६७ चा हिशोब लागत नाही.

स्राफा यांची पद्धत अशी आहे काय? 'मुळीच नाही' असे या प्रश्नाचे उत्तर आहे. आहे त्याच वाढाव्याचे केवळ वेगवेगळ्या प्रकारे विभाजन झाले (उदा. वरील १४०० चे एकदा ७००+७००, दुसऱ्यांदा ८००+६००, तिसऱ्यांदा १२००+२०० इ.) तर त्याचा विनिमयमूल्यांवर काय परिणाम होईल ते पाहणे हा स्राफा यांचा मुख्य अभ्यासविषय आहे. वाढावाच बदलून विनिमयमूल्ये बदलावयाची तर त्याला स्राफा कशाला हवेत? इतर कोणीही ते करू शकले असते.

प्रा. सोवनींची ही कोष्टके चुकलेली आहेत हे आणखीही एका प्रकारे सहज सिद्ध करता येईल. इतर निविष्टींचे मजुरीशी असणारे प्रमाण (किंवा मार्क्स यांच्या भाषेत 'भांडवलाची आंगिक रचना') ज्या व्यवसायात अर्थव्यवस्थेतील सरासरी प्रमाणाइतके असते त्या व्यवसायातील उद्‌विष्टीचे विनिमयमूल्य वाढाव्याचे विभाजन कसेही बदलले तरी बदलत नाही हे सोवनींना मान्य आहेच. सोवनींच्या पहिल्या उदाहरणात (म्हणजे 'अर्थसंवाद'च्या

ऑक्टोबर-डिसेंबर १९८२ च्या अंकात पृष्ठ १२२ वर मी जो तक्ता दिलेला आहे त्यात) सर्वच व्यवसायातील इतर निविष्टींचे मजुरीशी असणारे प्रमाण सामाजिक सरासरीइतकेच म्हणजे १:२ असे आहे. अर्थातच विभाजन बदलल्या-नंतर कोणत्याही व्यवसायातील उद्विष्टीचे विनिमयमूल्य बदलायला नको. प्रा. सोवनींनी मात्र सर्वच व्यवसायांतील उद्विष्टींची विनिमयमूल्ये बदलवून टाकलेली आहेत. (इतर निविष्टींच्या काही वेगळ्या इतिहासामुळे विनिमयमूल्ये बदलू शकतात. पण सोवनींच्या या उदाहरणात त्याचा काही संबंध नाही. तेथे विनिमयमूल्ये बदलली आहेत ती ,वाढाव्यातच बदल केल्यामुळे मजुरीचा दर व नफ्याचा दर परस्परांशी संबंधित नसल्यासारखे बदलवल्यामुळे.)

हे सर्व काही केवळ उदाहरणात्मक कोष्टकांमधीलच दोष आहेत असे नाही. या रोगाचे मूळ बरेच खोल आहे. मूळ स्राफा सिद्धांतच काय आहे याविषयी अगदी उलट कल्पना प्रा. सोवनींच्या मनात घर करून बसली आहे. अर्थसंवाद'च्या एप्रिल–जून १९८३ च्या अंकात पृष्ठ २१–२२ वर प्रा. सोवनी लिहितात : "एकूण वाढाव्याचे मजुरीत व नफ्यात वाटप होते व हे वाटप विनिमयमूल्यातील बदलामुळे होते असा स्राफा सिद्धांत आहे." एकदा ही कल्पना डोक्यात घट्ट बसल्यानंतर स्राफा सिद्धांत दाखवायचा म्हणजे विनिमय–मूल्ये बदललेलीच दाखविली पाहिजेत हे ओघाने आलेच. मग इतर निविष्टींचे मजुरीशी असणारे प्रमाण सामाजिक सरासरीइतके का असेना ! तथापि सोवनी म्हणतात तसा स्राफा सिद्धांत मानायला स्राफा यांच्या ग्रंथात मला कुठेही आधार दिसत नाही. उलट वाटप हे विनिमय-मूल्ये ठरण्याच्या प्रक्रियेबाहेर ठरते, ते मूल्यनिरपेक्ष असते असेच स्राफा यांनी मानलेले जागोजागी दिसून येते.[२] तेव्हा वाढाव्याचे वाटप विनिमयमूल्यांच्या बदलातून होत नसून विनिमयमूल्यातील बदल वाढाव्याच्या वाटपावर अवलंबून असतो. प्रा. सोवनींनी कृपया याची नोंद घ्यावी.

वाटपमूल्ये ठरण्याच्या प्रक्रियेबाहेर ठरते याचा असा मात्र अर्थ लावू नये की नफ्याचा दर व मजुरीचा दर हे दोन्ही परस्पर–स्वतंत्र रीतीने मूल्यप्रक्रियेबाहेर ठरतात. (व म्हणून आपण ते दोन्ही एकाच वेळी 'मानलेले' किंवा 'ठरलेले'च घेऊ शकतो.) या दोन दरांपैकी कोणता तरी एकच दर 'बाहेरून' ठरतो. तथापि त्यामुळे वाटप बाहेरूनच ठरले जाते. उदा. नफ्याचा दर $\frac{1}{4}$ आहे असे एकदा ठरल्यानंतर इतर निविष्टींची जी काही विनिमयमूल्ये ठरतील व त्यामुळे त्यांची जी काही एकूण किंमत होईल त्याच्या $\frac{1}{4}$ इतकी त्या अर्थव्यवस्थेतील एकूण नफ्याची रक्कम राहील. तथापि असे एकदा ठरल्यानंतर मजुरीचा दर किती राहील हे मात्र अगदीच स्वतंत्रपणे ठरणार नाही. इतर वस्तूंची विनिमयमूल्ये कशी ठरतात यावर (आणि त्यामुळे वाढाव्याचे एकूण मूल्य कसे ठरते यावर) तो अवलंबून राहील. त्यामुळे इतर मूल्ये ठरण्याच्या प्रक्रियेतच तो ठरेल. पण तो इतकाच ठरेल की त्याच्यावरून काढलेली एकूण मजुरीची रक्कम आणि बाहेरून ठरलेल्या नफ्याच्या दरामुळे (विनिमयमूल्ये ठरल्यानंतर) येणारी नफ्याची रक्कम या दोहोंची बेरीज त्या अर्थव्यवस्थेतील एकूण वाढाव्याबरोबरच–त्या वाढाव्याचे जे काही मूल्य ठरणार असेल त्याबरोबरच येईल नफ्याचा दर बाहेरून ठरला तर मजुरीचा दर आतून ठरतो किंवा मजुरीचा दर बाहेरून ठरला तर नफ्याचा दर आतून ठरतो याचा – म्हणजे एक-संख्या-स्वातंत्र्याचा (one degree of freedom). – असा अर्थ तेथे आहे; दोन्ही दर कल्पनेने घेणे असले 'स्वातंत्र्य' तेथे अभिप्रेत नाही.

प्रा. सोवनींनी त्यांच्या उत्तरात बरीच टक्केवारी काढून दाखविली आहे व त्यातून त्यांच्या उदाहरणातही नफा वाढल्यास मजुरी कमी होते असेच दिसते असे दर्शविले आहे. हे दिसण्यासाठी वास्तविक एवढ्या टक्केवारीची काहीही आवश्यकता नाही. त्यांच्या मूळ उदाहरणातील आकड्यातूनही नफा व मजुरी हे परस्परविरोधी दिशांनी बदलतात हे दिसू शकते. प्रश्न नुसता दिशांचा नसून प्रमाणांचा आहे. मजुरीचा दर अमुक इतका कमी झाल्यानंतर नफ्याचा दर निश्चित किती वाढेल हा प्रश्न आहे. मग ही निश्चित वाढ दरांच्या आणि टक्केवारीच्या स्वरूपात सांगा किंवा पूर्वीचा नफा इतका होता, आता तो इतका असला पाहिजे अशा केवळ (absolute) आकड्यांच्या स्वरूपात सांगा. त्या केवळ एकच बाब सांगण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत.

अॅडम स्मिथ यांचा सिद्धांत हा बाजार–किमतीविषयी आहे आणि म्हणून तो उत्पादन–किमतीविषयी नाहीच असा एक मुद्दा सोवनी यांनी मांडलेला आहे. उत्पादन–किंमत कशाला म्हणावयाचे हे यासाठी आधी ठरविले पाहिजे. माझ्या समजुतीप्रमाणे उत्पादनासाठी येणाऱ्या एकूण खर्चाइतकी (सामान्य नफा धरून) उत्पादन–किंमत असते. अॅडम

स्मिथ बाजार-किमतींविषयी जरूर बोललेले आहेत. पण या बाजार–किमतींना मध्यवर्ती अशी एक नैसर्गिक किंमत असते असे त्यांनी सांगितले आहे व या नैसर्गिक किमतीची जास्त चर्चा त्यांनी केली आहे. स्मिथ यांची ही नैसर्गिक किंमत उत्पादनखर्चावरून ठरते आणि ती उत्पादन-किंमतच आहे. केवळ उत्पादनघटक बाजारात विकत मिळतात म्हणून तिला बाजार-किंमत म्हणावयाचे तर मला वाटते 'उत्पादन-किंमत' हा प्रकारच अर्थशास्त्रात राहणार नाही. कोणाच्याही प्रतिमानात तो दाखविता येणार नाही.

स्राफा प्रतिमानात चलन नाही असेही सोवनींनी म्हटले आहे. त्यांनी थोडा बारकाईने विचार केला तर तेथे चलन आहे हे त्यांच्या लक्षात येईल. सोवनींनी स्वतःच त्यांच्या पुस्तकात "१ मण गव्हाचे मूल्य १ रु. आहे असे समजू; १ टन लोखंडाचे 'क्ष' रुपये आहे असे समजू" असे पृष्ठ ३६ वर म्हटले आहे व तसे त्यांचे करणे पूर्णपणे बरोबरच, नव्हे आवश्यकही आहे. स्राफा प्रथम वस्तुरूप निविष्टी-उद्‌विष्टी हा संबंध दर्शवितात. त्या वेळी ते निविष्टी व उद्‌विष्टी यांच्यामध्ये बाणांचा (→) वापर करतात. नंतर ते या वस्तुरूप संबंधांचे समीकरणात रूपांतर करतात. त्या वेळी ते समानतेच्या चिन्हांचा (=) वापर करतात. हा बदल कशामुळे झालेला आहे? वस्तुरूप निविष्टी-उद्‌विष्टींचे चलनी किमतीत रूपांतर केल्यामुळेच. त्यासाठीच $P_a$, $P_b$, $P_k$ अशा गुणकांचा वापर त्यांनी केला आहे. वस्तूंच्या किमती जेव्हा काढल्या जातात तेव्हा त्या कुठल्या तरी एककातच मोजल्या जातात ना? हा एकक म्हणजे 'तांब्याचा फुटका पैसा' नसेल कदाचित. पण तो निश्चितच चलन असतो.

चलनभ्रम स्राफा सिद्धांतात आहे असे मी कुठेही म्हटलेले नाही. किंबहुना तेथे तो नाहीच. मी केवळ एवढेच म्हटलेले आहे की विनिमयमूल्ये वाढवून एखाद्या अर्थव्यवस्थेतील नफ्याचा दर वाढत असेल परंतु आपली पूर्वीचीच चलनी मजुरी कायम आहे म्हणून आपली पूर्वीचीच स्थिती कायम आहे असे त्या अर्थव्यवस्थेतील मजूरवर्ग मानत असेल तर तो त्याचा चलनभ्रम आहे. या माझ्या म्हणण्याला, मला वाटते, सोवनींनी काहीही समर्पक उत्तर दिलेले नाही.

स्राफा यांच्या विचारांची आणि त्या अनुषंगाने स्मिथ, रिकार्डो आणि मार्क्स यांच्या विचारांची मराठीत अधिक चर्चा व्हावी याच मुख्य हेतूने हे लेख लिहिलेले आहेत. प्रा. सोवनींचा व्यक्तिशः अवमान करण्याचा त्यात कुठेही हेतू नाही. तसे करण्याचे काही कारणही नाही. माझे सर्वच मुद्दे पूर्णपणे बरोबर असतीलच असाही माझा दावा नाही. व्यवस्थित युक्तिवादाने माझ्या चुका दाखवून दिल्यास मी त्या आनंदाने मान्यही करीन. स्मिथ, मार्क्स यांच्याबाबत जी काही चर्चा व्हावयाची असेल ती जरूर होवो. पण अर्थव्यवस्थेतील वाढावा कायम ठेवून त्याचे केवळ वेगवेगळ्या प्रकारे विभाजन करावयाचे ही स्राफा यांची पद्धत आहे असे माझे म्हणणे आहे व सोवनींनी त्यांच्या कोष्टकात असे केलेले नाही हा माझा मुख्य आक्षेप आहे. यापुढील उत्तरात सोवनींनी मुख्यतः या आक्षेपाला उत्तर द्यावे अशी अपेक्षा आहे.

---

१. Adding-up theory यासाठी मी 'आधिक्य सिद्धांत' असा शब्दप्रयोग माझ्या मूळ लेखात केला आहे. 'बेरीज-सिद्धांत' हा शब्दप्रयोग त्यापेक्षा अधिक योग्य वाटतो. म्हणून या संपूर्ण लेखात 'बेरीज–सिद्धांत' हाच शब्दप्रयोग वापरणार आहे.

2. The rate of profits, as a ratio, has a significance which is independent of any prices, and can well be ' given' before the prices are fixed. It is accordingly susceptible of being determined from outside the system of production. पिअरो स्राफा, प्रॉडक्शन ऑफ कमॉडिटीज बाय मीन्स ऑफ कमॉडिटीज, भारतीय आवृत्ती १९६३, पान ३९.

■ ■

# केन्स जन्मशताब्दि परिसंवाद

## केन्स यांची प्रस्तुतता – सर्वसाधारण मतैक्य

यशवंत रारावीकर

१९८३ हे वर्ष लॉर्ड केन्स यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. समष्टि अर्थशास्त्रीय सिद्धांतन आणि धोरण या बाबतीत केन्स यांची कामगिरी एवढी मोठी आहे की ती कदापि विस्मृतीच्या पडद्याआड जाऊ शकणार नाही. त्यांचा General Theory हा ग्रंथराज किंवा युद्धकालीन How to Pay for War हे पुस्तक आजही प्रसिद्धीनंतरच्या सुमारे अर्ध्या शतकाच्या कालावधीनंतर देखील अर्थतज्ज्ञांकडून आणि धोरणे आखणाऱ्या आणि राबवणाऱ्या राजकारण्यांकडून अभ्यासले जात आहे. विसाव्या शतकातील या महान अर्थशास्त्रज्ञाची जन्मशताब्दी आज जगभर साजरी केली जात आहे यात नवल नाही.

**आंतरविद्यापीठीय परिसंवाद**

शिक्षणक्षेत्रात गेल्या साठ वर्षांहून अधिक कालावधीसाठी भरीव आणि दर्जेदार स्वरूपाचे कार्य करणाऱ्या गोखले एज्युकेशन सोसायटीने केन्स यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी संस्थेच्या नाशिक येथील भि. य. क्ष. वाणिज्य महाविद्यालयात चार सप्टेंबर रोजी 'केन्स यांचे अर्थशास्त्र' या विषयावर एक संपूर्ण दिवसभराचा परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादास महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठांतील आणि महाविद्यालयांतील अर्थशास्त्र विभाग-प्रमुख, प्राध्यापक आणि विचारवंत सहभागी झाले असल्यामुळे परिसंवादास आंतरविद्यापीठीय परिसंवादाचे स्वरूप प्राप्त झाले होते. जन्मशताब्दी सोहळ्याचाच एक भाग म्हणून संस्थेने परिसंवादाबरोबर केन्स यांच्या आणि केन्सविषयक वाङमयाचे एक ग्रंथप्रदर्शनही आयोजित केले होते.

या परिसंवादात दोन चर्चासत्रांतून तीन विषयांवर चर्चा ठेवण्यात आली होती – केन्स यांचे सिद्धांतन, केन्स यांची प्रस्तुतता आणि केन्स यांच्या सिद्धांतनाचे धोरणविषयक अन्वयार्थ. संस्थेचे सेक्रेटरी आणि भि. य. क्ष. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सो. स. गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली कार्य करणाऱ्या परिसंवाद आयोजन समितीकडे विविध तज्ज्ञांकडून वरील तीन विषयांवर पंधरा अभ्यासपूर्ण निबंध आले होते. या तीन विषयांपैकी केन्स यांची प्रस्तुतता या विषयावरील चर्चा अपेक्षेप्रमाणे सर्वांत अधिक रंगली.

**केन्स आणि मार्क्स**

पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संयुक्त संचालक प्रा. आनंद नाडकर्णी हे परिसंवादाचे उद्घाटक पाहुणे होते. सुरुवातीस डॉ. गोसावी यांनी उपस्थितांचे स्वागत केल्यानंतर डॉ. नाडकर्णी यांनी परिसंवादाचे आणि ग्रंथ-प्रदर्शनाचे उद्घाटन केले. आपल्या उद्घाटनाच्या भाषणाचा विषय म्हणून डॉ. नाडकर्णी यांनी 'केन्स आणि मार्क्स' हा विषय निवडला होता. सुरुवातीस, मार्क्स यांचे निर्वाण-शताब्दी वर्ष हेच केन्स यांचे जन्मशताब्दी वर्ष होय या मजेशीर

योगायोगाचा उल्लेख करून डॉ. नाडकर्णी यांनी आपल्या भाषणात या दोन महान अर्थशास्त्रज्ञांची तुलना केली. ते म्हणाले, "या दोन्ही विचारवंतांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या परिस्थितीचा अभ्यास आणि विचार केला, परंतु त्यात फार फरक होता. मार्क्स यांनी भांडवलशाही पद्धतीतील उणिवा आणि दोष यांच्यावर भर देऊन तिच्या अपरिहार्य विनाशाचे ठामपणाने भाकित केले, तर केन्स यांनी भांडवलशाहीतील बेरोजगारीच्या समस्येचे विश्लेषण करून तिला धोक्याचा कंदिल दाखवला; परंतु त्याचबरोबर, उपभोग आणि गुंतवणुकीस चालना देणाऱ्या योग्य अशा धोरणांचा अवलंब केला तर विनाशापासून तिला वाचवता येण्याच्या शक्यतेवर त्यांनी भर दिला." डॉ. नाडकर्णी पुढे म्हणाले, "मार्क्स यांचा दृष्टिकोन केन्स यांच्या तुलनेने अधिक व्यापक होता. कारण मार्क्स यांनी वर्गविभाजन विचारात घेऊन भांडवलशाहीच्या समस्यांचा अभ्यास केला; उलट केन्स यांनी आपला अभ्यास तिच्या आर्थिक भागापुरताच आणि त्यातही बेरोजगारीच्या समस्येपुरताच मर्यादित ठेवला होता. त्यामुळे मार्क्स यांचे सिद्धांतन हे अधिक वास्तववादी आणि मूलगामी ठरले."

**चर्चासत्रे**

परिसंवादाच्या उद्‌घाटनानंतर लगेच पहिल्या चर्चासत्राला सुरुवात झाली. या चर्चासत्राचा विषय 'केन्स यांचे सिद्धांतन' हा होता. आणि चर्चासत्राच्या अध्यक्षपदी प्रा. नाडकर्णी होते. या विषयावर परिसंवादात एकूण सहा निबंध सादर केले गेले. या निबंधांचे त्यांच्या तज्ज्ञ लेखकांकडून वाचन झाले. नाशिकच्या हं. प्रा. ठा. महाविद्यालयाचे प्रा. कांडिले आणि बोरीवली येथील महाविद्यालयाच्या प्रा. सौ. शर्मा यांनी आपापल्या निबंधातून केन्स यांच्या रोजगार-विषयक सिद्धांताचे विश्लेषण केले आणि पूर्ण रोजगार साध्य करण्यासाठी केन्स यांनी सुचविलेल्या साधनांचे त्यांनी विवेचन केले. शिवाजी विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. धुरे यांनी आपल्या निबंधातून केन्स यांच्या सनातनवादी सिद्धांताची वैयर्थता दाखवून आपला शास्त्रशुद्ध आणि गतिमान सार्वजनिक आय-व्यय सिद्धांत कसा मांडला हे स्पष्ट केले. त्यांच्या मते, "केन्स यांचा सार्वजनिक आय-व्यय सिद्धांत म्हणजे राजकोषीय तटस्थतेकडून (fiscal neutrality) राजकोषीय इष्टतमतेकडे (fiscal optimality) झालेली क्रांतिकारी वाटचाल होय. त्यांचा सिद्धांत हा विकसित आणि विकसनशील अशा दोनही प्रकारच्या देशांसमोरील सामाजिक-आर्थिक समस्या प्रभावीपणे सोडवायला उपयुक्त आहे." बिटको महाविद्यालयाचे प्रा. नंदकुमार कुलकर्णी यांनी आपल्या निबंधातून केन्स यांनी आंतरराष्ट्रीय क्लिअरिंग युनियन आणि बँकोर हे आंतरराष्ट्रीय चलन परिमाण कसे सुचविले होते ते सांगून केन्स यांची ती योजना त्या वेळी फेटाळून लावण्यात जगातील राष्ट्रांनी कशी चूक केली ते स्पष्ट केले. त्यांच्या मते १९६९ साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने सुरू केलेली 'एस. डी. आर. योजना' ही केन्स यांच्या 'बँकोर योजने' सारखीच आहे. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. नी. वि. सोवनी यांनी परिसंवादासाठी निबंध पाठविला, परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना परिसंवादास हजर राहता आले नाही. तथापि त्यांचा निबंध त्यांच्या गैरहजेरीत परिसंवादाच्या संयोजकांनी सादर केला. प्रा. सोवनी यांनी आपल्या निबंधातून एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला: "केन्स यांच्यानंतरचे अर्थशास्त्र म्हणून जे अर्थशास्त्र मांडले गेले आहे ते 'प्रस्तुत अर्थशास्त्र' (Relevant Economics) म्हणून म्हणता येईल का?" त्यांनी असे प्रतिपादन केले की आर्थिक, जगतासमोर आज ज्या समस्या उभ्या ठाकून आहेत त्या सोडवायला आर्थिक विश्लेषणाची प्रचलित पद्धती असमर्थ आहे आणि या विश्लेषण-पद्धतीच्या संपूर्ण ढाच्यात मूलगामी सुधारणा केल्या-शिवाय अर्थशास्त्र हे आजच्या आर्थिक वास्तवतेशी सुसंगत ठरू शकणार नाही. बिटको महाविद्यालयाचे प्रा. राराविकर यांनी आपल्या निबंधातून आर्थिक सिद्धान्तन आणि धोरण या बाबतीतील विविध विचारांचा आढावा घेऊन असे दाखवून दिले की केन्स यांच्यानंतर आर्थिक विचारांची वाटचाल सहज रीतीने झाली नसून संघर्षमय झाली आहे. त्यांच्या मते केन्स यांच्यानंतर एकीकडे नव-केन्सवादी आणि दुसऱ्या बाजूला नव-चलनवादी आणि रेगनवादी या दोन बाजूंतील संघर्षाला शेवट नाही. खरे म्हणजे, या दोनही बाजूमध्ये सत्याचा अंश असून यापैकी प्रत्येक विचारसरणी भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील चक्राकारी विचलनांच्या (cyclical fluctuations) विशिष्ट अवस्थेत प्रभावी ठरणारी व लागू पडणारी आहे.

## पुरवठावादी अर्थशास्त्र

निरनिराळ्या निबंधांचे वाचन आटोपल्यावर त्यावरील खुल्या चर्चेला सुरुवात झाली. चर्चेला सुरुवात करताना बिटको महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित यांनी केन्सवादी, चलनवादी आणि रेगनवादी यांच्यातील संघर्षाचा उल्लेख करून पुरवठावादी अर्थशास्त्राचा ठामपणाने पुरस्कार केला. त्यांच्या मते पुरवठा-व्यवस्थापनाला मागणी-व्यवस्थापनापेक्षा अधिक प्राधान्य दिले जावे आणि स्थानिक बाजारपेठांच्या गरजा भागविण्यासाठी उत्पादनाची लहानलहान परिमाणे स्थापन केली पाहिजे. यावर मराठवाडा विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभाग-प्रमुख डॉ. बोरकर म्हणाले की, पुरवठावादी अर्थशास्त्र आणि पुरवठा-व्यवस्थापन अर्थशास्त्र या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. पुरवठावादी अर्थशास्त्र ही काही प्रस्थापित व पद्धतशीर विचारसरणी नसून त्यात फक्त काही करांमध्ये कपात करणे व उत्पादकांना प्रोत्साहन देणे अशा उपायांचा समावेश आहे. चलनवादी विचारसरणीचा उल्लेख करून ते म्हणाले, लॅटिन अमेरिकन देशातील चलनवृद्धीच्या परिस्थितीमुळे लोकांचा शिकागो स्कूलबाबतीत भ्रमनिरास झाला. त्यांच्या मते, चलनवादी अर्थशास्त्र आणि पुरवठावादी अर्थशास्त्र या केवळ तात्पुरत्या अवस्था आहेत. केन्स आणि मार्क्स यांचा उल्लेख करून डॉ. बोरकर म्हणाले की, दोघांच्याही दृष्टिकोनात साम्य होते. परंतु मार्क्स यांनी समाजाच्या संरचनेचे विश्लेषण केले तर केन्स यांचे विश्लेषण बाजारपेठेपुरतेच मर्यादित होते. केन्सनंतरच्या केन्सवादी आणि चलनवादी यांच्यातील संघर्षाचा उल्लेख करून डॉ. बोरकर म्हणाले की, केन्स हे हस्तक्षेपवादी असल्याने नंतर नंतर ते लोकप्रिय राहिले नाहीत, तर चलनवादी विचारसरणी निर्हस्तक्षेपवादी असल्याने ती अधिक लोकप्रिय झाली.

## आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था

केन्स आणि आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था या विषयावरील चर्चा रंगतदार झाली. पुण्याच्या बृहन् महाराष्ट्र महाविद्यालयाचे डॉ. गावसकर यांनी एक समर्पक प्रश्न उपस्थित केला. "केन्स हे हस्तक्षेपवादी होते; तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा विविध देशांची चलने तरती ठेवण्याचा अनुभव असे दर्शवितो की स्वातंत्र्य हे अधिक चांगले असते; तेव्हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा हा प्रयोग केन्स यांच्या विचारसरणीला पुष्टी देणारा आहे म्हणायचे की विरोधी आहे असे समजायचे ?" यावर या विषयावरचा निबंध सादर करणारे प्रा. कुळकर्णी यांनी उत्तर दिले : "सर्वच चलने तरती नसून मार्क, डॉलर, पौंड यांसारखी काही विशिष्ट चलनेच फक्त तरती आहेत. त्यामुळे विनिमयदर मुक्त आहेत असे म्हणता यायचे नाही. बदलत्या विनिमयदरांमुळे विदेशी चलनाच्या सट्टेबाजीला पायबंद बसू शकेल व त्यामुळे आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होईल. तेव्हा चलने तरती ठेवण्याची सध्याची पद्धती ही केन्स यांच्या विचारसरणीशी विरोधी किंवा विसंगत आहेत असे म्हणता यायचे नाही. केन्स जर आज हयात असते तर त्यांनीही बदलत्या विनिमयदर पद्धतीला मान्यता दिली असती."

या चर्चेत सहभागी होताना नागपूर विद्यापीठाचे डॉ. लोकरे यांनी तीन मुद्दे उपस्थित केले. एक, त्यांनी मुळात सध्याची एस्. डी. आर. आणि केन्स यांनी सुचविलेला 'बँकोर' या दोन गोष्टी सारख्याच आहेत असे म्हणणे यावर आक्षेप घेतला. त्यांच्या मते, केन्स यांच्या बँकोरची उद्दिष्टे मर्यादित होती आणि खुद्द केन्स यांनी बँकोरला अगदी मर्यादित भूमिका ठरवून दिली होती. दोन, सध्याचे एस्. डी. आर. देखील आंतरराष्ट्रीय देवघेव व्यवहारांपैकी फार थोड्या व्यवहारांसाठी वापरले जात आहेत; बहुतेक सर्व व्यवहार (९५%) हे महत्त्वाच्या चलनांमध्येच पार पाडले जातात. सरतेशेवटी, डॉ. लोकरे असेही म्हणाले की, आंतरराष्ट्रीय चलन-व्यवस्थेचा विषय स्वतंत्रपणाने विचारात न घेता तो व्यापक दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या संदर्भात विचारात घेतला पाहिजे.

## सनातनवादी उपायांची अस्वीकार्यता

मातृभाषेच्या वापराबाबत कटाक्ष असणारे धुळ्याच्या एस्. एस्. व्ही. पी. महाविद्यालयाचे डॉ. पाटणकर यांनी मराठी भाषेतून आपले म्हणणे मांडले. केन्स यांच्या अर्थशास्त्रातील चार मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करून ते म्हणाले की परिपक्व भांडवलशाही अर्थव्यवस्था हा केन्स यांचा मुख्य अभ्यास-विषय असल्याने सरकारी कारवाईद्वारे मागणीचे व्यवस्थापन करणे हे त्यांच्या धोरणाचे मुख्य सूत्र होते. पूर्ण रोजगार-समतोल प्रस्थापित करण्यासाठी

सनातनवादी विचारसरणीने शिफारस केलेली परिवर्तनशील वेतन-किंमत ही उपाययोजना केन्स यांनी धुडकावून लावली. डॉ. पाटणकर म्हणाले, " केन्स यांचे अर्थशास्त्र हे बेरोजगार समतोलाचे अर्थशास्त्र आहे; त्यात जुळवणीच्या गतिमान प्रक्रियेमुळे पूर्ण रोजगारपातळीवर समतोल साध्य होईलच अशी ग्वाही नाही. "

### केन्स, एक सामाजिक विचारवंत

'केन्स आणि मार्क्स' या विषयावरील डॉ. नाडकर्णी यांच्या भाषणातील विचाराचा धागा पकडून शिवाजी विद्यापीठाचे डॉ. घुगे यांनी या दोन विचारवंतांविषयी आपली मते मांडली. त्यांच्या मते, केन्स यांना जरी हस्तक्षेपवादी म्हणून म्हटले जात असले, तरी केन्स यांच्या अर्थशास्त्रात खाजगी उपक्रमालाही वाव देण्यात आला आहे. याउलट, मार्क्सने माणसाला व्यक्ती म्हणून कोणताही वाव दिलेला नाही किंवा स्थान दिलेले नाही. डॉ. घुगे यांच्या मते केन्स हे केवळ अर्थशास्त्रज्ञच नव्हते तर लोकांच्या कल्याणाचा विचार करणारे एक सामाजिक विचारवंतही होते.

### कालावधीच्या संदर्भातील मापन

आतापर्यंत परिसंवादातील चर्चा ही प्रामुख्याने सद्धान्तिक पातळीवर चालली होती. केन्सचे सिद्धांत आणि उपाययोजना व्यवहारात कसे उतरवता येतील या दृष्टीने चर्चेला वळण मिळावे म्हणून डॉ. गोसावी यांनी असे सुचविले की, केन्स यांनी सांगितलेल्या 'भांडवलाची सीमान्त उत्पादकता,' 'सरासरी उपभोग प्रवृत्ती' यांसारख्या महत्त्वाच्या संकल्पना व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त ठरण्यासाठी त्यांचे नेमके मापन करता येणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी आग्रहपूर्वक असे प्रतिपादन केले की 'आर्थिक विश्लेषणात कालावधीचा विचार समाविष्ट करून आपण नवीन विश्लेषणपद्धती तयार केली पाहिजे. त्यामुळे अशा विश्लेषणाची व्यावहारिक उपयुक्तता वाढवता येईल.'

### प्रथमसत्र समारोप

केन्स यांच्या सिद्धांताच्या विविध भागांवर विविध दृष्टिकोनांतून चर्चा झाल्यावर डॉ. नाडकर्णी यांनी या प्रथम चर्चासत्राचा समारोप केला. चर्चेच्या ओघात व्यक्त झालेल्या विविध मतांचा आढावा घेऊन त्यांनी केन्स यांच्या सिद्धांतनाच्या प्रमुख भागांवर परिसंवादातील चर्चेने कसा प्रकाश टाकला ते स्पष्ट केले आणि चर्चेत भाग घेणाऱ्यांना धन्यवाद दिले.

### दुसरे चर्चासत्र

दुसऱ्या चर्चासत्राचे विषय दोन होते. एक, केन्स यांची प्रस्तुतता (Relevance of Keynes) आणि दोन, केन्स यांच्या सिद्धांताचे धोरणविषयक अन्वयार्थ. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. बोरकर होते. या चर्चासत्रातील विषयांवर एकूण सात निबंध सादर केले गेले. यांपैकी एक निबंध विकसित देशाच्या बाबतीत केन्सची प्रस्तुतता यावर, चार निबंध अविकसित देशांच्या बाबतीत, विशेषत: भारतीय अर्थव्यवस्थेबाबत केन्स यांची प्रस्तुतता यावर, एक निबंध केन्स यांच्या सर्वसाधारण प्रस्तुततेबाबत, तर एक निबंध केन्स यांच्या धोरणाविषयीचा होता.

बिटको महाविद्यालयातील प्रा. पटवर्धन यांनी केन्स यांची विचारसरणी विकसित भांडवलशाही देशांसाठी कशी प्रस्तुत आहे ते स्पष्ट केले. त्यांच्या मते केन्स यांच्या प्रभावामुळेच भांडवलशाही देश साम्यवादाच्या हल्ल्यातून वाचू शकले. धारवाडचे श्री. खेर यांनी आपल्या निबंधातून केन्सवादी आणि चलनवादी विचारसरणी यांच्यातील संघर्षाचा परामर्श घेऊन मंदी, चलनवृद्धी अशांसारख्या विविध परिस्थितींत या भिन्न विचारांची कितपत प्रस्तुतता आहे याचे मूल्यमापन केले. भि. य. क्ष. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. कुळकर्णी यांनी आपल्या निबंधातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत केन्स कितपत प्रस्तुत आहेत याविषयीचा विचार मांडला. त्यांनी असे प्रतिपादन केले की, आपल्याला स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी केन्स यांनी गृहीत धरलेली परिस्थिती आपल्या देशात अस्तित्वात नसल्याने केन्स यांचे सिद्धांत या देशास लागू पडणारे नव्हते. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचा जसजसा विकास व्हायला लागला

तसतशी केन्स यांची समर्पकता हळूहळू वाढू लागली. तथापि, त्यांच्या मते, केवळ केन्स यांच्या सिद्धांत आणि धोरणांनी आपल्या समस्या सुटणार नाहीत. आपल्या अर्थव्यवस्थेला केन्स यांच्या राजकोषीय (fiscal) आणि फ्रिडमन यांच्या चलनविषयक अशा दोहोंच्या संमिश्र धोरणात्मक उपायांची गरज आहे. शिरपूर महाविद्यालयाचे प्रा. राणे यांनी आपल्या निबंधातून केन्सवादी विचारसरणी भारतीय अर्थव्यवस्थेशी कशी सुसंगत आहे हे विशद केले. धुळ्याच्या प्रा. सौ. देशपांडे यांनी असे प्रतिपादन केले की, केन्स यांनी सांगितलेली व्यावहारिक धोरणाची साधने आपल्या अर्थव्यवस्थेशी सुसंगत ठरतील, आणि त्यामुळे आपण कोणत्या दिशेने वाटचाल केली पाहिजे याबाबतचे मार्गदर्शन लाभेल. तथापि, आपण केन्स यांच्या विश्लेषणापाशीच न थांबता त्याहीपुढे गेले पाहिजे, असेही त्यांनी सुचविले. डॉ. गोसावी यांनी आपल्या धोरणविषयक निबंधातून केन्स यांच्या धोरणांचे विश्लेषण करून त्यांचे अन्वयार्थ स्पष्ट केले. आपल्या निबंधाच्या अखेरीस सध्याच्या परिस्थितीच्या संदर्भात केन्स यांच्या धोरणांच्या बाबतीत काही महत्त्वाचे मुद्दे त्यांनी उपस्थित केले.

**व्यवस्थापकीय दृष्टिकोन**

निबंधवाचनानंतर खुल्या चर्चेला सुरुवात झाली. चर्चेला सुरुवात करताना डॉ. गोसावी यांनी असे प्रतिपादन केले की केन्स यांच्या धोरणांनी आपली उद्दिष्टचे साध्य करून घ्यावयाची असतील तर त्यासाठी व्यवस्थापनाच्या बाजूचा विचारही तितकाच महत्त्वाचा ठरतो. प्रक्रिया व्यवस्थापन (Systems Management) स्वीकारण्याचे आग्रहपूर्वक प्रतिपादन करून त्यांनी व्यवस्थापनाच्या आधुनिक तंत्रांचा विकास करण्याच्या बाबतीत समृद्ध कामगिरी करणाऱ्या पीटर ड्रकर या विचारवंताच्या 'अनसीन रेव्होल्युशन'चा दाखला दिला. डॉ. गोसावींच्या मते कामगार आणि कारखानदार या दोघांनाही प्रशिक्षण देऊन सहभागी व्यवस्थापन (Participative Management) अंमलात आणणे ही काळाची गरज आहे.

डॉ. गोसावी यांच्या मतांवर भाष्य करताना डॉ. नाडकर्णी म्हणाले की, कोणत्याही धोरणात्मक उपायांमध्ये व्यवस्थापकीय बाजूचा विचार हा अभिप्रेत असतोच. कोणत्याही विचारसरणीचे—मग ती केन्सवादी असो, चलनवादी असो, किंवा रेगनवादी असो—मूल्यमापन करताना व्यवस्थापकीय कार्यक्षमतेची विशिष्ट पातळी गृहीत धरूनच करावी लागते.

प्रा. रारावीकर यांनी असे सुचविले की, व्यवस्थापन बाजूचे महत्त्व लक्षात घेऊन केन्स यांच्या धोरणांची अधिक कार्यक्षम कार्यवाही करता यावी म्हणून एक नवीन केन्स-ड्रकर प्रतिमान किंवा गुंतवणूक-व्यवस्थापन प्रतिमान (model) विकसित केले पाहिजे.

**भारतीय अर्थव्यवस्थेत समर्पकता**

अपेक्षेप्रमाणे केन्स यांची प्रस्तुतता हा विषय सबंध परिसंवादात सर्वांत अधिक जिव्हाळ्याचा आणि रंगतदार चर्चेचा विषय ठरला. या विषयावरची चर्चा प्रामुख्याने भारतीय अर्थव्यवस्थेत केन्स कितपत सुसंगत वा प्रस्तुत आहेत या संबंधात घडून आली.

या चर्चेला सुरुवात करताना प्रा. रारावीकर यांनी सुचविले की, केन्स यांच्या प्रस्तुततेविषयी विचार करताना त्यांची सापेक्ष प्रस्तुतता लक्षात घेतली पाहिजे, आणि ती केन्स यांनी गृहीत धरलेल्या परिस्थितीच्या संदर्भात विचारात घेतली पाहिजे, विकसित देशांच्या बाबतीतली केन्स यांच्या प्रस्तुततेसंबंधी बोलताना प्रा. रारावीकर यांनी असे प्रतिपादन केले की, पाश्चिमात्य भांडवलशाहीतील आज बदललेली संरचना केन्स यांच्या विचारसरणीच्या त्या देशातील प्रस्तुतता कमी झाली आहे असे दर्शविते. तथापि, भारतासारख्या अविकसित देशातील संरचनात्मक अडथळे जसजसे दूर होत आहेत तसतशी केन्स यांची प्रस्तुतता त्या देशात वाढत आहे.

या विषयावरच्या चर्चेत एक मूलभत मुद्दा असा उपस्थित केला गेला की, भारतीय अर्थव्यवस्थेत मागणीची कमतरता अस्तित्वात आहे की नाही? काही प्रतिनिधींनी असे मत प्रतिपादन केले की, भारतासारख्या अविकसित देशां-

मध्ये मागणीच्या कमतरतेपेक्षा खरेदीशक्तीच्या कमतरतेची समस्या हीच प्रमुख समस्या असते. यावरून त्यांनी असे सूचित केले की, भारतीय अर्थव्यवस्थेस केन्स यांच्या विचारसरणीपेक्षा चलनवादी विचारसरणी अधिक सुसंगत ठरेल. तथापि, बहुसंख्य प्रतिनिधींकडून या मतास पाठिंबा मिळाला नाही. बहुतेक प्रतिनिधींनी असेच मत प्रतिपादन केले की, आपल्या अर्थव्यवस्थेत केन्स यांना अभिप्रेत असलेल्या अर्थाने मागणीची कमतरता अस्तित्वात असल्यामुळे चलनवादी विचारसरणीपेक्षा केन्सवादी विचारसरणीच या देशाच्या परिस्थितीशी अधिक सुसंगत आहे. तथापि, प्रतिनिधींनी असेही प्रतिपादन केले की केन्स यांच्या धोरणात्मक उपायांची अधिक विवेकी आणि समजपूर्वक अंमलबजावणी करणे जरुरीचे आहे.

**समारोप आणि सर्वसाधारण एकवाक्यता**

डॉ. बोरकरांनी या चर्चासत्राचा समारोप करतानाच आपला निबंधही सादर केला. केन्स यांची प्रस्तुतता हाच त्यांच्या निबंधाचा विषय होता. त्यांनी असे प्रतिपादन केले की, केन्स यांची विश्लेषणपद्धती आणि साधने केवळ विकसित देशातच नव्हे तर अविकसित देशातही वापरता येऊ शकतील. त्यांच्या मते भारतात मागणीची कमतरता अस्तित्वात आहेच, पण सरकारच्या हस्तक्षेपामुळे आणि सार्वजनिक गुंतवणुकीमुळे ती उघडपणाने जाणवत नाही एवढेच. चर्चेत व्यक्त झालेल्या विविध मतांचा आढावा घेऊन त्यांनी सांगितले की केन्स यांची विचारसरणी भारतीय अर्थव्यवस्थेत प्रस्तुत आहे, असे मत सर्वसाधारणपणे परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

परिसंवादाच्या समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. नाडकर्णी यांनी भूषविले. आपल्या समारोपाच्या भाषणात त्यांनी परिसंवादातील एकंदर चर्चेबद्दल निबंधलेखकांना आणि चर्चेत भाग घेणाऱ्यांना धन्यवाद देऊन ते म्हणाले, "या चर्चेतून, अकारण वादंग न माजता, केन्स यांची विचारसरणी काहीशी तपशिलात विशद करण्यात आली."

या परिसंवादास विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष आणि विविध विद्यापीठांचे कुलगुरू यांच्या शुभेच्छा प्रेरक ठरल्या, तर विविध तज्ज्ञांच्या सहभागामुळे तो यशस्वी झाला.

■ ■

# वर्गणीचे बदललेले दर

गेले कित्येक दिवस मुद्रणाचे दर, टपालखर्च यामध्ये वाढ होत आहे. हे लक्षात घेऊन नोव्हेंबर १९८२ मध्ये संगमनेर महाविद्यालयात झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सहाव्या वार्षिक अधिवेशनात वर्गणीचे दर वाढवायचा निर्णय परिषदेच्या सर्वसाधारण सभेने घेतला. बदललेले दर खालीलप्रमाणे असून ते १ एप्रिल १९८३ पासून आकारले जात आहेत :

| | |
|---|---|
| अर्थसंवादचे वर्गणीदार : | रु. ४० [ वार्षिक ] |
| मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्वसाधारण सदस्य : | रु. ३० [ वार्षिक ] |

मराठी अर्थशास्त्र परिषदेची आजीव सदस्यत्व वर्गणी पूर्वीप्रमाणे रु. २५० एवढी राहील.

रवीन्द्र सबनीस
कार्यवाह